
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्या विरोधी विचारांच्या लोकांच्यासुद्धा सुख-दु:खाच्या प्रसंगी उपयोगी पडल्याने वैचारिक दुरावा कमी होण्यास मदत होईल आणि आपल्याला जास्तीत जास्त सहकारी आणि कार्यकर्ते मिळू शकतील. आजचा विरोधक उद्याचा स्वयंसेवक आहे हे कधीही विसरू नका.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# शेख हसीनांना फाशीची शिक्षा

**• विद्यार्थ्यांच्या हत्येप्रकरणी ठरवले दोषी • भारताने हसीना यांना ताब्यात द्यावे : मोहम्मद युनूस**

**◆ ढाका, १७ नोव्हेंबर**

मागील पंधरा महिन्यांपासून भारतात आश्रयाला असणाऱ्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सोमवारी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना ढाक्याच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने (आयसीटी) हत्येसाठी चिथावणी दिल्याबद्दल आणि आदेश दिल्याबद्दल फाशीची शिक्षा सुनावली. उर्वरित प्रकरणांमध्ये त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. आयसीटीने त्यांना ५ प्रकरणांमध्ये आरोपी बनवले होते. या निकालानंतर बांगलादेशातील शेख हसीना समर्थकांमध्ये खळबळ उडाली आहे.



तीन सदस्यीय न्यायासनाने ४०० पानांच्या निकालपत्रात, हसीना यांना हत्येची 'मास्टरमाईंड' म्हणून दोषी ठरवले. हसीना यांनी आंदोलनकर्त्यांवर अत्याचार केले सोबतच आंदोलन थांबवण्यासाठी कोणतीही पावले उचलली नाहीत, असे म्हटले आहे.

न्यायाधिकरणाने शेख हसीना यांना जुलै २०२४ च्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या हत्यांची सूत्रधार म्हणून दोषी ठरवले. अन्य आरोपी माजी गृहमंत्री असदुझ्झमन खान यांनाही या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.



पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्ध न्यायाधिकरणाच्या निकालापूर्वी सोमवारी ढाका येथे असा कडक बंदोबस्त लावण्यात आला होता

तिसरा आरोपी माजी आयजीपी अब्दुल्ला अल-मामुन याला पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. मामून कोठडीत असून, तो सरकारी साक्षीदार झाला आहे. कोर्टाने हसीना आणि असदुझ्झमन कमाल यांची संपत्ती जप्त करण्याचा आदेश दिला आहे. या निर्णयानंतर बांगलादेशचे हंगामी पंतप्रधान मोहम्मद युनूस यांनी हसीना यांना भारताने बांगलादेशात परत पाठविण्याची मागणी केली.

**सत्तापालटानंतर हसीना भारताच्या आश्रयाला**

बांगलादेशात झालेल्या उद्रेकानंतर तेथे सत्तांतर झाले. शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुझ्झमान यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी बांगलादेश सोडले आणि भारताच्या आश्रयाला आले. दोन्ही नेते गेल्या १५ महिन्यांपासून भारतात राहत आहेत.

### हिंसाचार भडकावल्याचा आरोप

**जुलै-ऑगस्ट २०२४ दरम्यान झालेल्या आंदोलनादरम्यान शेख हसीना सरकारने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शस्त्रांचा वापर केला होता. आंदोलकांना रोखण्यासाठी हेलिकॉप्टरमधून गोळीबारही करण्यात आला. त्यामुळे देशाच्या अनेक भागांत हिंसाचार माजला आणि परिस्थिती आणखी बिकट झाली, असेही न्यायाधिकरणाने आरोपपत्रात म्हटले आहे.**

**हसीनांना स्वाधीन करावे**

बांगलादेशच्या पंतप्रधान कार्यालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, भारत आणि बांगलादेश यांच्यातील प्रत्यार्पण करारानुसार, शेख हसीना यांना आमच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी भारताची आहे.

**हसीनांनीच स्थापन केले होते न्यायाधिकरण**


शेख हसीना यांनीच २०१० मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाची स्थापना केली होती आणि योगायोग म्हणजे त्याच न्यायाधिकरणाने हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावली. *(वृत्तसंस्था)*

# अनगरकरांची बिनविरोधची परंपरा अखेर खंडित

## नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत तर भाजपाचे १६ नगरसेवक बिनविरोध



सरस्वती शिंदे



उज्वला थिटे



प्राजक्ता पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १७ नोव्हेंबर-**

अनगरच्या इतिहासात अनगर ग्रामपंचायत नगरपंचायतमध्ये रूपांतर झाल्यानंतर लागलेल्या पहिल्याच निवडणुकीत बिनविरोधची परंपरा खंडित झाली आहे. नगराध्यक्ष पदासाठी ३ महिलांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लागली आहे. १७ जागांपैकी एका प्रभागात दोन अर्ज आल्याने एका नगरसेवक पदासाठी निवडणूक लागली आहे तर उर्वरित १६ जागांवर सर्व भाजपाचेच १६ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. अनगर पंचायतीसाठी आता नगराध्यक्षपद आणि एका नगरसेवक पदासाठी निवडणूक लागली आहे.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी आहे. पण तत्पूर्वीच अनगर नगरपंचायतीचा निकाल लागला आहे. येथील १७ पैकी १६ जागांवर भाजपाचे नगरसेवक म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. एका प्रभागात नगरसेवक पदासाठी दोन अर्ज आल्याने निवडणूक लागली आहे. स्व. लोकनेते बाबुरावअण्णा पाटील यांच्यापासून अनगर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध होण्याची परंपरा होती. दरम्यान अनगर नगर पंचायत स्थापनेनंतर पहिल्यांदाच होत असलेल्या या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदासाठी माजी आमदार राजन पाटील यांच्या सूनबाई प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील यांची उमेदवारी दाखल केली. ही निवडणूक बिनविरोध होणार असे असताना झालेल्या घडामोडीत अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी मोठ्या पोलीस बंदोबस्तात उज्वला महादेव थिटे यांनी आपला अर्ज उमेदवारी पहाटेच्या सुमारास दाखल केल्याने नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लागली आहे. **(उर्वरित पान २ वर)**

**बिनविरोध १६ नगरसेवक यापमाणे :** काजल राजकुमार मोरे, विशाल आप्पाराव थिटे, उमेश कल्याण भडकवाड, श्रीकांत जगन्नाथ घाटोळे, विजया भीमराव कोकरे, सीमा जयराम गुंड, वैशाली विष्णू पाचपुंड, गणेश महादेव गुंड, विठ्ठल आण्णा कारंडे, सुरेखा गजानन डिकोळे, विद्या बंडू शिंदे, विक्रम रखमाजी गुंड, नारायण कल्याण गुंड, शितल तात्या गायकवाड, रूपाली सोमनाथ शिंदे, झुलेखा अनवर मुलाणी.

## महत्त्वाचे

### तेजीमुळे निफ्टीची विक्रमी झेप

**मुंबई :** सोमवारी भारतीय शेअर बाजारात तेजी दिसून आली. दिवसभरातील व्यवहारानंतर निर्देशांक, निफ्टी हिरव्या रंगात बंद झाले. निर्देशांक ३८८ अंकांनी वाढून ८४,९५० वर तसेच निफ्टी १०३ अंकांच्या वाढीसह २६,०१३ वर बंद झाला. निफ्टीची ही झेप विक्रमी ठरली. बाजारातील तेजीमागे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे शेअर्स आणि वित्तीय क्षेत्रात गुंतवणूकदारांची खरेदी जोरदार राहिली. ऊर्जा, माध्यमे आणि ग्राहकी वस्तू कंपन्यांमध्येही चांगली तेजी होती. धातू आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नफा वसुली झाल्याने निर्देशांक आणि निफ्टी फार मोठी झेप घेऊ शकले नाहीत. तरीही बाजारातील एकूण वातावरण सकारात्मकच राहिले.



# नितीशकुमार गुरुवारी घेणार शपथ

**दहाव्यांदा होणार मुख्यमंत्रिपदी पदारूढ**

**◆ नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

बिहारचे विद्यमान मुख्यमंत्री आणि जदयूचे नेते नितीशकुमार गुरुवार, २० नोव्हेंबरला बिहारचे मुख्यमंत्री म्हणून दहाव्यांदा शपथ घेणार आहेत.

पाटण्याच्या गांधी मैदानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भाजपाचे बिहारचे निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान आणि भाजपाशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.



२४३ सदस्यीय बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआने २०२ जागा जिंकल्या आहेत, यात भाजपाच्या ८९ तर, जदयूच्या ८५ जागांचा समावेश आहे. लोजपा रामविलासने चौथ्या क्रमांकाच्या १९ जागा जिंकल्या. महाआघाडीला ३५ जागा मिळाल्या असून, यात राजदच्या २५ जागांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणुकीत महाआघाडीने राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. रालोआ ही निवडणूक मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवत असल्याचे भाजपाने वारंवार म्हटले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### रेल्वेखाली चिरडून तीन ठार

**पुणे :** पुण्यातील रेल्वे ट्रॅकवर तीन जणांचा ट्रेन खाली येऊन मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. ही घटना रविवारी रात्री पुणे शहराच्या बाहेरील मांजरी परिसरात घडली. १८ ते २० वयोगटातील ५ ते ६ तरुण ट्रॅकवरून चालत होते, त्यापैकी काही जण त्यावर बसले होते. रविवारी ते काही गैरप्रकार करत असताना एका ट्रेनने त्यापैकी तिघांना धडक दिली.

### 'लाडकी बहीण'च्या ई-केवायसीला पुन्हा मुदतवाढ

**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर सुरू झालेल्या 'माझी लाडकी बहीण' योजनेत सुमारे २.३५ कोटी महिलांना लाभ मिळत आहे. मात्र, यातील केवळ १.३ कोटी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित जवळपास एक कोटी महिलांचे ई-केवायसी बाकी आहे. या महिलांसाठी ई-केवायसीची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. या आधी १८ नोव्हेंबरपर्यंत ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले होते. आता त्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरेंनी त्यांच्या समाज माध्यमांवरून या निर्णयाची माहिती दिली. राज्यातील काही भागात पुराची स्थिती निर्माण झाल्यामुळे तसेच इतर अडचणींमुळे अनेक लाभार्थी महिलांना ई केवायसी करता आले नव्हते. अशा महिलांसाठी आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' ८८ तासांचे ट्रेलर

**लष्करप्रमुख द्विवेदी गरजले**

**पाकने कुरापत काढल्यास कठोर उत्तर**

**◆ नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

आमचा खरा चित्रपट अद्याप सुरूही झालेला नाही; फक्त ८८ तासांचा ट्रेलर दाखवण्यात आला आहे. पाकिस्तानने आमची आणखी कुरापत काढल्यास आम्ही त्यांना जबाबदार राष्ट्र कशी वागतात हे दाखवण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा सज्जड दम लष्करप्रमुख लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी सोमवारी 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल बोलताना पाकिस्तानला दिला.

दिल्लीत झालेल्या चाणक्य संरक्षण संवादाच्या उद्घाटनप्रसंगी लष्करप्रमुख बोलत होते. ते म्हणाले की, भारत प्रगतीसाठी प्रयत्नशील असताना, दहशत पसरवणाऱ्यांना रोखणे आवश्यक आहे. *(वृत्तसंस्था)*

### १७ इलेक्ट्रॉनिक्स प्रकल्पांना मान्यता

**◆ नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादन योजनेच्या अंतर्गत सहा श्रेणींमध्ये सुमारे ७,१७२ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या १७ प्रकल्पांना सरकारने सोमवारी मंजुरी दिली. ही मंजुरी उच्च मूल्य असलेल्या घटकांच्या उत्पादनासाठी भारताच्या दृढनिश्चय आणि निर्णायक प्रयत्न अधोरेखित करते. या प्रकल्पांमुळे एकत्रितपणे ६५,१११ कोटी रुपयांचे उत्पादन होईल.

तुम्ही भारताला एक प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन केंद्र बनण्याचा मार्ग दाखवला आहे, असे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजुरीच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली.

**सौदी अरबमध्ये बसची टँकरला धडक**

# मदिनानजीक अपघात; ४५ भारतीय होरपळून ठार

**१८ महिला, १७ पुरुष आणि १० मुलांचा मृत्यू**

**◆ मदिना, १७ नोव्हेंबर**

सौदी अरबमधील मदिना येथे उमराह यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बसने डिझेल टँकरला दिलेल्या भीषण धडकेत किमान ४५ भारतीयांचा होरपळून मृत्यू झाला, अशी माहिती सौदी अरबमधील स्थानिक माध्यमांनी दिली. ठार झालेले यात्रेकरू तेलंगणातील आहेत.

यात्रेकरूंची बस मक्का येथून मदिनाच्या दिशेने जात असताना पहाटे दीड वाजताच्या सुमारास मुफ्रीहाटजवळ हा अपघात झाला. बसमधील बहुतांश प्रवासी तेलंगणातील हैदराबाद येथील आहेत. बसमधील यात्रेकरूंचा गट मक्का येथून धार्मिक विधी पार पाडून मदिनाकडे जात असता हा भीषण अपघात झाला. अपघात झाला, त्यावेळी बहुतांश प्रवासी झोपेत होते. धडक झाल्यानंतर बसने पेट घेतल्याने त्यांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही.

या घटनेत संपूर्ण बस बेचिराख झाली. त्यामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची ओळख पटवणे अत्यंत कठीण झाल्याचे बचाव पथकाने सांगितले. *(वृत्तसंस्था)*




**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक**

# ५० टक्के आरक्षणाची सीमा ओलांडू नका

## सर्वोच्च न्यायालयाने सुनावले

**नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

पुढील महिन्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त नसावी, असे सर्वोच्च न्यायालयाने बजावले आहे. न्यायालयाने असा इशाराही दिला की, जर ही मर्यादा ओलांडली तर निवडणुका थांबवल्या जातील. पुढील सरन्यायाधीश होणारे न्या. सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील न्यायासनाने म्हटले की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ च्या जे. के. बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वीच्या स्थितीनुसार घेतल्या जाऊ शकतात.

यात इतर मागासवर्गीय (ओबीसी) वर्गांसाठी २७ टक्के आरक्षणाची शिफारस करण्यात आली होती. न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. कांत यांच्यासह न्यायासनाचा भाग होते. महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या विनंतीवरून, न्यायालयाने १९ नोव्हेंबर रोजी सुनावणी निश्चित केली, परंतु राज्य सरकारला ५० टक्के मर्यादा ओलांडू नये असे सांगितले. न्यायालयाने म्हटले आहे की, जर युक्तिवाद असा असेल की नामांकने सुरू झाली आहेत आणि न्यायालयाने त्यांचे काम स्थगित करावे, तर आम्ही निवडणुकांना स्थगिती देऊ. या न्यायालयाच्या अधिकारांची परीक्षा घेऊ नका.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत न्यायालयाने २०२१ मध्ये ऐतिहासिक निकाल दिला. त्या आरक्षण मर्यादेचे महाराष्ट्रात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उल्लंघन झाले, असा दावा करीत विकास गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल केली.

### दिल्ली स्फोटात 'शू बॉम्बर'चा संशय

**नवी दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या दहशतवादी स्फोटात शू बॉम्बचा वापर झाल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोट झालेल्या कारमधून तपास यंत्रणांना एक शूज सापडला. तपासात अमोनियम नायट्रेट आणि टीएटीपीचे अंश आढळले.

एजन्सी याला सुरुवातीचा संकेत मानत आहेत आणि या कोनातूनही तपास करीत आहेत. हे दहशतवादी वापरत असलेले अत्यंत धोकादायक आणि संवेदनशील स्फोटक मानले जाते. ते थोड्याशा धक्क्याने, घर्षणाने किंवा अगदी थोड्या उष्णतेनेही स्फोट होऊ शकते. म्हणूनच दहशतवादी जगात याला 'मदर ऑफ सॅटन' म्हणून ओळखले जाते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...



## अकलूज नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवारी अर्ज दाखल

**अकलूज, दि. १७ नोव्हेंबर-**

**सदस्यासाठी १५१ अर्ज दाखल**

अकलूज नगर परिषदेची पहिलीच निवडणूक लढण्याची घोषणा करण्यात आली. अखेरच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार तर २६ जागेसाठी सदस्य पदासाठी अर्ज अर्ज अखेर प्राप्त झाले आहेत. पैकी महाराष्ट्र विकास सेना पक्ष, काँग्रेस पक्ष वंचित बहुजन आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गट व भारतीय जनता पक्ष यांनी आपले उमेदवारांच्या अर्ज दाखल केले आहेत दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज भरण्याची मुदत होती दुपारी तीन वाजता कार्यालय कक्षात आलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज घेण्यात आले रात्री ७.४५ पर्यंत ही प्रक्रिया चालू होती. भारतीय जनता पक्षाने शक्ती प्रदर्शन करत आपले अर्ज दाखल केले त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांनीही समूहाने येत आपले अर्ज दाखल केले. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट यांनी कोणताही गाजावाजा न करता आपल्या उमेदवारांचे अर्ज दाखल केले

**नगराध्यक्षपदासाठी आलेले अर्ज :** सुवर्णा अनिल साठे (महाराष्ट्र विकास सेना), रेश्मा आडगळे व प्रतिभा गायकवाड (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट), पूजा कोतमिरे (भाजपा), उमा कांबळे (वंचित बहुजन आघाडी) व उषा कांबळे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट) दिव्यांनी रास्ते.




## जिल्ह्यात ऊसास उच्चांकी दर दिल्याबद्दल बाबुराव बोत्रे-पाटील यांचा सन्मान

**पिलीव, दि. १७ नोव्हेंबर-**

ओंकार साखर कारखाना परिवाराकडून २०२४ व २०२५ या गेल्या सिझन मधील ऊसास सोलापूर जिल्ह्यात ऊच्चांकी दर ३००५ व फेब्रुवारीत ऊसास ३१०५ दर दिला. ऊस वाहतूकदारांची बीलेही वेळेत दिल्याबद्दल दिपावलीसाठी ऊसासाच्या प्रमाणात मोफत साखर दिल्याबद्दल चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखा बोत्रे-पाटील यांचा शेतकऱ्यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव काळे साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे होते. ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील संचालिका रेखा बोत्रे-पाटील संचालक प्रशांतराव बोत्रे-पाटील यांनी ऊस उत्पादक शेतकरी कर्मचारीवर्ग, वाहन मालक, यांना केंद्र बिंदु मानुन काम केले आहे. गेल्या सहा वर्षीपासून जो शब्द दिला त्या मध्ये कोणाताही बदल केला नाही शेतकरी रामभाऊ मगर व राहुल मगर यांच्या हस्ते यावेळी सन्मान करण्यात आला.

## इरा पब्लिक स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

**जेऊर, दि.१७ नोव्हेंबर**

इरा पब्लिक स्कूल जेऊर येथे बालदिन व पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पंडित नेहरूंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच तन्मय रोकडे (सिनियर केजी) व रुद्र अमोल हजारे (इयत्ता-पहिली) हे दोन विद्यार्थीनी चाचा नेहरूंची वेशभूषा करून सर्वांची मने जिंकली. यावेळी अवसरे यांनी सर्वांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या. वघाडगे यांनी चाचा नेहरूंचा जीवनपट गोष्टींच्या स्वरूपात विद्यार्थ्यांसमोर मांडला. बाल दिनानिमित्त इरा पब्लिक स्कूलने चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये नर्सरी ते दुसरीचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते.

पान १ वरुन..

## अनगरकरांची बिनविरोधची परंपरा अखेर खंडित



नगराध्यक्ष पदासाठीच सरस्वती भागवत शिंदे यांचा तिसरा अर्ज अपक्ष म्हणून दाखल झाला असून नगराध्यक्ष पदासाठी आता एकूण ३ अर्ज दाखल झाले आहेत. १७ नगरसेवकापैकी १६ प्रभागातील १६ नगरसेवक भाजपाचेच बिनविरोध झाले आहेत. आता अर्ज माघारीच्या मुदतीनंतर सोलापूर जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद, पंचायतींच्या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

**निवडणूक लादण्याचा प्रयत्न**

माझ्या जुन्या पक्षातील नेत्यांना जिल्ह्यात उमेदवार मिळेनात, त्यामुळे वैफल्यग्रस्त झाल्याने गावातील एकोपा दूर करून येथे भांडणे लागण्याच्या उद्देशाने बाहेरून आयात केलेला उमेदवार लादण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक लागल्याचे दुःख नाही मात्र सलोख्याने आणि एकोप्याने राहत असलेल्या गावात विष पेरण्याचे काम सुरू आसल्याचा आरोप करित निवडणूक आयोगावर दबाव आणून येथे निवडणूक लादण्याचा प्रयत्न करणे हे इथल्या कुठल्या ऐबू गैबु चे काम नाही. मी ज्या पक्षात काम करीत होतो त्या पक्षातल्या वरिष्ठांकडून हा प्रकार केला असल्याचाही आरोप त्यांनी यावेळी केला, अशी प्रतिक्रिया माजी आमदार राजन पाटील यांनी दिली.

# वरिष्ठ नेत्यांकडून बंडखोरांची मनधरणी सुरु

## २१ नोव्हेंबरलाच ठरणार अंतिम लढती

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हासह महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुकीचा रोमांच शिगेला पोहोचला आहे. बडे नेते, पक्षप्रमुख चांगलेच कामाला लागलेत. अनेक ठिकाणी महायुती विरुध्द महायुती आणि मविआ विरुध्द मविआ अशा लढती होणार आहेत. काही ठिकाणी उमेदवार आयात करून, तडजोडी करीत जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि अनगर नगरपंचायतीत भाजपने स्वबळावर उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना नेत्यांकडून आपापल्या परीने तयारी केली आहे. वरिष्ठ नेत्यांकडून बंडखोरांची मनधरणी सुरु असल्याचे दिसून येत आहे. २१ नोव्हेंबरला अर्ज मागे घेण्याचा दिवस असून, यानंतरच अंतिम लढती कसे होणार हे ठरणार आहे.

या निवडणुकीसाठी स्थानिक निष्ठावंत, आयात नेते आणि विशिष्ट सामाजिक समीकरणांच्या आधारे उमेदवार निवडले गेले आहेत. काही ठिकाणी घराणेशाही, निष्ठावंतांना प्राधान्य, ओबीसी कार्ड अशा राजकीय समीकरणांचा वापर करीत भाजपनेही स्वबळाची रणनीती राबविली आहे. इतर पक्षानेही आपापल्या परीने उमेदवार उभे केले आहेत. जिल्ह्यातील




अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, मोहोळ, बार्शी, पंढरपूर, अकलूज, सांगोला, मंगळवेढा, कुर्डुवाडी, करमाळा या ११ नगरपालिकांमध्ये आणि १ अनगर नगरपरिषदेत या निवडणुका पार पडणार आहेत.

अर्ज भरलेल्या उमेदवारांची छाननी - १८ नोव्हेंबर, अर्ज माघारी घेण्याची तारीख- २१ नोव्हेंबर, निवडणूक चिन्ह वाटप -२६ नोव्हेबर आहे. २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक ईव्हीएमवर घेण्यात येणार आहे.

प्रचारात त्या पक्षसंघटनांचे हायटेक नेतेही उतरणार आहेत.

या निवडणुकीसाठी राज्यात एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार असतील. त्यामध्ये ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदार असतील. या निवडणुकांसाठी राज्यात एकूण १३ हजार कन्ट्रोल युनिट स्थापन करण्यात आले आहेत. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ३२ कॅम्पेन बनवण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. दिव्यांग मतदार, तान्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. तसेच काही मतदार केंद्र गुलाबी केंद्र असणार असून त्यात सर्व अधिकारी या महिला असतील.

यंदा नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. त्यानुसार, अ वर्ग अध्यक्षपद - १५ लाख, नगरसेवक - ५ लाख, ब वर्ग अध्यक्षपद - ११ लाख २५ हजार, नगरसेवक - ३ लाख ५० हजार, क वर्ग अध्यक्षपद - ७ लाख ५० हजार, नगरसेवक - २ लाख ५० हजार तर नगरपंचायत उमेदवारांसाठी अध्यक्षपद - ६ लाख, नगरसेवक - २ लाख २५ हजार अशी खर्च मर्यादा निवडणूक आयोगाने दिली आहे.

बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेल्या नगरपालिका, नगरपंचायतींमध्ये लोकप्रतिनिधी बसणार आहेत. आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांमध्ये, विशेषतः भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरीच्या अनेक घटना घडू लागल्या आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक ठिकाणी राजकीय नाट्य घडले.बंडखोरी टाळण्यासाठी भाजपने उमेदवारांची यादी शेवटच्या क्षणापर्यंत जाहीर केली नाही. मात्र तरीही राज्यातील अनेक ठिकाणी निष्ठावंतांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. काही नगरपालिकात काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जागावाटपावरून खटके उडाले आहेत. काही ठिकाणी बंडखोरांना प्रोत्साहन दिले जात असल्याचा आरोपही होत आहे. राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी पक्षाविरोधात बंड पुकारले असून, त्यांना भाजप आणि इतर पक्षांकडून अप्रत्यक्ष पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महायुती (भाजप, शिंदे गट, अजित पवार गट) आणि महाविकास आघाडी (काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार गट) या दोन्ही गटांना बंडखोरीचा फटका बसत आहे. युती आणि आघाडीत मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांची चांगलीच फरफट होत असून, अनेक ठिकाणी मोठे पक्ष स्वबळावर लढत असल्याचे चित्र आहे. राजकीय पक्षांचे नेते बंडखोरांची मनधरणी करण्यात गुंतले आहेत. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतरच बंडखोरीचे खरे चित्र स्पष्ट होईल.

## आढळ न होणाऱ्या, दुबार नोंद असलेल्या मिळकती निर्लेखित करणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

**महापालिकेच्या संकेतस्थळावर यादी प्रसिद्ध**

महापालिकेकडून शहरातील आढळ न होणाऱ्या, दुबार नोंद असलेल्या मिळकती व आढळ न होणारे पैकी नळाच्या कराची रक्कम अधिनियमातील तरतूदीनुसार निर्लेखित करण्यात येणार आहे. अशा मिळकतींची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधित मिळकतदारांना या संदर्भात हरकत घेण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

महानगरपालिकेकडील मालमत्ता विभागाचे अभिलेखावर आढळ न होणाऱ्या मिळकती, दुबार नोंद असलेल्या मिळकती व आढळ न होणारे पैकी नळांच्या मिळकतींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत आहेत.

अधिनियमातील तरतूदीनुसार निर्लेखित करण्यापूर्वी मनपाचे www.solapurcorporation.gov.in ४१ संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर ताज्या घडामोडी यामध्ये यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

याबाबत सोलापूर शहरातील सर्व मिळकतदारांना व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सदर यादीतील कोणत्याही मिळकतीबाबत आपणास काही हरकत/आक्षेप अथवा काही माहिती असल्यास smcpropartytaxgmail.com यावर अथवा आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे नांवे लेखी स्वरुपात ७ दिवसाचे आत हरकत नोंदवावी अथवा माहिती द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

## संत श्री ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात

### जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा रौप्य महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १७ नोव्हेंबर-**

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी तत्वज्ञ श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२९व्या संजीवन समाधी सोहळा व जागतिक सहिष्णुता सप्ताहाचा समारोप श्री संत ज्ञानेश्वर-तुकाराम ज्ञानतीर्थ, विश्वरूप दर्शन मंच, श्रीक्षेत्र आळंदी येथे वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.

इंद्रायणीत वारकर्यांच्या गुलाल, बुक्का व फुलांची ओंजळ वाहून ज्ञानेश्वर माऊलीचे भावपूर्ण स्मरण केले. भजन करून नामस्मरणाचा गजर केला. यावेळी विश्वरूप दर्शन मंचावर घंटानाद करण्यात आला. विश्वशांती केंद्राच्या वतीने वारकर्यांना महाप्रसाद देण्यात आला. तत्पूर्वी हभप डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी काल्याचे कीर्तन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. याद्वारे शेकडो वर्षांची परंपरा जपण्यात आली. इंद्रायणीच्या घाटावर वारकर्यांनी या समाधी सोहळ्याच्या काल्याच्या महाप्रसादाचा लाभ घेतला.



या समारंभासाठी विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, हभप तुळशीराम दा. कराड, उषा विश्वनाथ कराड, हभप तुळशीराम दा कराड, डॉ. उमेश नागरे, माइर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, संचालक डॉ. महेश थोरवे उपस्थित होते.

या सप्ताहात हभप अर्जुन महाराज लाड, हरिहर महाराज दिवेगावकर, उद्धव महाराज मंडलिक, यशोधन महाराज साखरे, चिन्मय महाराज सातारकर या कीर्तनकारांनी कीर्तनरुपी सेवा सादर केली. तसेच प्रा. सुशांत दिवेकर, चैत्राली अभ्यंकर, पंडित रघुनाथ खंडाळकर, सुरंजन व शुभम खंडाळकर, गायत्री गुल्याने, कार्तिकी व सुपुत्र कौस्तुभ कैवल्य गायकवाड, पुनम ताई नळकांडे व विश्वशांती संगीत कला अकादमीच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी विश्वशांती दर्शन हा अभंगवाणी व भक्तीसंगीताचे कार्यक्रम सादर केले.

हभप बापूसाहेब मोरे देहूकर म्हणाले, सृष्टीवर संताच्या वचनामुळे मानवाचे कल्याण होते. संत हे वात्सल्य मूर्ती असून त्यांची महिमा शब्दात सांगता येत नाही. संत दुसर्यांचे दुःख सावरण्यास पुढे येऊन त्यांना सुख व शांतीचा मार्ग दाखवतात.

हभप शालीकराम खंदारे यांनी सूत्रसंचालन व महेश महाराज नलावडे यांनी आभार मानले.

## बसमध्ये चढताना प्रवाशी महिलेच्या पर्समधून दोन लाखाचे दागिने व पैशाची चोरी

### अवघ्या बारा तासातच आरोपीस मुद्देमालासह अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

एका १९ वर्षीय तरुणीने एसटी बसमध्ये चढताना प्रवाशी महिलेच्या पर्समधून दागिने व पैसाची चोरी केली. चोरी केलेले दोन लाखाचे दागिने विक्री करण्यासाठी जात शहरातील पंच कट्टा मार्गे सराफ कट्टा येथे पोलिसांच्या जाळ्यात सापडली. तिच्याकडून चोरीला गेलेले सर्व दागिने परत मिळवण्यात पोलिसांना यश आले आहे. शिल्पा वेळू उपाध्ये (वय १९ रा. गुलबर्गा राज्य कर्नाटक सध्या रा.घर नं. १०२९ भैरु वस्ती रिक्षा स्टॉप जवळ, विजापूर नाका, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे.

**खबऱ्याकडून मिळाली चोरट्या तरुणीची माहिती**

२० वर्षे वयाची मुलगी जिने अंगात विटकरी रंगाचा पंजाबी ड्रेस व डार्क चॉकलेटी रंगाचा स्वेटर घातलेला आहे. ती झोपडपट्टी नंबर-०२ येथे राहत आहे. तेथुन ती काही वेळाने चोरीचे दागिने विक्री करण्याकरिता पंच कट्टा मार्गे, सराफ कट्टा सोलापूर येथे जाणार आहे.याची योग्य ती शहानिशा करुन पोलिसांनी सदर ठिकाणी जावुन महिला आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले. तक्रार प्राप्त झाल्यापासून अवघ्या बारा तासातच ताब्यात घेतले. तिच्याकडे कसून चौकशी करता तीने गुन्हा केल्याची कबुली दिली व तिचे कडुन चोरीचे सोन्या चांदीचे दागिने जप्त करण्यात आले.

१३ नोव्हेंबर रोजी जयश्री दत्तात्रय झुंजकर (वय ५९, रा.गौडगांव ता. बार्शी)या तुळजापूर येथून धाराशिव ते सोलापूर बसमधून येत होत्या. सोलापूर एस.टी. स्टॅन्ड येथे सकाळी साडे अकराच्या सुमारास उतरुन दहा पंधरा मिनीट सोलापूर एस.टी स्टॅन्ड येथे थांबल्या. त्यानंतर प्लॅट फॉर्म क्रं.०१ वर बाराच्या सुमारास बेगमपुर येथे जाण्यासाठी सोलापूर ते सांगोला एस.टी.मध्ये बसमध्ये जावुन बसल्या. सीटवर बसल्यावर बसचे तिकीट घेण्यासाठी पर्स मध्ये छोट्या पाकिटातील पैसे काढण्यासाठी त्यांनी पर्सची चैन उडण्याचा प्रयत्न केला. पर्सची चैन ही उघडीच होती.त्यांनी पर्स मध्ये ठेवलेले पैसे व सोन्याचे दागिने तपासले असता ते मिळुन आले नाहीत. सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम याचा एस.टी. बस मध्ये शोध घेतला. परंतू मिळुन आले नाहीत. बसमध्ये चढताना कोणीतरी पर्समधून दोन लाखाचे दागिने व रक्कम लंपास केली होती. झुंजकर या महिलेने फौजदार चावडी पोलिसात फिर्याद दिली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांनी तक्रारदार यांनी माहीती देताच त्यांनी संवेदनशीलता व कार्यतत्परता दाखवुन महिलेस धीर दिला व गुन्हा दाखल होताच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे क्षीरसागर यांना शोध घेण्यासाठी आदेश दिले होते.

## बेडवरून खाली पडल्याने डोक्यास मुका मार

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

बेडवर खेळत असताना बेडवरून खाली पडल्याने १ वर्षाच्या मुलीच्या डोक्यास मुका मार लागला. तीस सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आईने दाखले असता तीस काही झाले नसल्याचे डॉक्टरांकडून सांगितले.ही घटना रविवारी रात्री ९ च्या सुमारास न्यू पाच्छा पेठ,साईबाबा चौक या ठिकाणी घडली. क्रिशिका परमेश्वर गोणे (वय १ वर्षे) असे मुका मार लागलेल्या बालिकेचे नाव आहे. रविवार रात्री ९च्या सुमारास क्रिशिका बेडवर खेळत होती.

## भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी निमित्त वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाला सोलापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोमवार, दि. १७ नोव्हेंबर-**

श्रद्धेय भाऊसाहेब गांधी यांच्या, जन्मशताब्दी वर्ष - प्रारंभानिमित्त आयोजित, वृक्षारोपण व सामुदायिक स्वच्छता अभियाना मध्ये, सोलापूरकरांच्या तसेच,वालचंद शिक्षण समूहातील माध्यमिक, कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालयाच्या विविध विभागातील प्राचार्य, प्राध्यापक, विभाग प्रमुख, तसेच विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अभूतपूर्व यश मिळवले. कडाक्याच्या थंडीची सकाळ असूनही,वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी प्रांगणात सकाळी ठीक सात वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात, भाऊसाहेबांच्या कार्याबद्दल नितांत श्रद्धा असणारे, सामाजिक, राजकीय, व्यापारी, धार्मिक क्षेत्रातील निमंत्रित मान्यवर नागरिक, विद्यार्थी, शिक्षकवर्ग, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते आणि वालचंद शिक्षण समूहातील सर्व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

''संस्कारातून सेवा सेवेतून शिक्षण''- या प्रेरणादायी घोषवाक्याखाली राबविण्यात आलेल्या या अभियानाचे औपचारिक उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त



डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी भूषविले. वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त श्री. भूषण शहा, श्री पृथ्वीराज गांधी, श्री पराग शहा, श्री वैभव गांधी तसेच, भारत वर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल जमगे, भारतीय जैन संघटना राज्यअध्यक्ष केतन शहा आणि शहरातील विविध जैन मंदिरांचे विश्वस्त आणि मान्यवरांनीही उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

डॉ. ओंबासे म्हणाले, ''वृक्षारोपण आणि स्वच्छता या केवळ पर्यावरणीय जबाबदाऱ्या नाहीत, तर त्या आपल्या संस्कार, सेवा आणि शिक्षण या मूल्यांना मजबूत करणाऱ्या आहेत. आज सोलापूरकरांनी दिलेला हा अभूतपूर्व प्रतिसाद हा भाऊसाहेब गांधी यांच्या कार्याला आणि विचारांना दिलेली खरी आदरांजली आहे.'' आज स्वच्छता व वृक्षारोपण अभियानातील तरुणाईच्या सामूहिक सहभागामुळे संपूर्ण परिसर स्वच्छ, हरित आणि आरोग्यदायी बनेल अशी आशा व्यक्त केली. वालचंद शिक्षण समूहाने या अभूतपूर्व कार्यक्रमातून सोलापूर शहराला संघटितपणे कार्य करण्याची संघटित एकजूट वृत्ती, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक जबाबदारी यांचा अनोखा संदेश दिला. शिस्त, वेळेचे अचूक नियोजन आणि समर्पित सेवाभाव या गुणांनी कार्यक्रमाची उंची वाढवली, अशा शब्दांत डॉ. ओंबासे यांनी अभियानाचे कौतुक केले.

डॉ. गांधी म्हणाले, जन्मशताब्दी वर्षानिमित्त राबवलेल्या या प्रारंभिक उपक्रमाने पुढील कैक पिढ्यांसाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला असून, ''संस्कारातून सेवा सेवेतून शिक्षण''- श्रद्धेय भाऊसाहेबांच्या विचाराचा प्रभावी विचार सोलापूरकरांनी पुन्हा एकदा जगासमोर ठेवला. पहाटेची थंडी, गार वारे तरीही कोणाच्याही चेहऱ्यावर तक्रारीचा सुर नव्हता. विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व जण परिसर स्वच्छ करण्यासाठी उत्साहाने पुढे सरसावले. वृक्षारोपणादरम्यान लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाचे दोन वर्षांचे पालकत्व स्वतः स्वीकारण्याची जबाबदारी वालचंद शिक्षण समूहाने जाहीर केली.

उपक्रमात सामील झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर दिसणारी आनंदाची आणि सेवाभावाची ऊर्जा भाऊसाहेब गांधी यांच्या संस्कारांचे मूर्त रूप असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. सोलापूर महानगरपालिका, श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान आणि वालचंद शिक्षण समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला, सोलापूरकरांनी अप्रतिम व अभूतपूर्व प्रतिसाद दिला. भाऊसाहेबांच्या या जन्मशताब्दी निमित्तऔचित्य साधून केवळ विद्यार्थ्यांनीच नव्हे तर, शिक्षक, कर्मचारी, स्थानिक रहिवासी, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते सगळ्यांनी एकत्र येऊन शहराच्या स्वच्छतेसाठी आणि हरित सोलापूरसाठी स्तुत्य उपक्रम राबविला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





शबरीमाला मंदिर सोमवारी मंडला-मकरविलक्कू यात्रेसाठी उघडण्यात आले. यावेळी वृश्चिकम् विधी पार पाडताना पुजारी

# हवेतच नष्ट होणार शत्रूचे ड्रोन

## लष्कर, वायुदलाच्या ताफ्यात ड्रोनविरोधी यंत्रणा लवकरच

◆ **नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

'ऑपरेशन सिंदूर'ला उत्तर देताना म्हणून, पाकिस्तानी सैन्याने भारताविरुद्ध मोठ्या प्रमाणात ड्रोन वापरले. त्यानंतर आता भारतीय सैन्य शत्रूच्या ड्रोनविरुद्ध त्यांची क्षमता आणखी मजबूत करीत आहे. यासाठी लष्कर आणि वायुदल १६ स्वदेशी विकसित 'ड्रोन डिटेक्शन ॲण्ड इंटरडिक्शन सिस्टिम्स'साठी ऑर्डर देत आहेत. ही प्रणाली दोन किलोमीटर अंतरावरून लेसर बीमने शत्रूच्या ड्रोनना लक्ष्य करण्यास आणि निष्क्रिय करण्यास सक्षम आहे.

संरक्षण मंत्रालय लवकरच संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेच्या (डीआरडीओ)



एकात्मिक ड्रोन डिटेक्शन ॲण्ड इंटरडिक्शन सिस्टिमला (मार्क-२) मान्यता देईल, अशी अपेक्षा आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले की, १० किलोवॅट लेसर बीम शत्रूच्या ड्रोनची श्रेणी दुप्पट करेल. मागील प्रणाली फक्त एक किलोमीटर अंतरापर्यंत शत्रूच्या ड्रोनना लक्ष्य करण्यास सक्षम होती.

### पाच किलोमीटरच्या श्रेणीची चाचणी

सतत लांब पल्ल्याच्या लेसर-आधारित ड्रोन डिटेक्शन आणि इंटरडिक्शन सिस्टिम विकसित करीत आहे. या विकासाचा एक भाग म्हणून, त्यांनी डायरेक्ट एनर्जी वेपन सिस्टिमची यशस्वी चाचणी केली आहे, जी पाच किलोमीटर अंतरापर्यंतच्या प्रणालींना लक्ष्य करू शकते. भारतीय सैन्याच्या सहभागाने ते त्याच्या चाचण्या सुरू ठेवत आहे. पाच किलोमीटरची श्रेणी ३० किलोवॅट लेसर-आधारित डायरेक्ट एनर्जी वेपनने साध्य केली जाईल. *(वृत्तसंस्था)*

### भारत निवडक देशांच्या पंक्तीत

एप्रिलमध्ये, सेंटर फॉर हाय एनर्जी सिस्टिम्स ॲण्ड सायन्सेस यांनी आंध्रप्रदेशातील कुर्नूल येथे ३० किलोवॅट लेसर-आधारित वेपन सिस्टिम (डीईडब्ल्यू एमके-२) वापरून फिक्स्ड-विंग एअरक्राफ्ट, क्षेपणास्त्रे आणि झुंडीने येणारी ड्रोन्स रोखण्याची क्षमता प्रथमच प्रदर्शित केली. असे करून, भारत अमेरिका, चीन आणि रशियासह अशा क्षमता असलेल्या देशांच्या निवडक गटात सामील झाला.

## काँगोमध्ये खाणीतील पूल कोसळून ३२ जणांचा मृत्यू

◆ **बुकावू, १७ नोव्हेंबर**

आग्नेय काँगोमधील तांबे आणि कोबाल्ट खाणीतील एक पूल कोसळून ३२ जणांचा मृत्यू झाला, असे एका प्रादेशिक अधिकाऱ्याने रविवारी सांगितले.

लुआलाबा प्रांतातील मुलोंडो येथील कलांडो खाणीतील पूल शनिवारी कोसळला, असे प्रांताचे गृहमंत्री रॉय कौम्बा मायोंडे यांनी पत्रपरिषदेत सांगितले. मुसळधार पाऊस आणि भूस्खलनाच्या धोक्यामुळे खाण परिसरात जाण्यास कडक बंदी असूनही, बेकायदेशीर उत्खनन करणारे जबरदस्तीने खाणीत शिरले, असे मायोंडे म्हणाले. घटनास्थळी असलेल्या सैनिकांनी केलेल्या गोळीबारामुळे खाण कामगारांमध्ये भीती पसरली. त्यांनी पुलाकडे धाव घेतली आणि ते खाली पडले. यामुळे ते जखमी झाले तर काही जणांचा मृत्यू झाला, असे काँगोच्या आर्टिसनल ॲण्ड स्मॉल-स्केल मायनिंग सपोर्ट ॲण्ड गाइडन्स सर्व्हिस अर्थात् एसएईएमएपीई या सरकारी संस्थेने म्हटले आहे. मायोंडे यांनी मृतांची संख्या ३२ असल्याचे सांगितले, तर एका वृत्तात ४० जणांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

# महिला सक्षमीकरणाला नवे पंख

## प्रादेशिक लष्करात पहिल्यांदाच सामील होणार महिला



◆ **नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

प्रादेशिक लष्करात महिलांना प्रथमच सामील केले जाऊ शकते. लष्कर प्रायोगिक प्रकल्प म्हणून महिला कॅडरना प्रादेशिक बटालियनमध्ये समाविष्ट करण्याचा विचार करीत आहे. सुरुवातीला त्यांची भरती काही बटालियन्सपुरती मर्यादित असेल.

या हालचालीचा उद्देश हळूहळू सैन्यात महिलांसाठी अधिक संधी उपलब्ध करून देणे आहे. प्रादेशिक सैन्य, त्याच्या सध्याच्या स्वरूपात, १८ ऑगस्ट १९४८ रोजी प्रादेशिक सैन्य कायद्यासह अस्तित्वात आले. त्याचे औपचारिक उद्घाटन ९ ऑक्टोबर १९४९ रोजी पहिले भारतीय गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी यांनी केले.

### सुरुवातीला बटालियनपुरती मर्यादित भरती

सुरुवातीला महिला कॅडरची भरती काही बटालियनपुरती मर्यादित असेल. ही संख्या नंतर इतर बटालियनमध्ये वाढवली जाऊ शकते. सरकार सशस्त्र दलांमध्ये महिला शक्तीच्या महत्त्वावर भर देत आहे. मार्च २०२२ मध्ये राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात, तत्कालीन संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट यांनी सांगितले की, सशस्त्र दलात महिलांची नियुक्ती ही एक सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे आणि तिचा नियमितपणे आढावा घेतला जातो.

सध्या, भारतीय सैन्यात सशस्त्र दल वैद्यकीय सेवांव्यतिरिक्त १० शाखा आणि सेवांमध्ये महिलांना नियुक्त केले जाते. यामध्ये कॉर्प्स ऑफ इंजिनिअर्स, कॉर्प्स ऑफ सिग्नल्स, आर्मी एअर डिफेन्स, आर्मी सर्व्हिस कॉर्प्स, आर्मी ऑर्डनन्स कॉर्प्स, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड मेकॅनिकल इंजिनिअर कॉर्प्स, आर्मी एव्हिएशन कॉर्प्स, इंटेलिजेंस कॉर्प्स, जज ॲडव्होकेट जनरल ब्रँच आणि आर्मी एज्युकेशन कॉर्प्सचा समावेश आहे. *(वृत्तसंस्था)*

# केरळ, राजस्थानमध्ये बीएलओची आत्महत्या

## कामाचा दबाव असल्याचा कुटुंबीयांचा दावा

**मतदार यादी पुनरीक्षण**

◆ **कन्नूर/जयपूर, १७ नोव्हेंबर**

केरळ आणि राजस्थानमधील दोन बीएलओंनी एसआयआरशी संबंधित कामाच्या ताणामुळे आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. केरळमधील कन्नूर येथील सरकारी शाळेतील कर्मचारी अनिश जॉर्ज यांनी गळफास लावून आत्महत्या केली. ते निवडणुकीसाठी बीएलओ होते. एसआयआरशी संबंधित कामाच्या ताणामुळे अनिशने हे पाऊल उचलल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.

दरम्यान, जयपूरमध्ये एसआयआर कार्यक्रमामुळे नाराज झालेल्या एका बीएलओने ट्रेनसमोर उडी मारली. कलवाडमधील धरमपुरा येथील रहिवासी मुकेश कुमार जांगीड हे सरकारी शिक्षक होते. त्यांच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये असे म्हटले आहे की अधिकारी त्यांना कामाच्या दबावामुळे त्रास देत होते आणि निलंबित करण्याची धमकी देत होते.

कोलकाता येथील एका बीएलओलाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या पत्नीने सांगितले की त्यांच्यावर एसआयआर प्रक्रिया पूर्ण करण्याचा दबाव आहे.

### केरळमध्ये बीएलओंचा कामावर बहिष्कार

कन्नूरमध्ये एका बीएलओच्या आत्महत्येनंतर राज्यभरातील बुथ-स्तरीय अधिकारी कामावर बहिष्कार टाकतील. एसआयआर प्रक्रिया आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे बीएलओ प्रचंड दबावाखाली असल्याचा आरोप निदर्शक संघटनांनी केला. केरळ एनजीओ असोसिएशनने राज्यभरातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयांवर निषेध मोर्चा काढण्याची घोषणाही केली. असोसिएशनचे म्हणणे आहे की, २३ वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या मतदार यादीत सुधारणा करण्यासाठी बीएलओंना दिवसरात्र काम करण्यास भाग पाडले जात आहे. *(वृत्तसंस्था)*

# आझम खान, अब्दुल्लाला सात वर्षांची शिक्षा

## दोन पॅन कार्ड बाळगण्याच्या प्रकरणात दोषी

◆ **रामपूर, १७ नोव्हेंबर**

रामपूर न्यायालयाने मंगळवारी सपाचा नेता आझम खान आणि त्याचा मुलगा, माजी आमदार अब्दुल्ला आझमला दोन पॅन कार्ड बाळगण्याच्या आरोपाते दोषी ठरवले आणि त्यांना सात वर्षांची शिक्षा सुनावली. आमदार आणि खासदारांसाठी असलेल्या विशेष न्यायालयाने दोघांनाही ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला. न्यायालयाच्या निर्णयानंतर आझम आणि अब्दुल्ला यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.

या न्यायालयीन सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता भाजपा आमदार आकाश सक्सेना न्यायालयात हजर होते. निकालाच्या पृष्ठभूमीवर न्यायालयाच्या परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. भाजपा आणि सपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने बाहेर जमले होते. यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण होते. आझम खानविरुद्ध दाखल असलेल्या १०४ खटल्यांपैकी आतापर्यंत १२ प्रकरणांमध्ये निकाल देण्यात आले आहेत. त्याला सात प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे आणि पाच प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

भाजपा नेते आणि सध्याचे आमदार आकाश सक्सेना यांनी २०१९ मध्ये सिव्हिल लाईन्स पोलिस ठाण्यात अब्दुल्ला आझमच्याविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. अब्दुल्ला आझमने दोन वेगवेगळ्या जन्म प्रमाणपत्रांचा वापर करून दोन पॅन कार्ड मिळवले होते. अब्दुल्लाने वेळोवेळी दोन्ही पॅन कार्ड सपा नेते आझम खानच्या सांगण्यावरून वापरले होते, असा आरोप त्यांनी केला होता. *(वृत्तसंस्था)*

## पुण्यात रेल्वेखाली चिरडून तीन ठार

**पुणे :** पुण्यातील रेल्वे ट्रॅकवर तीन जणांचा ट्रेन खाली येऊन मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. ही घटना रविवारी रात्री पुणे शहराच्या बाहेरील मांजरी परिसरात घडली. प्राथमिक माहितीनुसार, १८ ते २० वयोगटातील पाच ते सहा तरुण ट्रॅकवरून चालत होते, त्यापैकी काही जण त्यावर बसले होते. रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास ते काही गैरप्रकार करत असताना एका ट्रेनने त्यापैकी तिघांना धडक दिली.

## चित्रपट वार्ता

### पुन्हा सजणार भन्साळींची 'हिरामंडी'




**मुंबई :** संजय लीला भन्साळी यांच्या 'हिरामंडी' या वेबमालिकेचा महिला सीझन मागील वर्षी मे महिन्यात प्रदर्शित झाला होता. ओटीटीच्या जगात ही मालिका सुपरहिट झाली. यात अदिती राव हैदरी, मनीषा कोईराला, ऋचा चड्डा, सोनाक्षी सिन्हा, फरीदा जलाल, शर्मिन सहगल असे एकापेक्षा एक मातब्बर कलाकार होते. आता याचा दुसरा भागही येणार आहे. 'हिरामंडी'च्या दुसऱ्या भागावर निर्मात्यांनी काम सुरू केले आहे. नेटफ्लिक्सच्या 'हिरामंडी'च्या लेखकांपैकी एक असलेल्या विभू पुरी यांनी सांगितले की, आम्ही सध्या लेखन स्तरावर आहोत. कथा, पटकथेवर काम सुरू आहे. आजची पिढी ही संकल्पना समजू शकेल का, अशी शंका लोकांना होती. पण, प्रेक्षकांनी 'हिरामंडी'ला आपलेसे केले. ही मालिका फार मोठी जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. पहिला भाग सूडाच्या भावनेभोवती फिरतो. आता दुसऱ्या सीझनच्या कथानकात 'हिरामंडी'तील वारांगना नवाबांसाठी नाचणार नाही. या सर्व वारांगना चित्रपटसृष्टीत दाखल होतात, असे काहीसे कथानक राहणार आहे.

### पंकज त्रिपाठीच्या मुलीचे अभिनयात पदार्पण

**मुंबई :** अभिनेता पंकज त्रिपाठी हे अनेकांचे आवडते कलाकार आहेत. अनेक टीव्ही शो, चित्रपट आणि वेबमालिकांमध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर ते पोहोचले. आता त्यांचा हा वारसा त्यांची मुलगी आशी त्रिपाठी पुढे नेणार आहे. आशीनेही वडिलांप्रमाणे अभिनय क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुढचे पाऊल टाकले आहे. मात्र, आशीने चित्रपट किंवा वेबमालिकेचे माध्यम न निवडता रंगभूमीवरून अभिनयात पदार्पण करण्याचे ठरवले आहे. पंकज त्रिपाठी यांनी निर्माते म्हणून रंगभूमीवर नवे बॅनर सुरू केले आहे. त्यांच्या बॅनरखाली 'लैलाज' नावाचा पहिला प्रोजेक्ट सुरू होत आहे. या नाटकाद्वारे पंकज यांची १८ वर्षीय मुलगी आशी त्रिपाठी रंगभूमीवर पदार्पण करणार आहे. तिने पदार्पणासाठी रंगभूमीची निवड केल्याने पंकज त्रिपाठी अतिशय आनंदित आहेत. यापूर्वी आशी एका संगीत व्हिडीओमध्ये दिसली होती.



### प्रेम चोप्राच्या प्रकृतीत सुधारणा



**मुंबई :** हिंदी सिनेसृष्टीतील दोन दिग्गज कलाकारांच्या प्रकृती अस्वास्थ्याने चाहते चिंतीत होते. अभिनेते धर्मेंद्र यांच्यानंतर प्रेम चोप्रा यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हृदयाशी संबंधित तक्रारीमुळे प्रेम चोप्रा लीलावतीत उपचार घेत होते. आता त्यांची प्रकृती सुधारली असून, त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. त्यांच्या फुफ्फुसात संसर्ग झाल्याने त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. आधीपासूनच त्यांना हृदयविकाराचीही तक्रार होती. म्हणून त्यांना रुग्णालयात खबरदारीचा उपाय म्हणून दाखल करण्यात आले होते. आता त्यांना बरे वाटत आहे.

# अल-फलाह विद्यापीठाच्या अध्यक्षाच्या भावाला अटक

## मध्यप्रदेशातील घोटाळा प्रकरण

◆ **महू, १७ नोव्हेंबर**

महू येथील आर्थिक घोटाळा प्रकरणात अल-फलाह विद्यापीठाचे अध्यक्ष जावेद सिद्दिकीच्या भावाला मध्यप्रदेश पोलिसांनी हैदराबाद येथून अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

मध्यप्रदेशातील महू येथे २५ वर्षांपूर्वी झालेल्या मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या हमूद अहमद सिद्दिकी याला रविवारी हैदराबाद येथून अटक करण्यात आली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. हमूदने बनावट खाजगी बँक स्थापन केली होती. त्याने ठेवी दुप्पट करण्याचे आमिष दाखवून शेकडो जणांना फसवले आणि २००० मध्ये ते महू येथून बेपत्ता झाला होता.

घोटाळा उघडकीस आल्यानंतर तो त्याच्या कुटुंबासह पळून गेला होता. पोलिस अधिकारी मागील काही दशकांपासून त्याचा शोध घेत होते. त्याला हैदराबादमध्ये रविवारी अटक करण्यात आली, असे महूचे उपविभागीय पोलिस अधिकारी ललितसिंह सिकरवार यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

महू पोलिसांनी जावेद सिद्दिकीची पृष्ठभूमी पुन्हा तपासण्यास सुरुवात केल्यानंतर ही अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कौटुंबिक नोंदींचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर असे दिसून आले की, हमूद हा दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या फसवणूक प्रकरणात फरार होता. हमूद हैदराबादमध्ये राहत होता तसेच शेअर ट्रेडिंगमध्ये काम करायचा. *(वृत्तसंस्था)*



इंडियन मेटल्स ॲण्ड फेरो अलॉयज लि.चे व्यवस्थापकीय संचालक सुभ्रकांत पांडा यांनी सोमवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली




# चौकशी केलेल्या मेवा विक्रेत्याची आत्महत्या

◆ **श्रीनगर, १७ नोव्हेंबर**

दहशतवादी मॉड्युल प्रकरणात चौकशीसाठी बोलावल्यानंतर एका मेवा विक्रेत्याने स्वतःला पेटवून घेतले. सोमवारी श्रीनगरच्या रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, बिलाल अहमद वाणीने रविवारी काझीगुंडमध्ये स्वतःला पेटवून घेतले. रविवारी रात्री उशिरा अनंतनागच्या रुग्णालयात त्याची प्रकृती बिघडली आणि त्याला एसएमएचएस रुग्णालयात रेफर करण्यात आले. मध्यरात्रीनंतर वाणीचा मृत्यू झाला.

दहशतवादी मॉड्युल प्रकरणात चौकशीसाठी पोलिसांनी वाणी आणि त्याचा मुलगा जसीर बिलाल यांना ताब्यात घेतले होते. बिलालला नंतर सोडण्यात आले, तर त्याचा मुलगा चौकशीसाठी ताब्यात आहे.

वाणी हा व्हाईट कॉलर्ड दहशतवादी मॉड्युल प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. मुझफ्फर राथेरचा शेजारी आहे.

मुझफ्फर सध्या अफगाणिस्तानात असल्याचे मानले जाते, तर त्याचा धाकटा भाऊ डॉ. आदिल राथेरला ६ नोव्हेंबर रोजी उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथून अटक करण्यात आली. *(वृत्तसंस्था)*

### कटात सहभागी काश्मिरी तरुणाला अटक

दुसरीकडे, लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणात आत्मघाती बॉम्बर डॉ. उमर उन नबीसोबत कटात सहभागी असलेल्या एका काश्मिरीला एनआयएने अटक केली आहे. दिल्लीतील स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला आणि २० जण जखमी झाले. स्फोटात वापरलेली कार आमिर रशीद अलीच्या नावावर नोंदणीकृत होती. त्याला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांकडून प्रकरण ताब्यात घेतल्यानंतर, एनआयएने मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू केली. तपासात असे दिसून आले की, जम्मू-काश्मीरमधील पाम्पोरमधील सांबुराचा रहिवासी असलेल्या आरोपीने आत्मघाती बॉम्बर उमरसोबत दहशतवादी हल्ला करण्यासाठी कट रचला होता.

## दगडी खाण दुर्घटनेतील मृतांची संख्या सहा

◆ **सोनभद्र, १७ नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशातील सोनभद्र जिल्ह्यात कोसळलेल्या दगडखाणीच्या ढिगाऱ्यातून आणखी पाच मृतदेह सापडले आहेत. मृतांची संख्या सहा झाली आहे, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले.

रविवार आणि सोमवारी मध्यरात्री मृतदेह सापडले. रात्री एक मृतदेह सापडला. मृताची ओळख इंद्रजित असून, तो ओब्रातील पनारीचा रहिवासी आहे. इतर मृतांची ओळख इंद्रजितचा भाऊ संतोष यादव, रवींद्र उर्फ नानक, रामखेलवन आणि कृपाशंकर अशी आहे, असे सोनभद्रचे जिल्हा दंडाधिकारी बी.एन. सिंह यांनी सांगितले.

सुमारे १२ कामगार ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता आहे, असे शनिवारी संध्याकाळी बिल्ली मार्कुंडी खाण क्षेत्रात झालेल्या दुर्घटनेनंतर घटनास्थळी भेट देणारे उत्तरप्रदेशचे मंत्री आणि स्थानिक आमदार संजीव कुमार गोंड यांनी सांगितले होते.

मोठाले दगड असल्याने ढिगारा साफ करण्यास वेळ लागत आहे, असे वाराणसी झोनचे अतिरिक्त पोलिस महासंचालक पीयूष मोरडिया यांनी रविवारी सांगितले. शनिवारी दुपारी ४.३० वाजता ओब्रा पोलिस ठाण्यात घटनेची माहिती देण्यात आली, असे सोनभद्रचे पोलिस अधीक्षक (एसपी) अभिषेक वर्मा यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*


# विधानसभांमध्ये भाजपाचे उच्चांकी प्रतिनिधित्व

## आमदारांची संख्या झाली २०१४

◆ **नवी दिल्ली, १७ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत दमदार कामगिरीनंतर भाजपा नेते आनंदी आहेत. आता त्यांचे लक्ष्य पश्चिम बंगाल आहे. बंगाल निवडणुकीपूर्वी भाजपासाठी महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक बातमी समोर आली आहे. राज्य विधानसभांमध्ये पक्षाचे प्रतिनिधित्व आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचले आहे. या यशाच्या पृष्ठभूमीवर, भाजपाने एक नवीन लक्ष्य ठेवले आहे. भाजपा नेते अमित मालवीय यांनी दावा केला की, पक्ष लवकरच १,८०० आमदारांचा आकडा ओलांडण्यास सज्ज आहे.

पक्षाच्या प्रगतीवर अढळ विश्वास व्यक्त करताना, भाजपा नेते अमित मालवीय यांनी भाकीत केले आहे की पुढील दोन वर्षांत, भाजपा देशभरात १,८०० आमदारांचा आकडा सहजपणे ओलांडेल. समाज माध्यम 'एक्स'वर शेअर केलेल्या पोस्टमध्ये, मालवीय यांनी भाजपाच्या सत्तेतील उदयाची तुलना काँग्रेसशी केली. पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, या वेगाने भाजपा पुढील दोन वर्षांत १,८०० जागांचा टप्पा कोणत्याही अडचणीविना ओलांडेल. १९८५ मध्ये सुमारे



२,०१८ आमदारांसह काँग्रेसने शिखर गाठले होते, असे मालवीय यांनी निदर्शनास आणून दिले.

त्यांनी असा युक्तिवाद केला की, १९८० च्या दशकातील राजकीय परिस्थितीमुळे सत्ता मिळवणे आणि मतदारांवर प्रभाव पाडणे सोपे झाले. परंतु, भाजपाचा उदय हळूहळू, सातत्यपूर्ण आणि कठोर परिश्रमातून झाला. काँग्रेसला हे स्थान वारशाने मिळाले असले तरी, भाजपाने जागामागे जागा, राज्यमागे राज्य आणि खडतर संघर्ष करून मिळवले.

अमित मालवीय यांनी दोन्ही राष्ट्रीय पक्षांमधील तुलनात्मक विश्लेषण सादर केले आणि म्हटले की, भाजपाचे यश हे सततच्या कठोर परिश्रमाचे परिणाम आहे. काँग्रेसला त्याचे स्थान वारशाने मिळाले आहे, तर भाजपाने ते मिळवले आहे. भविष्य काम करणाऱ्या पक्षाचे आहे, घराणेशाहीच्या राजकारणावर अवलंबून असलेल्यांचे नाही. *(वृत्तसंस्था)*

| वर्ष | आमदारांची संख्या |
|---|---|
| २०१४ | १,०३५ |
| २०१५ | ९९७ |
| २०१६ | १,०५३ |
| २०१७ | १,३६५ |
| २०१८ | १,१८४ |
| २०१९ | १,१६० |
| २०२० | १,२०७ |
| २०२१ | १,२७८ |
| २०२२ | १,२८९ |
| २०२३ | १,४४१ |
| २०२४ | १,५८८ |
| २०२५ | १,६५४ |

**२०२५ मध्ये १,६५४ आमदारांची संख्या ही भाजपाची आतापर्यंतची सर्वाधिक आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# स्वबळाच्या संधीचा समय

डोळे मारणे, खाणाखुणा करणे, टाळी देणे, कटोरा, पालखीचे भोई हे गेल्या दहा-बारा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात रूढ झालेले काही नवे शब्द आहेत. या शब्दांच्या निर्मितीचे आणि उपयोगाचे सारे श्रेय उद्धव ठाकरे आणि त्यांचे बंधू, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना द्यावे लागेल. कारण या शब्दांची देवाणघेवाण फक्त उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातच होत होती. महाराष्ट्रात अन्य अनेक राजकीय पक्षांनीदेखील निवडणुकीच्या राजकारणातील सोयीसाठी तडजोडी केल्या, आघाड्या केल्या आणि मतांच्या राजकारणात बेरजेची गणिते जुळविण्यासाठी समझोतेदेखील केले. पण त्यांच्या राजकारणात कधीच या शब्दांना मात्र थारा नव्हता. कारण महाराष्ट्राच्या राजकारणाचा बाजच वेगळा आहे. या राज्यात एकमेकांना मनसोक्त दूषणे देऊनही, निवडणुकीची अपरिहार्यता ओळखून पुन्हा खांद्याला खांदा लावून एकत्र येणे, गळ्यात गळे घालणे आणि आघाड्यांना वैचारिक वारशाचा मुलामा देत त्यांचे समर्थन करणे असे प्रकार याआधी अनेकदा झालेले आहेत. सध्याही होत आहेत आणि भविष्यातही तसे पाहावयास मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. शरद पवार हे अशा राजकारणाचे साक्षात उदाहरण आहेत. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी मतभेद झाल्यानंतर काँग्रेसमधून बाहेरचा रस्ता दाखविला गेल्यावर त्यांनी स्वतःची वेगळ्या पक्षाची स्वतंत्र चूल मांडली, पण आपला पक्ष स्वबळावर कधीच महाराष्ट्रात सत्ता स्थापन करू शकणार नाही याची खात्री असल्यामुळे त्यांनीही पुन्हा काँग्रेसच्या वळचणीलाच आसरा घेत सत्तेची फळे चाखली. तथापि, त्यांच्या या राजकीय अपरिहार्यतेत, डोळे मारणे किंवा टाळ्या देणे, खाणाखुणा करणे वगैरे प्रकारास थारा दिला गेला नाही. शरद पवार हे आपल्या पक्षास स्वबळावर कधीच सत्तेपर्यंत घेऊन जाऊ शकत नाहीत, हे त्यांच्या स्वतंत्र पक्षस्थापनेपासून प्रत्येक निवडणुकीत सिद्धच झालेले असले, तरी सत्तेच्या राजकारणात आपला पक्ष केंद्रस्थानी ठेवण्याचे राजकीय कौशल्य त्यांच्याकडे असल्याने व त्यांच्या पक्षासोबत कितीही मतभेद असले तरी पवार यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीविषयी मात्र त्यांच्या विरोधकांतही आदराची भावना असल्याने कोणत्याही राजकीय परिस्थितीत त्यांना प्रसंगी कोणत्याही अन्य पक्षाच्या कुबड्या मिळू शकतात व ते कोणत्याही राजकीय तडजोडीनिशी सत्तेत सहभागी होऊ शकतात, हेही वारंवार सिद्ध झाले आहे. त्यांच्या राजकारणास संधिसाधू राजकारण असेही म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात तो त्यांचा समन्वयवादी स्वभाव आहे व त्यांच्या या समन्वयवादी स्वभावाची महाराष्ट्रास चांगलीच ओळख आहे. म्हणूनच, त्यांचे राजकारण नेहमीच अनाकलनीय राहिले असले, तरी त्यांनी वाऱ्याची दिशा ओळखून सत्तेच्या सोयीचा रस्ता धरल्यास त्याचे फारसे आश्चर्यही लोकांस वाटेनासे झाले आहे. ठाकरे यांच्या बाबतीत मात्र तसे नाही. तसे पाहता, पवार आणि ठाकरे यांच्या सत्तेच्या राजकारणात बरेचसे साधर्म्य आहे. ज्याप्रमाणे पवार यांना कधीही स्वबळावर सत्ता मिळवणे साधले नाही, त्याप्रमाणे शिवसनेच्या स्थापनेपासून या पक्षासही स्वबळावर सत्ता संपादन करणे जमलेले नाही. त्यामुळे या पक्षानेही वेळोवेळी युती आणि आघाड्यांचाच आसरा घेत आपल्या पक्षास सत्तेच्या जवळपास राखण्याची धडपड केली. राज्याच्या सत्तेचा वाटा शिवसेनेस काहीसा उशिराच मिळाला, तेदेखील भाजपसोबतच्या युतीमुळेच शक्य झाले. तथापि शिवसेनेच्या सत्ताकारणाचे मुख्य लक्ष्य म्हणजे मुंबई, ठाणे महापालिका हेच राहिले. मुंबई महापालिका ही देशातील सर्वांत श्रीमंत महापालिका असल्याने, सोन्याचे अंडे देणारी ही कोंबडी आहे असे म्हटले जाते. राजकारणात याचा अर्थ सर्व जण जाणतात. म्हणूनच या महापालिकेचा कारभार आपल्या हाती असावा यासाठी ठाकरेंच्या शिवसेनेने सातत्याने सत्तेच्या राजकारणात तडजोडी केल्या. बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीत त्यांनी या तडजोडींच्या राजकारणातही आपल्या पक्षाची आब राखली होती. ते कधीच युतीचा कटोरा घेऊन अन्य पक्षांकडे गेले नसले तरी काँग्रेस, मुस्लिम लीग, भाजपा, रिपब्लिकन गटांसोबत हातमिळवणी करण्याचे राजकारण त्यांनीही केले होते. पुढे त्यांच्या पश्चात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना तर कटोरा घेऊन युती आणि आघाडीसाठी अनेक पक्षांच्या दारी गेल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर हाती राहिलेल्या पक्षाचा गट सावरण्यासाठी महाविकास आघाडीच्या नावाने बांधलेली मोट टिकविण्याकरिता प्रयत्नांची शर्थ करावी लागत आहे. प्रत्यक्षात मात्र, त्यात फारसे यश मिळेल अशी चिन्हे आता राहिलेली नाहीत आणि दरम्यानच्या काळात काँग्रेस, शरद पवार गट व सोबत घेतलेल्या लहानमोठ्या गट, पक्षांच्या कुबड्यांचाही आधार राहील याचीही शाश्वती राहिलेली नाही. महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना उद्धव ठाकरे यांचा गट एकाकी पडणार हे स्पष्ट होऊ लागले आहे. ठाकरे यांचा पक्ष सत्तेच्या आसपास असताना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष त्यांच्या लेखी संपलेला पक्ष होता. मात्र, राज व उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकत्र यावे यासाठी काही ठाकरेनिष्ठांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू झाल्याने, टाळ्या देणे, डोळे मारणे हे शब्द रूढ झाले आणि आता एकाकीपणा असह्य झाल्यामुळे दोघांसह एकत्र येणे भाग पडले आहे. आता तर, महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी वाजणारही नाही हे काँग्रेसच्या पवित्र्यावरून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा व नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत नेमका हाच फायदा ठाकरेंच्या गटाला मिळाला होता. ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत आघाडी केल्यास काँग्रेसचा हक्काचा मतदार असलेल्या अल्पसंख्यक मतपेढीचा त्यांना फायदा मिळेल, ही काँग्रेसची भीती आहे. या मतांवर ठाकरे गटाचा डोळा आहे, ही बाब लपून राहिलेली नाही. त्याच हिशेबाने उद्धव ठाकरे यांनी धर्माच्या राजकारणास सोडचिठ्ठी देण्याचे जाहीरही केले होते. ठाकरे यांच्यासोबत आघाडी केली तर काँग्रेसच्या हक्काची ही मते त्यांना मिळतीलच, पण राज व उद्धव ठाकरे यांच्या राजकारणामुळे फरफट होऊन नुकसान होईल ही काँग्रेसची भीती आहे. महाराष्ट्रात ठाकरे गटासोबत युती नाही, हे काँग्रेसचे धोरण जवळपास जाहीरही झालेले असल्याने आता ठाकरे यांच्या गटात अस्वस्थता तर आहेच, पण सोबतीला कोणीच नसल्याने व राज ठाकरे यांच्या सोबतीचा नेमका फायदा स्पष्ट नसल्याने, स्थापनेपासूनच्या इतिहासात बहुधा पहिल्यांदाच ठाकरे यांना एकहाती निवडणुका लढाव्या लागणार आहेत. युतीचा कटोरा फेकला, दुसऱ्यांच्या पालख्या वाहून नेणे बंद केले, असे म्हणत ठाकरे यांनी भाजपला एके काळी धारेवर धरले होते, पण भाजपची साथ सोडल्यावर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची पालखी वाहणे या पक्षाच्या नशिबी आले. त्यांच्या लेखी संपलेल्या मनसेकडे युतीचा कटोरा घेऊन जाण्याची वेळ आली. मुंबई महापालिका आणि राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपप्रणीत महायुतीची मोर्चेबांधणी सुरू असताना, महाविकास आघाडीत मात्र पडझड सुरू झाली आहे. मुंबईतील निवडणूक स्वबळावर लढविण्याचे काँग्रेसने शनिवारीच जाहीर केले आहे. काँग्रेसचा पारंपरिक मानला जाणारा मुस्लिम मतदार ठाकरे यांच्यासोबतच्या आघाडीबाबत नाराज असल्याची जाणीव काँग्रेसला झाली आहे. काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढविण्याचा स्पष्ट निर्णय जाहीर केल्याने, हा मतदार पुन्हा आपल्याकडे वळेल याचीही काँग्रेसला खात्री आहे. नेमक्या याच मतांचा फायदा ठाकरे यांच्या शिवसेनेस मिळाला होता. आता हे गणित बिघडणार आहे. हिंदुत्वाच्या मुद्यावर सोडचिठ्ठी दिल्याची ग्वाही उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीत प्रवेश करतानाच दिली होती. किंबहुना, धर्माचे राजकारण केले ही चूकच होती अशी कबुलीही दिली होती. काँग्रेसच्या पारंपरिक अल्पसंख्यक मतदारांना आपलेसे करण्याकरिताच त्यांनी ही भूमिका घेतली असावी, अशी कुजबूज काँग्रेसमध्ये सुरू होती. पुढे महाविकास आघाडीसोबत ठाकरे यांच्या गटाने लढविलेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांत हे स्पष्ट झाल्याने, या गटास त्या फायद्याची संधी मिळू नये याकरिता काँग्रेसची ही स्वबळाची नीती ठाकरे यांच्या राजकारणास कोणत्या नव्या दिशेने घेऊन जाते, ते स्पष्ट होण्यासाठी आता फार काळ प्रतीक्षा करावी लागणार नाही.

## आंतरराष्ट्रीय

# पाकिस्तान हुकूमशाहीच्या दिशेने

प्रा. जयसिंग यादव

पाकिस्तान संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करत आहे. त्यासाठी संसदेत २७ वे दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले आहे. पाकिस्तानी सरकारने सैन्यांमध्ये चांगला समन्वय स्थापित करण्यासाठी हे पद तयार केले जात आहे, असे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते भारताचे अनुकरण आहे. भारतात जसे सरसेनाध्यक्षपद तयार करण्यात आले, तसे पाकिस्तानमध्ये हे पद तयार करण्यात आले; परंतु भारतात लोकशाही आहे आणि इथल्या सरसेनाध्यक्षांना पंतप्रधान आणि राष्ट्रपतींपेक्षा जास्त अधिकार नाहीत. पाकिस्तानमध्ये असीम मुनीर यांच्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली असून, आता त्यांच्या एकाच आदेशाखाली सेना, नौदल आणि हवाई दल काम करू शकतील. सामान्यतः, लष्करप्रमुखांना संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्त केले जाते. पंतप्रधान आणि राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती त्यांची नियुक्ती करतात. संरक्षण दलांचे प्रमुख हे तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख म्हणूनही ओळखले जातात; परंतु 'ऑपरेशन सिंदूर'मुळे हादरलेल्या पाकिस्तान सरकारने घाईगडबडीत केलेल्या घटनादुरुस्तीमुळे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान सरकारने मुनीर यांना 'फिल्ड मार्शल' म्हणून बढती दिली. 'फिल्ड मार्शल' हे पाकिस्तानी सैन्यातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च पद आहे. आता संविधानात सुधारणा करून मुनीर यांना तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख बनवण्यात आले आहे. या नवीन दुरुस्ती विधेयकांतर्गत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार अध्यक्ष आसिफ अली झरदारी हे मुनीर यांना 'सीडीएफ' पदावर नियुक्त करतील. ही घटनादुरुस्ती पाकिस्तानात लष्करी राजवटीच्या नवीन युगाची सुरुवात आहे.

भारताच्या फाळणीनंतर काही वर्षांनी पाकिस्तानमध्ये पहिला मार्शल लॉ लागू करण्यात आला. १९५८ मध्ये जनरल अयुब खान यांनी राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांना काढून टाकले आणि मार्शल लॉ लागू केला. १९५८ ते १९७१ पर्यंत चाललेला हा पाकिस्तानचा पहिला लष्करी हस्तक्षेप होता. या काळात २५ मार्च १९६९ रोजी अयुब यांनी पदाचा राजीनामा दिला आणि याह्या खानकडे सत्ता सोपवली. १९७७ मध्ये दुसरा लष्करी उठाव झाला, तेव्हा जनरल झिया-उल-हक यांनी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांचे सरकार उलथवून टाकले. झिया यांचे शासन १९७७ ते १९८८ पर्यंत चालले. १९९९ मध्ये तिसरा उठाव झाला. भारताकडून कारगिल युद्ध हरल्यानंतर जनरल परवेझ मुशर्रफ आणि तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यात संघर्ष निर्माण झाला. यामुळे १९९९ मध्ये मुशर्रफ यांनी लोकशाही सरकार उलथवून टाकले. मुशर्रफ यांचे शासन २००८ पर्यंत टिकले. हा सर्व इतिहास पाहिला, तर पाकिस्तानमध्ये सत्तेची चावी लष्कराकडे आहे, हे स्पष्ट होते. असे असले, तरी २००८ पासून पाकिस्तानमध्ये कोणत्याही लष्करी अधिकाऱ्याने सत्तेचे सूत्र हाती घेतलेले नाही. अर्थात सत्तेची सूत्रे नेहमीच लष्करी मुख्यालयात बसलेल्या जनरलकडे राहिली आहेत.



पाकिस्तानमध्ये लोकशाही सरकारने लष्कराला आव्हान देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते उलथून टाकण्यात आले. संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी अलिकडेच सध्याच्या सरकारचे वर्णन 'हायब्रिड सरकार' असे केले. हायब्रिड म्हणजे ते अशा व्यवस्थेचा संदर्भ देतात, ज्यामध्ये लष्करी नेतृत्व आणि नागरी सरकार एकत्रितपणे निर्णय घेतात. आता मात्र ही परिस्थिती बदलणार आहे. मे महिन्यात भारतासोबत झालेला पाकिस्तानचा लष्करी संघर्ष आणि अफगाणिस्तानसोबतच्या अलिकडच्या सीमा तणावामुळे संरक्षणाचे महत्त्व वाढले असून खर्चाची गरजही वाढली आहे. १९७३ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांनी लष्करप्रमुख मुनीर यांची 'फिल्ड मार्शल' म्हणून नियुक्ती केली आहे आणि आता त्यांना 'संवैधानिक संरक्षण' प्रदान करणे आवश्यक होते. त्यासाठी घटना दुरुस्ती करण्यात आली. गेल्या वर्षी पाकिस्तान लष्कर कायद्यातील दुरुस्तीने लष्करप्रमुखांचा कार्यकाळ वाढवला होता; परंतु त्यांच्या नियुक्तीच्या वेळी मुनीर यांच्यासाठी तीन वर्षांची अधिसूचना जारी करण्यात आली होती. 'ऑपरेशन सिंदूर'ची धास्ती घेतलेल्या पाकिस्तानने घटनेमध्ये २७ वी दुरुस्ती केली. हे करताना तिथल्या सरकारने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. लष्करप्रमुखांकडे जादा अधिकार सोपवताना पाकिस्तानचे लोकनियुक्त सरकार त्यांच्या हातची कळसूत्री बाहुली ठरणार आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारावर अंकुश आला आहे. नवीन कायदा लष्करप्रमुखांना निरंकुश सत्ता देईल.

या निर्णयाविरोधात माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पक्ष रस्त्यावर उतरला असला, तरी त्याला काहीच अर्थ नाही. हे विधेयक सशस्त्र दलांशी संबंधित असलेल्या संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करते. या विधेयकांतर्गत राष्ट्रपती पंतप्रधानांशी सल्लामसलत करून लष्करप्रमुख आणि संरक्षणप्रमुखांची नियुक्ती करतील. लष्करप्रमुख आता संरक्षण दलाचेही प्रमुख असतील. शिवाय, संरक्षण प्रमुख पंतप्रधानांशी सल्लामसलत करून राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या प्रमुखाची नियुक्ती करतील. मुनीर यांना आधीच 'फिल्ड मार्शल'चा दर्जा देण्यात आला होता. ताज्या संविधान दुरुस्ती विधेयकामुळे त्याला घटनात्मक मान्यता मिळाली आहे. मुनीर यांच्याकडे 'फिल्ड मार्शल'चे पद आणि विशेषाधिकार आयुष्यभर राहतील. याव्यतिरिक्त, संयुक्त 'चीफ ऑफ स्टाफ कमिटी'च्या अध्यक्षपदाची पदवी रद्द केली जाईल. नवीन कायदा सरकारला फिल्ड मार्शल, एअर फोर्स मार्शल आणि 'ॲडमिरल ऑफ द फ्लीट' या पदांवर अधिकाऱ्यांना बढती देण्याचा अधिकार देतो. पाकिस्तानच्या इतिहासात या पदावर बढती मिळालेले ते दुसरे सर्वोच्च लष्करी अधिकारी बनले. याव्यतिरिक्त, लष्करी समन्वय सुधारण्यासाठी त्यांनी संरक्षण दल प्रमुख पद निर्माण करण्याची योजना आखली. नव्या घटनादुरुस्तीनंतर पंतप्रधानही 'फिल्ड मार्शल'ला काढून टाकू शकत नाहीत. पंतप्रधान 'राष्ट्रीय स्ट्रॅटेजिक कमांड'च्या कमांडरची नियुक्ती करतील. त्यामुळे पाकिस्तानच्या अणु कमांड रचनेवर लष्करी नियंत्रण स्थापित होईल. शिवाय, पंतप्रधानांना 'फिल्ड मार्शल'ची पदवी काढण्याचा, महाभियोग चालवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राहणार नाही. निवृत्तीनंतर फिल्ड मार्शलना अतिरिक्त जबाबदाऱ्या देता येतील.

शरीफ यांच्या सरकारने लष्करप्रमुख आणि फिल्ड मार्शल यांच्या पदांना संवैधानिक दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मुनीर यांच्या अधिकारांमध्ये वाढ करण्यासाठी एक घटनात्मक सुधारणा आणण्यात आली आहे. संसदेत २७ व्या घटनात्मक दुरुस्तीमुळे लष्करप्रमुखांना प्रचंड अधिकार मिळणार आहेत. या दुरुस्तीमुळे संरक्षण दल प्रमुख हे एक नवीन पद निर्माण होईल. मुनीर हे देशाच्या राजकीय आणि न्यायव्यवस्थेला हादरवून टाकणाऱ्या एका हालचालीत पुढे जात आहेत. त्यांच्याकडे पंतप्रधानांपेक्षा जास्त अधिकार असल्याचे म्हटले जात असले, तरी ते २७ व्या घटनादुरुस्तीद्वारे स्वतःसाठी आजीवन सुरक्षा भिंत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या दुरुस्तीमुळे 'फिल्ड मार्शल'ना आजीवन विशेषाधिकार मिळतील आणि त्यांच्याविरुद्ध आयुष्यभर कोणताही खटला दाखल करता येणार नाही. देशाला झालेल्या नुकसानासाठी त्यांना जबाबदार धरले जाण्याची भीती आहे, म्हणून ते या वादग्रस्त दुरुस्तीद्वारे स्वतःसाठी आजीवन संरक्षण सुनिश्चित करत आहेत. या हालचालीवरून असे दिसून येते, की पाकिस्तानचे लष्करप्रमुख आता जबाबदारीच्या पलीकडे राहू इच्छितात. अर्थात या खेळामागे अमेरिकेचा हात असू शकतो. मात्र एखादा फुगा अशा प्रकारे किती फुगवता येतो, याला मर्यादा असतात, हे पाकिस्तानी प्रशासक विसरलेले दिसतात.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# लोणार सरोवराचे संशोधन आवश्यक

नितीन शिरसाट

खाऱ्या पाण्याचे उल्कापाताने हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेले जागतिक दर्जाचे सरोवर बुलढाणा जिल्ह्यात आहे. विज्ञान, भूगर्भशास्त्र, पर्यावरण, खगोलशास्त्र तसेच पौराणिक दृष्टीने याचे अपूर्व महत्त्व आहे. या अद्वितीय परिसंस्थेत दुर्मिळ सजीव आणि अजैव घटकांचा समावेश असून, देश-विदेशातील शास्त्रज्ञ सरोवराच्या जैवविविधतेचा सखोल अभ्यास करत आहेत. या सरोवरास अनेक पर्यावरणीय समस्यांचा सामना करावा लागत आहे. वाढती जलपातळी, बाहेरून आलेल्या मासे प्रजातींचा शिरकाव आणि नैसर्गिक कड्यांचे ढासळणे या बाबी चिंतेचा विषय बनल्या आहेत. अतिवृष्टीमुळे सरोवराच्या पूर्वेकडील कडा कोसळू लागल्या आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी सरोवरात मिसळत असून पाण्याच्या प्रवाहात बदल झाला आहे. यावर्षी सरोवरातील जलपातळी वाढल्याचे दिसून आले. कमळजा देवी मंदिर परिसरापर्यंत पाणी पोहोचले असून यामागे मुसळधार पाऊस, झऱ्यांची सक्रियता आणि जमिनीच्या पाझर क्षमतेतील बदल ही प्रमुख कारणे आहेत. अलिकडे सरोवरातील काही भागांत मासे प्रजाती आढळल्या आहेत. बाहेरील पाण्यातून या प्रजातींचा शिरकाव झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. या नवीन प्रजातीमुळे परिसंस्थेतील अन्नसाखळी आणि सूक्ष्मजीव संतुलन बिघडवू शकतात. पाण्याच्या वाढलेल्या प्रमाणामुळे सरोवरातील नैसर्गिक रासायनिक व भौतिक गुणधर्मामध्ये बदल होत आहेत. पीएच मूल्य, क्षारता, विरघळलेला ऑक्सिजन, रंग आणि वास यामध्ये झालेला फरक सरोवरातील सूक्ष्मजीव, वनस्पती आणि प्राणी यांच्या अस्तित्वावर परिणाम करू शकतो. जर हे बदल दीर्घकाळ टिकले, तर सरोवरातील मूळ जैवविविधतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. लोणार सरोवराचे संवर्धन शाश्वत आणि शास्त्रीय पद्धतीने होण्यासाठी स्थानिक लोकसहभाग, शैक्षणिक संस्था, प्रशासन यांचा समन्वय आवश्यक आहे. सरोवराच्या सर्व दिशांच्या कड्यांचे संरक्षण व दुरुस्ती नियमित करावी. जलपातळी वाढण्याची कारणे शोधून जलप्रवाहावर नियंत्रण आणावे. पाण्याच्या गुणवत्तेची सातत्याने तपासणी करण्यासाठी लोणार येथे स्थायी किंवा फिरती प्रयोगशाळा असावी. बाहेरून येणाऱ्या प्रजातींवर शासनस्तरावर नियमावली तयार करून नियंत्रण ठेवावे. स्थानिक तज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, शैक्षणिक संस्था, वन व आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच सेवाभावी संस्थांचा समावेश असलेली संवर्धन समिती स्थापन करावी. टाळेबंदी काळात दोन वर्षे कमी झालेल्या मानवी हस्तक्षेपाने सरोवराच्या पाण्यात हे सूक्ष्मजीव वाढण्यास मदत झाली, ज्यामुळे पाण्याचा रंग बदलला. सूक्ष्मजीवांच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या वाढीमुळे सरोवराच्या पाण्याचा नैसर्गिक हिरवा रंग बदलून गुलाबी किंवा लालसर झाला होता.

गेल्या काही वर्षांपासून या सरोवरात काही आश्चर्यकारक बदल होत आहेत. पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन झाले. त्याचा परिणाम म्हणून पाण्यात क्षाराचे आणि आम्लाचे प्रमाणही वाढले. हे तिथल्या जीवांसाठी पोषक मानले जाते. हेच जीव सूर्याच्या तीव्र किरणांपासून बचाव करण्यासाठी गुलाबी रंग सोडत असतात. त्यामुळेच हे पाणी गुलाबी दिसते. मानवी हस्तक्षेपामुळे या सरोवराला हानी पोहोचत आहे. हे लक्षात आल्यानंतर हा प्रश्न उच्च न्यायालयात पोहोचला. त्या अनुषंगाने मग या सरोवरात दूषित पाणी सोडले जाणे, भोवतीचे वाढते अतिक्रमण, सरकारचे या संचिताकडे दुर्लक्ष होत असल्याची व्यथा, प्रशासकीय उदासीनता आदी मुद्दे चर्चेला आले. लोणार सरोवराचे पाणी समुद्रापेक्षाही अधिक खारट असल्याने पूर्वीच्या काळी येथे कोणतेही मासे टिकू शकत नव्हते. यंदा अतिवृष्टीमुळे नाल्यांद्वारे गोडे पाणी आणि सांडपाणी सरोवरात मिसळल्याने खारटपणा कमी झाला. परिणामी पाण्याचा पीएच स्तर घटल्याने काही मासे किनाऱ्याजवळ टिकू शकतात, असे जाणकार तज्ज्ञांचे म्हणणे आहे. लोणार येथे महिनाभरापूर्वीच सहपालकमंत्री संजय सावकारे यांनी सरोवरात मासे असूच शकत नाहीत असे ठाम विधान केले होते. सरोवराची त्यांनी स्वतः पाहणी केली होती. आता पारदर्शक झालेल्या पाण्यात विविध आकारांचे मासे फिरताना स्पष्ट दिसत असल्याने या वक्तव्यावर वाद निर्माण झाला आहे. परिणामी प्रशासनाचे सरोवर मासेविरहित आहे हे विधान आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. जागतिक दर्जाच्या या सरोवराचे सर्व प्रकारचे संवर्धन होऊन संशोधकांनी होणाऱ्या नैसर्गिक बदलाची माहिती जाणून घेणे आवश्यक झाले आहे.

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

# तरुणाईचा आजार

विजय पांढरीपांडे

काही दिवसांपूर्वी नवा महागडा आय फोन बाजारात आला. तो विकत घेण्यासाठीची तरुणाईची गर्दी टीव्हीवर दाखवली गेली. ती बघता अनेक प्रश्न निर्माण झाले. या गर्दीकडे बघता भारत हा गरीब देश आहे, येथील अनेक लोक अजूनही सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत हे विधान पटणारे नाही. चेहऱ्यावरून व्यक्तीची आर्थिक, सामाजिक परिस्थिती कळत नाही हे मान्य केले तरी लाखाच्या घरात किंमत असणाऱ्या आय फोनसाठीची ही गर्दी बघून आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. पूर्वी अशी गर्दी दिलीप कुमारचा 'गंगा जमुना' किंवा राजकपूरचा 'संगम' चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा तिकिटाच्या खिडकीवर बघितल्याचे स्मरते. आता या खिडक्या ओस पडल्या आहेत. गर्दीची दिशा बदलली आहे. गरजा बदलल्या आहेत.

ही तरुण मुले शाळा, कॉलेजच्या वर्गात मात्र दिसत नाहीत. शाळा, कॉलेजच्या ग्रंथालयात, प्रयोगशाळेत दिसत नाहीत. याही जागा ओस पडल्या आहेत. पण कुणी एखाद्या मोर्चाचे आयोजन केले, आंदोलन छेडले तर यांना याच मोबाईलवरून मेसेज व्हायरल होतो. मग आपली प्राथमिकता, अभ्यास, नोकरी सारे सोडून ती अशा आंदोलनात घोषणा देताना दिसतात. गळ्यात त्या मोर्चाच्या गरजेप्रमाणे विशिष्ट रंगाचे उपरणे, हातात वेळोवेळी बदलणारा झेंडा घेऊन नारे लावताना दिसतात. कधी कधी अशी आंदोलने अनेक दिवस चालतात. किती मनुष्य तास यात वाया घालवले जातात याचा हिशेब न केलेला बरा! आश्चर्य म्हणजे या तरुणाईला आपले भले बुरे कशात आहे हे कळत नसेल असे आपण गृहीत धरले (जे मुळात चुकीचे आहे), तरी त्याच्या पालकांचे काय? ते कसे जाऊ देतात यांना? ते काहीच विचारपूस का करीत नाहीत? की व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली दिलेली ती सूट आहे? आपला मुलगा, मुलगी कुठे जातात, काय करतात, कॉलेजमध्ये का जात नाहीत? शिक्षणाकडे दुर्लक्ष का करतात हे मोर्चात, आंदोलनात सामील होणाऱ्या तरुणाईच्या पालकांना कळत कसे नाही? स्वतःला नेते, पुढारी, आका, लोक प्रतिनिधी म्हणवणारी ही स्वार्थी, चलाख मंडळी तरुणाईला हाताशी धरून आपली पोळी भाजून घेतात, अडचणीच्या, गरजेच्या वेळी या तरुणाईला चक्क वाऱ्यावर सोडतात हे साधे धडधडीत सत्य कुणालाच कसे कळत नाही?



एकीकडे गुणवत्तेचा ध्यास धरणारे नवे शैक्षणिक धोरण, विश्वगुरू होण्याच्या घोषणा, २०४७ ची सोनेरी स्वप्ने, स्कील डेव्हलपमेंट प्रकल्प, मेक इन इंडियाचे नारे, स्वदेशीचे वारे, आपल्या संस्कृती, परंपरेचा अभिमान, एआयसारख्या नव्या तंत्राचा ध्यास, धार्मिक, राष्ट्रीय अभिमानाच्या उद्घोषणा... अन् दुसरीकडे ज्यांच्यासाठी हे सगळे चालले आहे त्याच तरुणाईचा हा बेछूट, बेबंद व्यवहार! याचा ताळमेळ कसा लावायचा हा माझ्यासारख्या शिकूनही समज नसलेल्या व्यक्तीला प्रश्न पडतो. विचार करूनही या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. हे कोडे सुटत नाही. आपल्याकडे शिक्षण सुविधा कितीतरी पटीने वाढल्या. इंजिनीयरिंग, मेडिकल अशा सर्व क्षेत्रांत प्रवेश संख्या कितीतरी पटींनी वाढली. शिष्यवृत्ती, आर्थिक साहाय्य, फी माफी, राहण्यास वसतिगृहे अशा संख्या सुविधाही कितीतरी पटीने वाढल्या. प्रत्येक सरकार असे दावे करते गेल्या दहा वर्षांत हे झाले, ते झाले याचे! पण ज्यांच्यासाठी हे सगळे चालले आहे, सरकारी तिजोऱ्या खाली होताहेत, ते तरुण याचा किती उपयोग करून घेतात? ते नव्या शैक्षणिक धोरणात किती रस घेतात? किती तरुण चाळीस हजाराची शिष्यवृत्ती घेऊन, ध्यास घेतल्यासारखे जागतिक दर्जाचे संशोधन करतात? सरकारी योजनांचा फायदा लाटतात. पण आपल्या कौशल्याचा कुठल्या उद्योग व्यवसायासाठी उपयोग करतात? वृत्तपत्रात येणाऱ्या एक-दोन अपवादात्मक बातम्या सोडल्या तर आपण या तरुणाईला हाताशी धरून गेल्या एक-दोन दशकात आपले सामाजिक जीवनमान उंचावणारे, जगावर प्रभाव टाकणारे कोणते संशोधन केले? किती नावीन्यपूर्ण उद्योग, व्यवसाय देशहितासाठी निर्माण केले? कारण खरेच असे झाले असते, होत असते तर बेरोजगारीची समस्याच राहिली नसती. प्रत्येक हाताला काम असते. प्रत्येक जण व्यस्त दिसला असता. समाधानी आनंदी असता. आंदोलन, मोर्चासाठी कुणाकडेही फावला वेळ राहिला नसता. नेते, पुढारी यांच्यामागे बेकार तरुणाई भरकटली नसती. हा सगळा विरोधाभास, पॅरोडॉक्स नाही वाटत तुम्हाला?

एकीकडे आम्हाला गुणवत्ता असून प्रवेश मिळत नाही म्हणून ओरड करायची, दुसरीकडे आम्ही शाळा, कॉलेजच्या हजारो जागा रिक्त अशा बातम्या वाचायच्या? एकीकडे सरकारने किती हजारो, कोटींचे उद्योग राज्यात, देशात आणले असे दावे करायचे अन् दुसरीकडे बेकार तरुणाईला जॉब मिळत नाही म्हणून त्यांनी आंदोलनात सहभागी व्हायचे? महागड्या मोबाईल खरेदीसाठी झुंडीने रांगेत उभे राहायचे? एकीकडे नवे शैक्षणिक धोरण राबवायच्या गप्पा अन् दुसरीकडे अनेक प्राध्यापकांच्या जागा रिक्त? एकीकडे आयआयटी, एनआयटीची संख्यावाढ अन् दुसरीकडे जागतिक नामांकनात विद्यापीठांची घसरण, एकीकडे स्वच्छ भारतचे नारे, दुसरीकडे घाणीचे, रोगराईचे साम्राज्य, एकीकडे उंच, लांब समृद्धी मार्ग अन् दुसरीकडे शहरातील रस्त्यावरचे खड्डे, त्याने होणारे अपघात, एकीकडे आपल्या सोज्वळ, एकत्र कुटुंब पद्धतीचे दाखले अन् दुसरीकडे लिव्ह इन, घटस्फोटाचे वाढते प्रमाण... या सगळ्यांचा मेळ कसा लावायचा? हीच ती वेळ. हाच तो क्षण. सर्व राष्ट्रप्रेमी, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, प्रभावी नेते, उद्योजक, मानसशास्त्रज्ञ, डॉक्टर्स, न्यायमूर्ती यांनी एकत्र बसून विचारमंथन करावे. जे झाले गेले ते मागे सोडायचे, विसरायचे. आता पुढचा, भविष्याचा विचार करायचा फक्त! कुठे कुणाचे काय चुकते हे शोधायचे. ते कसे बदलायला हवे याच्यावर चिंतन करायचे. लहान मुले, मुली तरुणाई, यावर लक्ष केंद्रित करायचे. तीच देशाची, भविष्याची खरी आशा. तेच आपले आधारस्तंभ. ते मूळ घट्ट हवे आधी... त्या पायावर या देशाचे भवितव्य उभे राहणार. त्याकडे अशी डोळेझाक नको. या तरुणाईला वेळीच आवरायला हवे, सावरायला हवे. एकदा ही शक्ती हातातून निसटली, हाताबाहेर गेली की संपलेच सगळे. ती नव्या गृहयुद्धाची नांदी ठरेल कदाचित! आपण अवती भवती बघतोच काय चाललेय ते. कुठलीही समस्या राक्षसी रूप धारण करण्या अगोदर वेळीच सोडवायची असते. ती केवळ सरकारची जबाबदारी नाही. शेवटी सरकार देखील आपलेच. आपल्यालाही जबाबदारी झटकून चालणार नाही हेही तितकेच खरे!

७६५९०८४५५५

## आकर्षक गुलाब

१५ नोव्हेंबर २०२५ च्या तरुण भारतमधील आकांक्षा पुरवणीत प्रकाशित 'फुलांचा राजा गुलाब' हा निशिकान्त मायी लिखित लेख वाचनीय असून त्यांनी गुलाबांच्या अनेक प्रकारांची माहिती थोडक्यात विशद केली आहे. प्रत्येकाला गुलाब फुलाविषयी प्रेम असतेच. त्यामुळे मायी यांनी गुलाबाबाबत असणाऱ्या अनेक शंकांचे निरसन केले आहे. आपण बाजारातून फूल असलेली रोपटी घरी आणून लावतो. अनेकदा ती आपल्या घरात जगत नाहीत. त्याची वाढण्याची प्रक्रिया कळल्यामुळे आशा पल्लवित झाल्या आहेत. गुलाबापासून निर्मित अनेक उपयोगी पदार्थ जसे गुलकंद, गुलाबजल, अत्तर, सरबत आपण दैनंदिन जीवनात वापरतो. गुलाब प्रक्रिया उद्योगातून दरवर्षी करोडोची उलाढालही होते. जेथे हा उद्योग असतो तेथे अर्थातच सुगंधाची बरसात होत असते. गुलाबाचे सुंदर फूल पाहताच उदासीनता दूर होते. अनेक कवींना पण याची भुरळ पडली आहे, हे सांगणे न लगे. निशिकान्त मायी यांचा 'गुलदस्ता' वाचल्यानंतर आपणही फुलांची अगणित माहिती जमा करावी, असे सहज मनाला वाटून गेले. सोबतच बागबगिच्यांना भेट देण्याचा मोह झाला. वाचनीय माहितीबद्दल लेखकाचे अभिनंदन आणि आभार!

**अशोक ढाकूलकर**/७६६६१६०९८६

## वाचक पत्रे

### एकमुखी पाठिंबा असलेला उमेदवार असावा

नगर पालिका निवडणूक उत्सव सुरू झाला असून, नगराध्यक्ष, नगरसेवक विविध वॉर्डांत अनेक उमेदवारांची नोंदणी केली आहे. या वाढत्या उमेदवारांच्या संख्येमुळे पक्षांमध्ये गटबाजी आणि मतांची फाटाफुटीची चिंता वााढली आहे. यामुळे विविध राजकीय पक्षाने एकत्र येऊन, एकाच उमेदवाराला खंबीर पाठिंबा देण्याची गरज आहे. ज्यामुळे मतदारांमध्ये स्पष्टता येईल आणि विकासकामांना गती मिळेल, अशी भूमिका राजकीय पक्षांनी घेण्याची आवश्यकता आहे. नगर पालिकेच्या निवडणुकीत अनेक उमेदवार उभे राहिल्याने मतांची विभागणी होण्याची शक्यता निर्माण होते, ज्याचा फायदा विरोधी पक्षांना मिळू शकतो. या पृष्ठभूमीवर पक्षातील नेते आणि कार्यकर्ते पक्ष एकता साधण्यासाठी संवाद समन्वय यामुळे पक्षाची ताकद वाढेल आणि विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करता येईल. मतदारांनी एकजूट असलेल्या पक्षाला प्राधान्य द्यावे, अनावश्यक मतविभाजन टाळावे. नगरपालिकेतील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते विकास, आरोग्य सुविधा अशा अनेक मुद्यांवर मतदारांची अपेक्षा असते. अशा वेळी पक्षातील संघटनात्मक एकता आणि एकमत आवश्यक आहे.

उमेदवारांच्या वाढत्या संख्येमुळे पक्षातील गटबाजी अधिकच वाढत असून, या गटबाजीमुळे लोकांना गुणवत्तापूर्ण नेतृत्व मिळण्यास अडथळा येत असतो. त्यामुळे पक्षांनी आपापसातील मतभेद मिटवून विकासासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. नगर पालिका निवडणुकीत पक्ष एकत्र येऊन एकच उमेदवार पुढे आणल्यास, निवडणुकीत विजय सुनिश्चित होण्याची शक्यता वाढते आणि प्रशासन अधिक सक्षम होण्याचा मार्ग मोकळा होतो, असे मतही मतदार व्यक्त करीत आहे. येणाऱ्या नगर पालिका निवडणुकीत पक्ष एकतेच्या महत्त्वाला विशेष स्थान मिळाले पाहिजे, हेच स्थानिक राजकारणातील सध्याच्या परिस्थितीत सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-४६

मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५

### मन होवो ज्वालाग्राही

मन होवो ज्वालाग्राही ध्वज उंच उंच हा राही ही ग्वाही ॥ धृ.॥

तरुणाकांक्षांचे जे जे मन मोजिल का रुधिराश्रूचे कण
धनदौलतही उधळुन टाकिल घडविल राष्ट्र प्रभावी ॥१॥

संघटनेला मुळि न विसावा सुदीर्घ यत्ने जन मिळवावा
चेतविता स्फुल्लिंगही मंगल होइल तोच विदाही ॥२॥

ह्या सुविचारे ह्या निधरि जनक्षोभाचे फुलवु निखारे
त्या ज्वालेतुन जळुनी जाइल अमुची परवशताही ॥३॥

पाश मृत्युचा निष्ठुर भेसुर मालवील हे प्राण हवे तर
परि अंधारि चमकुनि राहिल हसरी निर्भयता ही ॥४॥

हिंदु तेज हे रसरसताना स्फोटक शक्तीने भरताना
खवळुनि उठता कंपित होइल सैतानी बलशाही ॥५॥

ह्या राष्ट्रास्तव कधि उपवासी कधी विलासी कधि वनवासी
वनि रानींही मंगल होइल स्मरता राष्ट्रध्वजा ही ॥६॥

## महत्वाचे...

### बसमध्ये चढणाऱ्याचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**



शहरातील सात रस्ता येथे कर्नाटकच्या एस टी बसमध्ये चढणाऱ्याचा १० हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला.याबाबत श्रीशैल सिद्राम गडदे (वय ४५, रा. सावळसंगी, ता. इंडी, जि. विजयपूर, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ नोव्हेंबर रोजी साडेचारच्या सुमारास श्रीशैल गडदे हे सात रस्ता येथील कारागिर पेट्रोल पंपाजवळ विजापूरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने गडदे यांच्या खिश्यातील १० हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### किटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

गलंदवाडी (ता. मोहोळ) येथे महिलेने किटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. बालिका देविदास मेटकरी (वय ३०) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी राहत्या घरी अज्ञात कारणावरून बालिका मेटकरी हिने किटकनाशक प्राशन केले. त्यामुळे बालिका यांना त्रास होऊ लागल्याने पती देविदास यांनी त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बुधवार बाजारातून महिलेचे ४० हजार रुपये लंपास

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

बुधवार बाजारात भाजीविक्रि करणाऱ्या महिलेचे ४० हजार रुपये चोरट्याने लंपास केले. याबाबत शितल महेश वाघमारे (वय ४०, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ नोव्हेंबर रोजी शितल वाघमारे या बुधवार बाजारात सालार दुकानाशेजारी भाजी विक्रि करीत होत्या. त्यावेळी सायंकाळच्या सुमारास चोरट्याने शितल वाघमारे यांचे पैसे असलेले पाकिट चोरून नेले. या पाकिटामध्ये सुमारे ४० हजार रुपये होते, अशी नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### लाकडी सिलेंडर डोक्यात पडल्याने जखमी

**सोलापूर-** चादरीच्या कारखान्यात काम करीत असताना लाकडी सिलेंडर डोक्यात पडल्याने ४२ वर्षीय व्यक्ती जखमी झाला आहे. ही घटना सोमवारी दुपारी साडे तीन च्या सुमारास शांती नगर,मजरेवाडी या ठिकाणी घडली. तुळशीदास महादेव कोवन (वय ४२ रा. शांती नगर मजरेवाडी सोलापूर) असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तुळशीदास हे सोमवारी रोजी दुपारी साडे तीन च्या सुमारास स्वत:च्या चादरीच्या कारखान्यात काम करीत होता.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/29. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागातील वायर नसलेल्या खड्ड्यांचे/साइडिंगचे विद्युतीकरण.
अंदाजे खर्च: 1,53,83,701.79/-
बिल्ड सुरक्षा: 2,26,900/-.
पूर्णता कालावधी: 12 महिने.
ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 12.12.2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता** (TRD)
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-67A

**रेल्वे लाईनजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/L/T/2024/48R2. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागातील 5 गुड्स शेड येथे ट्रॅकच्या बाजूला लाइटिंग व्यवस्थेसह 6 गुड्स शेडमध्ये हाय मास्ट लाइटिंगच्या तरतूदीशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग. (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: 72,24,829.76/- बिल्ड सुरक्षा: 1,44,500/-. पूर्ण कालावधी: 06 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 11.12.2025 दुपारी 15:00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता** (G)
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-68

**रेल्वे लाईनजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**मध्यवर्ती रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) चा करार**

सोलापूर विभागातील A1, A.B आणि D.E.F श्रेणीतील स्थानकांवर वार्षिक आणि पाच वर्षांच्या कालावधीसाठी केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) च्या संचालनासाठी कंत्राट वाटपासाठी ई-लिलाव. लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-CTG-25-25. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: प्रारंभ - दुपारी 12.00 28.11.2025 बंद-दुपारी 13.40 28.11.2025. स्थानकांचे नाव: 1. मोहोल 2. दुधनी 3. माधा 4. आराग 5. मॉडलिंब 6. लातूर 7. भिगवान 8. कुर्डुवाडी येथील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव. पद्धत: आयरेप्स-ई लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि 5 वर्षे 4 आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील संबंधित माहिती आणि कागदपत्रे सेंट्रल रेल्वे/इंडियन रॅलवे पोर्टल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली जाते.

ACM/Good/सोलापूर
Akar/Sur-70

**रेल्वे लाईनजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

**मध्यवर्ती रेल्वे**
**निर्देशांक**

निविदा सूचना क्रमांक: अनु.120. टी.शुद्धीपत्रक/ई-लिलाव कार्यक्रम/नोव्हेंबर-25, दिनांक: 14.11.2025. नोव्हेंबर-2025 महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रमाचेशुद्धीपत्रक. नोव्हेंबर 2025 महिन्यासाठी मूळ ई-लिलाव कार्यक्रमात अंशतः बदल करून, खालील बदल याद्वारे सूचित केले जात आहेत:

| लिलाव संचालक अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | सुधारित लिलावाची तारीख आणि दिवस | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| वरिष्ठ डीएमएम/एनजीपी | २४.११.२०२५ सोमवार | २८.११.२०२५ शुक्रवार | ७२१९६१२७५० |

मूळ कार्यक्रमात नमूद केलेले इतर सर्व तपशील आणि अटी अपरिवर्तित राहतील.
**सूचना:** आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केला जाईल. रेल्वे प्रशासन स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते.
**सूचना:-** अ) ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. तसेच कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या नंतरच्या लिलावात विकले जाऊ शकतात. ब) सरकारच्या धोरणानुसार, जिथे भंगार साहित्याच्या पुनर्वापरात पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश असेल, तिथे असे लॉट केवळ केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांनाच विकले जातील. क) ई-लिलाव कॅटलॉग www.ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. ड) ई-लिलाव, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणत्याही प्रकारची मदत हवी असल्यास, कृपया वरीलप्रमाणे संबंधित लिलाव संचालक अधिकाऱ्यांशी किंवा उपमुख्यमंत्री/विक्री/मुख्यालय, मोबाईल क्रमांक 8828110761, एमॉल पत्ता dycmmscr.railnet.gov.in किंवा dycmm.s.cstmgmall.com

AK-665

**रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे.**

# आगामी महापालिका निवडणुकीत भाजपला रोखण्यासाठी एकत्र येण्याची गरज

## सोलापुरातील कार्यकर्त्यांना शरद पवारांनी दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि.१७ नोव्हेंबर-**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता, भाजपचा विजयीरथ रोखण्यासाठी सर्वपक्षीय आघाडी करणे गरजेचे आहे. ज्या जागेवर आघाडीतील मित्रपक्ष यांचे प्राबल्य आहे. ती जागा मित्र पक्षांना सोडून आपल्या पक्षाचे प्राबल्य असलेल्या जागेवर निवडणूक लढवावी. सर्वांनी एकत्रित येऊन भाजपला रोखणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. महाविकास आघाडी केल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आघाडीतील सर्व मित्र पक्षांनी एकत्रित येऊन आघाडी करावी, अशा सूचना राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सोलापुरात आल्यानंतर माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या घरी चहापाणी करतेवेळी केल्या. यावेळी काँग्रेस तसेच राष्ट्रवादी पक्षातील काही प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**महाविकास आघाडीतील मित्रपक्षांची लवकरच बैठक**

काँग्रेस आणि एमआयएम एकत्रित येण्यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. शिवसेनेने एमआयएमच्या आघाडीतील प्रवेशाला विरोध दर्शवल्यामुळे काँग्रेस आणि एमआयएम यांच्यातील बोलणे थांबवले आहे. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांच्या नेत्यांनी लवकरच एकत्रित बैठक घेण्यासंबंधी चर्चा झाली आहे.

**- चेतन नरोटे, शहराध्यक्ष काँग्रेस**

दरम्यान, स्थानिक महाविकास आघाडी मध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी हे पक्ष एकत्रित येऊन भाजप विरोधी नवी आघाडी उघडणार आहेत. त्याअनुषंगाने लवकरच आघाडीतील सर्वपक्षीय नेत्यांची बैठक होणार आहे. यावर स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमात झालेल्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आला. काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी याला दुजोरा दिला. त्यामुळे महाविकास आघाडी लवकरच एकत्रित येऊन शहरातील एकूण २६ प्रभागांमध्ये कोणत्या पक्षाचे प्राबल्य जास्त आहे. त्या ठिकाणी त्यापक्षाचे उमेदवार उभे करणार आहेत.

# लाडकी बहिणींच्या ई-केवायसीसाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी मुंबई, दि. १७ नोव्हेंबर -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिलांची ई-केवायसी प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरु असताना काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, महिलांनी उपस्थित केलेल्या अडचणी लक्षात घेता ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेतला आहे. केवायसीसाठी यापुर्वी अंतिम मुदत १८ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली होती. परंतु नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आधार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे.

ज्या महिलांच्या पती किंवा वडील हयात नाहीत किंवा ज्या महिला घटस्फोटित आहेत अशांनी स्वत:ची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील. कोणतीही पात्र महिला तांत्रिक किंवा अपरिहार्य कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे, असेही त्यांनी सांगितले.



## लायन्स क्लबकडून पूरग्रस्तांना चादर-सतरंजीचे वाटप

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

लायन्स क्लब कुरुंदवाड/इचलकरंजी व सोलापूर च्यावतीने सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त गावकऱ्यांना चादरी व सतरंजीचे वाटप करण्यात आले. राजशेखर कापसे व मल्लिकार्जुन मसुती यांच्या सहभागाने वाटप करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातील पुरग्रस्त गावकऱ्यांना १ चादर व १ सतरंजी अशी मदतीचे वाटप रविवारी सोलापूर येथील उपप्रांतपाल राजेंद्र शहा-कांसवा यांच्या रेल्वे लाईन येथील कार्यालयातून करण्यात आले. हे सर्व साहित्य लायन्स क्लब अक्कलकोट/पंढरपुर/बार्शीचे दोन व सोलापूर मधील दोन क्लबना पुरग्रस्ताना वाटप करण्यासाठी हस्तांतरित करण्यात आले. एकूण ६०० चादरी व ६०० सतरंज्याचे वाटप करण्यात आले. तसेच सीना नदीच्या काठावरील पुरग्रस्त वडकबाळ या गावामध्ये जाऊन याचे मान्यवरांच्या हस्ते साहित्याचे वाटपकरण्यात आले. त्याचप्रमाणे लायन्स क्लब कराड सिटी यांचे कडून शैक्षणिक साहित्याचेही वाटप करण्यात आले.

या प्रसंगी ट्रस्ट चेअरमन विजय राठी, प्रांतीय डिझास्टर रिलीफ चेअरमन विजय जमदग्नी, प्रांतीय जीएलटी चेअरमन मंगेश दोशी, प्रांतीय जीएमटी चेअरमन सुरेश जाजू, रिजन १ चे रिजन चेअरमन श्रीनिवास कटकूर, प्रांतीय इंटरनेशनल कंवेंशन चेअरमन दिनेश बिराजदार सह सोलापूर रिजन मधील बहुतांश सदस्य हजर होते.

## परांच्यावरून पडून तरुण जखमी

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -** ओम गर्जना चौकातील बांधकामाच्या ठिकाणी परांच्यावतीने पडून तरूण जखमी झाला. उमेश चिदानंद हेमगड्डी (वय ३५, रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ओम गर्जना चौकात बांधकामाच्या ठिकाणी परांच्यावर चढत असताना तोल जाऊन उमेश हेमगड्डी हा खाली पडल्याने त्याच्या डोक्यास मार लागल्याने उपचारासाठी पत्नी सोनी हेमगड्डी हिने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# हडपसर एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या हैद्राबादच्या महिलेचे १९.५ तोळ्याचे दागिने लंपास

## कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

हडपसर एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या हैद्राबादच्या महिलेचे १२ लाख १४ हजार रुपये किंमतीचे १९.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरट्याने चोरून नेले. याबाबत कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शोभा राजेंद्र खांडेकर (वय ३५, रा. हैद्राबाद) या महिलेच्या फिर्यादीवरुन कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शोभा खांडेकर या त्यांचा मुलगा सचिन, सून यशस्विनी, नातू यांच्यासह १३ नोव्हेंबर रोजी सिकंदराबाद रेल्वे स्टेशन येथून कुर्डुवाडी येथे लग्न कार्याला जाण्यासाठी गाडी नं. १७०१४ काझीपेठ ते हडपसर एक्स्प्रेस गाडीतून प्रवास करीत होत्या.

सिकंदराबाद येथून रात्री दहा वाजता गाडी सुटली व १४ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे आठच्या सुमारास गाडी कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन येथे पोहोचली. कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन येथे उतरल्यानंतर शोभा खांडेकर यांचे सर्व सामान बॅगमध्ये सुस्थितीत होते. त्यानंतर खांडेकर व त्यांचे कुटुंबिय हे सर्वजण खाजगी चारचाकी गाडीतून नातेवाईक हणमंत खांडेकर यांच्या कुर्डुवाडी येथील शिक्षक सोसायटीलमधील निवासस्थानी गेले. त्यानंतर सकाळी दहाच्या सुमारास शोभा यांची सुन यशस्विनी हिने त्यांच्या बॅगेत ठेवलेले सोन्याचे दागिने चेक केले असता सोन्याचे दागिने त्यांच्या बॅगेत मिळून आले नाहीत. त्यांनी घरात सर्वत्र शोध घेतला असता दागिने मिळून आले नाहीत. त्यामुळे रेल्वे प्रवासातच खांडेकर व त्यांचे कुटुंबिय झोपी गेल्यानंतर कोणीतरी चोरट्याने त्यांच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरून नेले.

चोरट्याने खांडेकर यांच्या बॅगेतून ५० ग्रॅम वजनाचा लक्ष्मी हार, २० ग्रॅम वजनाचे दोन नेकलेस, २० ग्रॅम वजनाचे कानातील झुमके, २० ग्रॅम वजनाचे हातातील कडे, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि रोख ५ हजार रुपये असा १२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. अशी नोंद कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## दारुच्या नशेत तरूणाने स्वत:चा गळा कापला

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

दारूच्या नशेत तरुणाने स्वत:चा गळा व हातास कापून घेतल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरज किरण बनसोडे (वय २६, रा. देशमुख पाटील वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १६ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास घरी दारूच्या नशेत सुरज बनसोडे याने अज्ञात कारणावरून स्वतःच्या गळ्यास व हातास कापून घेतल्याने त्यास उपचारासाठी शेजारी अमर जगताप यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ३५ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**'बी-१ निविदा'**

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि.१४/०२/२०२५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या व नमूद केलेल्या कंत्राटदाराकडून खालील कामा करिता 'बी-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अचीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांचे निवासस्थान (गुलमोहर) बंगला याचे नूतनीकरण करणे. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर. | बी-१ निविदा | २४,००,०००/- | सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त वर्ग-ब |
| २. | पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर कार्यालयाचे रंगकाम करणे, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३९,४०,८३८/- | सोलापूर जिल्ह्यतील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त वर्ग - अ |

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १८/११/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २५/११/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | ---------- निरंक ---------- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | :- | दि. २५/११/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर **'बीड लॉक'** झाल्यानंतर ७२ तासात **'हार्ड कॉपी'** १ प्रतीत कंत्राटदारांनों खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. |
| निविदा उघडण्याचा कालाववी ठिकाण व वेळ. | :- | दि. २६/११/२०२५ मा. कार्यकारी अभियंता,, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

१. निविदा सूचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फालक

**सही/-**
**(मनोत्ररी वाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

अुत्तम सेवा

**मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५**

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **केंद्रीय विद्यालय व नवोदय विद्यालय समिती, KVS & NVS** | | | |
| | १) शिक्षक (९२११ पदे) | पदवी/पदव्युत्तर पदवी (५०%) गुणांसह व बी.एड् उत्तीर्ण असावे | ३५/४० पर्यंत | ०४/१२/२५ |
| | २) प्राथमिक शिक्षक (३३६५ पदे) | बारावी (५०%) व डी.एड् तसेच CTET पेपर-१ उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| | ३) ग्रंथपाल (१४७ पदे) | पदवी (ग्रंथपाल) ५०% गुणांसह उत्तीर्ण | ३५ पर्यंत | |
| | ४) क. सचिवालय सहा. (८७८) | बारावी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | २७ पर्यंत | |
| | ५) स्टेनोग्राफर (५७ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण | २७ पर्यंत | |
| | ६) लॅब अटेंडंट (१६५ पदे) | दहावी व DMLT कोर्स उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| | ७) बहुउद्देशीय कर्मचारी (२४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३० पर्यंत | |
| २) | **नाशिक महानगरपालिका, नाशिक** | | | |
| | फायरमन (१५० पदे) | दहावी उत्तीर्ण व अग्निशामक कोर्स | २८ पर्यंत | ०१/१२/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| २) | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर** | | | |
| | शिपाई/माळी/अंधारखोली परिचर (२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३८ पर्यंत | २०/११/२५ |
| ३) | **महाराष्ट्र राज्य पोलीस भरती,** | **२०२५** | | |
| | १) कॉन्स्टेबल (१२६२४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | ३०/११/२५ |
| | २) वाहनचालक (५१५ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ३) कॉन्स्टेबल SRPF(१५६६ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २५ पर्यंत | |
| | ४) कॉन्स्टेबल कारागृह (५५४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ५) बॅन्डस्मन (११३ पदे) | दहावी उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |
| ४) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीपूर्व)** | | |
| | १) तिकीट क्लर्क (२४२४ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २७/११/२५ |
| | २) टायपिस्ट (५५७ पदे) | ५०% गुणांसह बारावी व टायपिंग इंग्रजी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३० पर्यंत | |
| | ३) ट्रेन क्लर्क (७७ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| ५) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीधर)** | | |
| | १) ट्रेन मॅनेजर (३४१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | २०/११/२५ |
| | २) स्टेशन मास्तर (६१५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ३) तिकीट सुपरवायजर (१६१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५५९ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरूष उमेदवार | ३३ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विदर्भ मजबूत स्थितीत

◆ **नागपूर, १७ नोव्हेंबर**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत एलिट अ गटात बडोद्याविरुद्धच्या पाचव्या फेरीच्या सामन्यात पदार्पण करताना गणेश भोसलेने ३ बळी टिपले. गणेशसह नचिकेत भुते व पार्थ रेखडेने टिपलेल्या प्रत्येकी तीन बळींच्या जोरावर विदर्भाने बडोद्याला ७२.२ षटकांत १६६ धावांत रोखून पहिल्या डावात ३ धावांची निसटती आघाडी मिळविली. दिवस अखेर सलामीवीर अथर्व तायडे (४१) व ध्रुव शोरीच्या (६१) दमदार फलंदाजीच्या आधारावर विदर्भाने दुसऱ्या डावांत ४३ षटकांत ३ बाद १२६ धावा काढून सामन्यावर आपली पकड मजबूत केली. विदर्भ सध्या १२९ धावांनी आघाडीवर आहे.

विदर्भाच्या पहिल्या डावातील १६९ धावांना प्रत्युत्तर देताना बडोद्याने २ बाद ७० धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. गणेश भोसले, नचिकेत भुते व पार्थ रेखडेने अचूक मारा करत बडोद्याला १६६ धावांवर रोखले. बडोद्याकडून विष्णू सोळंकीने तेवढी एकाकी झुंज देत ८८ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ५९ धावांची खेळी केली, तर सलामीवीर ज्योत्सनील सिंगने ३६ धावांची, तर शाश्वत रावतने ३३ धावांची भर घातली. गणेश, नचिकेत व पार्थने प्रत्येकी ३ बळी टिपले, तर प्रफुल्ल हिंगेने एक बळी टिपण्यात यश मिळविले.

विदर्भाच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. सलामी जोडीदार अमन मोखाडे दुसऱ्याच षटकांत भोपळा न फोडताच तंबूत परतला. रठवाने त्याला पटेलकडून झेलबाद केले. पुढे अथर्व तायडे व ध्रुव शोरीने दुसऱ्या गड्यासाठी ९७ धावांची भागीदारी करत विदर्भाचा डाव सावरला. महेश पीठियाच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी अथर्वने १०२ चेंडूंत ४ चौकारांसह ४० धावांचे योगदान दिले. पुढे अष्टपैलू अतित शेठने ध्रुवला पायचित केले. ध्रुव शोरीने १०८ चेंडूंचा सामना करत ३ चौकारांच्या मदतीने ६१ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्यावेळी विदर्भाने ३६.१ षटकांत ३ बाद १०३ धावा केल्या होत्या.

यश राठोड (नाबाद १५) व रविकुमार समर्थने (नाबाद ८) दिवस अखेरपर्यंत फलंदाजी करत विदर्भाला ४३ षटकांत ३ बाद १२६ धावांचा टप्पा गाठून दिला. बडोद्याकडून रठवा, पीठिया व शेठने प्रत्येकी एक बळी टिपला. ◂(तभा वृत्तसेवा)



व्हीसीए स्टेडियमवर बडोदाविरुद्धच्या रणजी करंडक सामन्यात पदार्पणात तीन बळी टिपणाऱ्या गणेश भोसलेचे कौतुक करताना विदर्भाचे खेळाडू

# गुरप्रीत सिंगने जिंकले रौप्यपदक

## जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारताला तिसरे स्थान



◆ **कैरो, १७ नोव्हेंबर**

ऑलिम्पिकपटू गुरप्रीत सिंग पुरुषांच्या २५ मीटर सेंटर फायर पिस्तूल स्पर्धेत विश्वविजेता होण्याच्या जवळ पोहोचला होता, परंतु येथे ऑलिम्पिक शूटिंग रेंजमध्ये युक्रेनच्या पावलो कोरोस्टिलोव्हकडून इनर १० गुणांनी पराभूत झाल्यानंतर अखेर त्याला रौप्यपदक मिळाले.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत गुरप्रीतचे हे दुसरे वैयक्तिक पदक होते, तसेच २०१८ मध्ये चांगवॉन येथे २५ मीटर स्टॅण्डर्ड पिस्तूल स्पर्धेत जिंकलेले रौप्यपदक होते. फ्रान्सच्या यान पियरे लुईस फ्रिड्रिसीने येथे कांस्यपदक जिंकले.

अशाप्रकारे भारताने आपली जागतिक अजिंक्यपद मोहीम तिसऱ्या स्थानावर संपवली. भारताने ३ सुवर्ण, सहा रौप्य आणि चार कांस्यपदके पटकावली असून भारत चीनच्या मागे आहे. चीन संघाने १२ सुवर्ण, सात रौप्य आणि दोन कांस्यपदके मिळवली. दक्षिण कोरियाने ७ सुवर्ण, तीन रौप्य आणि चार कांस्यपदके मिळवत एकूण क्रमवारीत दुसरे स्थान पटकावले.

दोन दिवसांच्या स्पर्धेत गुरप्रीतने प्रिसिजन आणि रॅपिड स्टेजमध्ये एकूण ५८४-१८ गुण मिळवले, तर कोरोस्टिलोव्हने अंतिम रॅपिड राउंडमध्ये २९ इनर १० आणि १०० गुण मिळवून सुवर्णपदक पटकावले. भारतीय नेमबाजाने पुनरागमन करत रॅपिड स्टेजमध्ये २९६-१० गुण मिळवून रौप्य पदक जिंकले.

२९१-१४ गुण मिळवून प्रिसिजन स्टेजनंतर आघाडीवर असलेल्या युक्रेनियनने रॅपिड स्टेजमध्ये २९३-१५ गुण मिळवून गुरप्रीतच्या गुणांची बरोबरी केली व इनर १० गुण मिळवून सुवर्णपदक जिंकले.

प्रिसिजन स्टेजनंतर पदकाच्या शर्यतीत असलेल्या हरप्रीत सिंगने २९१-१० गुणांसह दुसरे स्थान पटकावले होते, परंतु रॅपिड स्टेजमध्ये तो केवळ २८६-६ गुण मिळवू शकला व त्यामुळे तो अखेर नवव्या स्थानावर राहिला.

स्पर्धेतील दुसरा भारतीय नेमबाज साहिल चौधरी ५६१-१४ गुणांसह २८ व्या स्थानावर राहिला. सम्राट राणा (१० मीटर एअर पिस्तूल), रविंदर सिंग (५० मीटर स्टॅण्डर्ड पिस्तूल व १० मीटर एअर पिस्तूल सांघिक) यांनी सुवर्णपदके जिंकली. ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर (५० मीटर रायफल ३ पोझिशन पुरुष), अनिश भानवाला (२५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल), गुरप्रीत सिंग (२५ मीटर सेंटर फायर पिस्तूल), ईशा सिंग आणि सम्राट राणा (१० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ, १० मीटर महिला एअर पिस्तूल संघ आणि ५० मीटर पुरुष स्टँडर्ड पिस्तूल संघ) यांनी रौप्य पदके जिंकली. ईशा (२५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल), एलाव्हेनिल वॅलारिवन (१० मीटर एअर रायफल), वरुण तोमर (१० मीटर एअर पिस्तूल आणि १० मीटर महिला एअर रायफल संघ) यांनी भारतासाठी कांस्य पदके जिंकली. ◂(वृत्तसंस्था)

# परिधी गांधी बुद्धिबळ स्पर्धेत राष्ट्रीयस्तरावर



**खामगाव** : येथील लॉयन्स ज्ञानपीठमधील परिधी निशांत गांधी ही विद्यार्थिनी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विजयी झाल्याने तिची राष्ट्रीयस्तरावर निवड झाली आहे. यावेळी शाळा कमिटीचे अध्यक्ष अरुण गुप्ता, उपाध्यक्ष कन्हैयालाल पारिक, सचिव प्रकाश केडिया, कोषाध्यक्ष अशोक चांडक, सदस्य गिरीश पवार व इतर सदस्य तसेच शाळेच्या प्राचार्य द्विवेदी व क्रीडा शिक्षिका डोरले यांनी तिचे अभिनंदन केले आहे.



# झोनल पॅरा शूटिंग स्पर्धेत विजय मोकळेला दोन सुवर्ण

**दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

**वेळापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

वेळापूर येथील संकल्प स्पोर्ट्स शूटिंग क्लबचा व तांदुळवाडीच्या (ता. माळशिरस) विजय सुखदेव मोकळे याने ६व्या झोनल पॅरा शूटिंग स्पर्धेत दोन सुवर्ण पदके पटकाविली. देहरादून उत्तराखंड येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत त्याने ज्युनिअर आणि सिनियर दोन्ही गटात ही कामगिरी केली. या कामगिरीवर त्याची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास प्रशिक्षक अक्षय राऊत व क्रिडाशिक्षक सतीश कदम याचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे आमदार उत्तमराव जानकर, माजी जि प सदस्य सतीशराव माने देशमुख, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य ॲड. नागेशराव काकडे, माजी उपसरपंच शशिकांत कदम, माजी व्हाईस चेअरमन उदय राजगुडे, तेजस जाधव, माजी सरपंच हणमंतराव साळुंखे, सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे, माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, प्राचार्य आर बी पवार संजय देशपांडे ॲड.दत्तात्रय राऊत, भागवत गायकवाड यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# 'आयएमएस'च्या अपुर्वा अंधारेची हॅटट्रिक; राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**



इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या अपुर्वा अंधारेची दिल्ली येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. येथील मार्केंडेय जलतरण तलावावर झालेल्या राज्य डायव्हिंग स्पर्धेत अपुर्वा अंधारे हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात १ व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड या तिन्ही प्रकारात सुवर्ण पदक पटकावित हॅटट्रिक केली. तिला क्रीडा शिक्षक अक्षय माने व प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# सोजर 'फार्मसी'च्या विलास सुरवसेला दुहेरी मुकुट

**बार्शी, दि. १७ नोव्हेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत विभागीय क्रीडा स्पर्धेत सोजर कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी पवन विलास सुरवसे यांनी १५०० मीटर धावणे व ५००० मीटर धावणे या स्पर्धेत भाग घेऊन या दोन्ही स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे पंढरपूर येथे ही स्पर्धा झाली. त्यास क्रीडाशिक्षक प्रा. रणजीत शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे, संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पनाताई बारबोले यांनी अभिनंदन केले.



# अन्नछत्र मंडळ स्पोर्टस् क्लबची ज्योती बन्ने राज्यात तिसरी

## हरियाणा येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**अक्कलकोट, दि. १७ नोव्हेंबर-**

रत्नागिरी येथे झालेल्या क्रॉस कंट्री स्पर्धेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ स्पोर्टस् क्लबचा ज्योती बन्ने हिने १९ वर्षीय गटात महाराष्ट्रात तृतीय क्रमांक संपादिला. या कामगिरीवर तिची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिचे क्लबचे अध्यक्ष व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षीय कक्षात प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मार्गदर्शक प्रदीप राठोड, सचिन कुर्ले, शशिकांत अस्वले, बसवराज फुलारी, संदीप विभूते यांच्यासह क्लबचे सदस्य व अन्नछत्र मंडळाचे सेवेकरी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# सोलापूरच्या श्रावणी सूर्यवंशीची सुवर्ण हॅटट्रिक

## राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**



सोलापूर येथील मार्कंडेय जलतरण तलाव येथे झालेल्या राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत स्व.सौ. मीनाताई ठाकरे (मॉंसाहेब) क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर्ट्स अँड सायन्स जुनिअर कॉलेज देगावची श्रावणी प्रताप सूर्यवंशी हिने १९ वर्षाखालील वयोगटात हायबोर्ड, १ व ३ मीटर स्प्रिंगबोर्ड या तिन्ही क्रीडा प्रकारात ३ सुवर्ण पटकावून हॅटट्रिक केली आहे. या कामगिरीवर तिची शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी व जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या हस्ते तिला पदके प्रदान करण्यात आले. तिला येथील आंतरराष्ट्रीय कोच श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर, विश्वस्त विठ्ठल वानकर, प्राचार्य आर. व्ही. खांडेकर, क्रीडाशिक्षक श्री बेलुरे यांनी श्रावणीचे अभिनंदन केले.

### श्रावणीची आत्तापर्यंत ६४ पदकांची कमाई

राज्य पातळीवर २५ सुवर्ण, ६ रौप्य व १ ब्राँझ राष्ट्रीय पातळीवर १७ सुवर्ण, ५ रौप्य, २ ब्राँझ तर आतंरराष्ट्रीय २ सुवर्ण, ४ रौप्य व २ ब्राँझ अशी श्रावणीने १७व्या वर्षात आतापर्यंत एकूण ६४ पदकांची कमाई केली आहे.

# माता स्वरूपाराणी व कमलादेवी करमाळा विजेते

## जिल्हा अजिंक्यपद कुमार व कुमारी कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमारी गटात करमाळ्याच्या कमलादेवी क्लबने व कुमार गटात येथील माता स्वरूपाराणी क्लबने विजेतेपद पटकाविले.

पार्क स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात कुमारी गटात कमलादेवीने केबीपी पंढरपूरवर मात केली. कुमार गटात माता-सरुपाराणी क्लबने श्रीकृष्ण स्पोर्ट्स क्लबला हरवले.

सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन व श्रीराम स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा येथे संपन्न झाली.



कुमार गटात ३५ व कुमारी गटात १५ संघानी भाग घेतला होता. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंची २५ ते ३० नोव्हेंबरला पुणे येथे राज्य स्पर्धेसाठी रवाना होणार आहे.



# रुद्रशक्ती गुरुकुलची राज्य योंगमुडो स्पर्धेत ९ पदकांची कमाई

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य योंगमुडो (कोरियन मार्शल आर्ट) स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलच्या ९ विद्यार्थिनी ७ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई केली.

या कामगिरीवर त्यांची २७ व २८ डिसेंबर दरम्यान पालघर ( विरार) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर, इंडियाचे अध्यक्ष रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी** : १२ वर्षाखालील : दुर्वा रोहिटे (रौप्य). १४ वर्षाखालील : वैभव माडे(सुवर्ण), गौरी माळी(सुवर्ण), अदिती नल्ला(सुवर्ण), वैभवी अळगुडगी (सुवर्ण), मानत्य रोहिटे(रौप्य). १७ वर्षाखालील : ममता अलशेट्टी (सुवर्ण), सोनाक्षी माडे (सुवर्ण). १९ वर्षाखालील : योगिता सरवदे (सुवर्ण).

# अणणप्पा काडादी व उमाबाई श्राविका प्रशालेचे वर्चस्व

## शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेत मुलांच्या गटात उमाबाई प्रशालेच्या मुलांनी तर आणप्पा काडादी प्रशालेच्या मुलींनी सर्वाधिक विजेतेपद मिळवत विभागीय स्पर्धेत प्रवेश केला.

यात १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या ४८ संघांनी भाग घेतला होता.सर्व विजेत्यांना कै. सूर्यकांत इंडी व शांता इंडी यांच्या स्मरणार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या या दोन दिवसीय बाद फेरीतील स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ सुवर्ण स्पोर्टस् अॅकॅडेमी चे संस्थापक चन्नेश इंडी, अजित जोडभावी निलेश भंडारी असोसिएशन चे सचिव योगेश इंडी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले करण्यात आले. सदर स्पर्धा पार पडण्यासाठी प्रमुख पंच शुभम शेटे, ओम गदगे यांच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन होनपारखे, वरद शेलार, गौरी पाटील, अयान शेख,अजित पाटील, सुहास छंचुरेसह इतर क्रीडा शिक्षक यांचे सहकार्य लाभले



**अंतिम निकाल याप्रमाणे ( प्रथम तीन शाळा)**

**१४ वयोगट मुले** : अणणप्पा काडादी प्रशाला, गांधीनाथा रंगजी विद्यालय, एस.व्ही.सी.एस. शाळा विरतपस्वी शाळा, अक्कलकोट रोड. **मुली** : एस.व्ही.सी.एस.शाळा, श्री.सिद्धेश्वर कन्या प्रशाला, उमाबाई श्राविका प्रशाला.

**१७ वर्षे वयोगट मुले** : उमाबाई श्राविका प्रशाला, पदमश्री सुमतीबाई इंग्लिश स्कूल, आयडियल इंग्लिश स्कूल. **मुली** : आणप्पा काडादी प्रशाला, एस. व्ही. सी. एस. शाळा. उमाबाई श्राविका प्रशाला.

**१९ वर्षे वयोगट मुले** : उमाबाई श्राविका प्रशाला, पी. एस. इंग्लिश स्कूल, गांधींनाथा रंगजी विद्यालय. **मुली** : अणणप्पा काडादी प्रशाला, उमाबाई श्राविका प्रशाला, गांधीनाथा रंगजी विद्यालय.



# एस.आर. चंडक स्कूलच्या गुरव व राजकडे यांची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

दिल्ली येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी येथील एस.आर. चंडक स्कूलच्या श्रेया गुरवची १७ वर्षांखालील गटात तर सिद्धायू राजकडे याची १४ वर्षांखालील गटात निवड झाली.

येथील मार्कंडेय तलावावर झालेल्या राज्य स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली. त्यांना प्रशिक्षक श्रीकांत शेटे व मनीष भावसार तसेच क्रीडा शिक्षक धर्मराज कट्टीमनी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे चेअरमन योगेश बियाणी, सचिव डॉ. अर्चना दरक, सहसचिव स्वप्निल मर्दा, मुख्याध्यापिका अंजली चव्हाण, पर्यवेक्षिका मोनाली संगवे यांनी अभिनंदन केले.

**राज्य कामगिरी** : श्रेया गुरव (९ वी) : १ मीटर स्प्रिंगबोर्ड व हायबोर्ड (द्वितीय), ३ मीटर स्प्रिंगबोर्ड (तृतीय)

सिद्धायू राजकडे (७ वी) : ३ मीटर स्प्रिंगबोर्ड (द्वितीय), १ मीटर स्प्रिंगबोर्ड व हायबोर्ड (तृतीय)

## महत्वाचे...



### बार्शी : नगरसेवकपदाच्या ६ जागा शिंदेसेनेला तर नगराध्यक्षपदासह ३७ जागा भाजपकडे

बार्शी, दि.१७ नोव्हेंबर-

बार्शी नगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि शिंदे सेना यांच्यात युती झाली असून शिवसेना ६ तर भाजप ३६ जागा आणि नगराध्यक्ष पदाची जागा लढवणार आहे, अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली. माजी आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, अजितदादा गटाशीही संपर्क झाला होता. मात्र तांत्रिक अडचणीमुळे त्यांचा निर्णय होऊ शकला नाही. सोबतच रिपाई ही आमच्या सोबत आहे. २९६ कोटींची उजनी पाणीपुरवठा योजना काम प्रगतीपथावर आहे. दररोज ४ कोटी लिटर पाणी येणार आहे. पाणीटंचाई का होती यांची वस्तुस्थिती सर्वांना माहीत आहे. विधानसभा निवडणुकीनंतर मी लक्ष दिले नाही तर वर्षात पाण्याची अडचण निर्माण झाली. कोणत्या कामासाठी वर्षभरात एकही पत्र त्यांनी दिले नाही. आमदारकीच्या मागील अडीच वर्षात आम्ही काय केले आहे हे विरोधकांना बरोबर नव्हे तर माझ्या दुचाकी गाडीवर फिरवून दाखवू का? असा उपरोधिक सवालही माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आ.दिलीप सोपल यांचे न घेता उपस्थित केला. माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे म्हणाले, महायुतीमध्ये कोण, किती जागा लढवत आहे यापेक्षा महायुती म्हणून आम्ही एकत्र आहोत हे महत्वाचे आहे. यावेळी भाऊसाहेब आंधळकर, भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तेजस्विनी कथले, माजी नगराध्यक्ष ॲड.असिफ तांबोळी, रमेश पाटील, ॲड. वासुदेव ढगे, विलास रेणके, भाजपचे शहराध्यक्ष महावीर कदम, शिंदे सेनेचे तालुका प्रमुख विजय माने, प्रकाश माने, रिपाईचे ॲड.अविनाश गायकवाड, श्रीधर कांबळे, प्रकाश मनगिरे, आनंद यादव, सुभाष लोढा यांच्यासह दोन्ही पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मोहोळ नगरपालिका निवडणुकीसाठी १५५ उमेदवारी अर्ज दाखल

मोहोळ, दि.१७ नोव्हेंबर-

मोहोळ नगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी २० जागांसाठी पुरुष उमेदवारांचे ७९ आणि स्त्री उमेदवारांचे ७६ अर्ज असे १५५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. नगराध्यक्षपदासाठी एकूण १८ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत. उद्या मंगळवारी दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी अर्जांची छाननी होणार आहे. त्यामध्ये काय होते याकडे सर्वांचे लक्ष आहे .मोहोळ नगरपालिकेची अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती.त्यामुळे पत्रकारांना माहिती मिळण्यास अतिशय विलंब झाला. मोहोळच्या अनुसूचित जाती महिला राखीव नगराध्यक्षपदासाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्ज यांप्रमाणे : वर्षा गौतम क्षीरसागर (भाजपा) अष्टूळ गायत्री रविकांत (शिवसेना) प्रीती राजेंद्र घाडगे (अपक्ष) आरती मदन सोनवणे (भाजप)सिद्धी राजीव वस्त्रे (शिवसेना शिंदे गट ) अश्विनी संदीप जाधव (राष्ट्रवादी तुतारी ) शितल क्षीरसागर (भाजप) उज्वला अमर कांबळे अपक्ष आणि शिवसेना (उबाठा) कोकणे स्मिता प्रकाश (भाजपा) मुक्ता अमोल खंदारे (अपक्ष) आरती राजरत्न क्षीरसागर (अपक्ष) ॲड.जानराव सोनल विठ्ठल (कॉंग्रेसआय) शुभांगी नागनाथ क्षीरसागर सुखबाई तुकाराम क्षीरसागर आर्दीसह एकूण १८ अर्जनगराध्यक्ष पदासाठी दाखल झाले.

## निधन वार्ता...

### दिलीप इनामदार



सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-

महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्राचे माजी कल्याण निरीक्षक दिलीप शंकरराव इनामदार यांचे दिनांक १३ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले व सून असा परिवार आहे.

### सिद्राम गुंटूक



सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-

अशोक चौक भागातील प्रसिद्ध कारखानदार सिद्राम नरसय्या गुंटूक यांचे आज सकाळी १०.३० वाजता हृदयविकाराचा झटका आल्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, पत्नी व नातवंडे असा परिवार आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते.

# पंढरपूर न.पा. निवडणुकीसाठी विक्रमी अर्ज दाखल

## नगरसेवक पदासाठी २५६; नगराध्यक्षपदासाठी ४ अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.१७ नोव्हेंबर-



पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अर्थात सोमवारी (ता.१७) नगरसेवकपदासाठी २५६ एवढ्या विक्रमी संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. तर नगराध्यक्षपदासाठी ४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

त्यामुळे नगरसेवकपदासाठी अंतिम दिवसापर्यंत एकुण ३६६ तर नगराध्यक्षपदासाठी एकुण ८ अर्ज दाखल झाल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी महेश रोकडे यांनी दिली. पालिका निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवार हा शेवटचाच दिवस होता. त्यामुळे सहाजिकच आज मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल होणार हे स्पष्ट झालेले होते. त्यामुळे पालिका सभागृहात गर्दी होणार असल्याने नगरपालिका परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला होता. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपालिका रस्त्याच्या पुढील असलेल्या भादुले पुतळा चौका पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुला वाहनांना मज्जाव करण्यात आलेला होता. या रस्त्यावर दोन्ही बाजुला बॅरिकेडींग करण्यात आलेले होते. अनेक उमेदवार आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पालिकेच्या इमारतीकडे येताना दिसत होते. अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रभागातून शक्तीप्रदर्शन करीत फटाक्यांची आतिषबाजी देखील केली.

**▸ नगराध्यक्षपदासाठी दाखल अर्जाची माहिती :** पंढरपूर पालिकेचे नगराध्यक्षपद हे आरक्षण सोडती मध्ये सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झालेले आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठी रविवारी जैतुनबी अब्दुलरौफ मुलाणी, प्रणिता भगिरथ भालके (दोन अर्ज) आणि कांचन तुळजाराम बंदपट्टे असे चार उमेदवारी अर्ज दाखल झालेले होते. तर सोमवारी शेवटच्या दिवशी भाजपाकडून शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर), आमदार अभिजीत पाटील यांच्या विठ्ठल परिवर्तन आघाडीकडून सारिका राहुल साबळे यांनी आपले उमेदवारी अर्ज केल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

**▸ आमदार आवताडेंच्या कार्यकर्त्यांना स्थान नाही :** पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकी मध्ये आमदार समाधान आवताडे यांच्या पंढरपूरातील समर्थक कार्यकर्त्यांना स्थान न दिल्यामुळे आमदार आवताडेंचे समर्थक पदाधिकारी आणि कार्यकर्ते नाराज झाल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात होती. त्यामुळे बऱ्याच कार्यकर्त्यांनी अपक्ष म्हणून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**▸ अपक्षाची संख्या अधिक :** पालिका निवडणूकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जामध्ये आघाड्यांकडून उभे असलेल्या उमेदवारांपेक्षा अपक्ष निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्तीची आहे. दरम्यान अर्ज छाननी मध्ये किती उमेदवारांचे अर्ज बाद होतात आणि त्या नंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदती पर्यंत किती अपक्ष उमेदवार आपले उमेदवारी अर्ज मागे घेतात त्यानंतरच उमेदवारांची संख्या स्पष्ट होईल.

**▸ २५ नोव्हेंबरपर्यंत घेता येणार उमेदवारी अर्ज मागे :** नगरपालिकेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सोमवार ही अंतिम तारीख होती. मंगळवारी दि.१८ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्जाची छाननी होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २५ नोव्हेंबर पर्यंत आहे. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

## कुर्डुवाडी : शक्तीप्रदर्शनाद्वारे दाखल करण्यात आले उमेदवारी अर्ज




तभा वृत्तसेवा,
कुर्डुवाडी, दि.१७ नोव्हेंबर-

कुर्डुवाडी नगरपरिषद निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना उबाठा, शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पार्टी, कॉंग्रेस या प्रमुख पक्षांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. नगरसेवक पदांसाठी एकूण १६४ अर्ज प्राप्त झाले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अनुषंगाने होणाऱ्या गर्दीचा विचार करुन चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नगराध्यक्ष आणि सदस्य पदासाठी अर्ज दाखल केलेल्या पक्षनिहाय उमेदवारांची नावे यांप्रमाणे.

**राष्ट्रवादी अजित पवार गट :** नगराध्यक्षपद-सुरेखा गोरे, प्रभाग १ अ सविता जगताप, १ ब आनंद कदम, प्रभाग २ अ अमरकुमार माने, प्रभाग २ ब शाहीस्ता चाऊस, प्रभाग ३ अ दुर्गा लोंढे, प्रभाग ३ ब दर्शन काशीद, प्रभाग ४ अ पल्लवी कांबळे, प्रभाग ४ ब संतोष शिंदे, संजय टोणपे, प्रभाग ५ अ मंजुश्री उगाडे, प्रभाग ५ ब भाग्यश्री पाटील, प्रभाग ६ अ मोहसीन मकणू, प्रभाग ६ ब स्नेहा गवळी, प्रभाग ७ अ जगन्नाथ क्षीरसागर, प्रभाग ७ ब आशा बागल, प्रभाग ८ अ अर्शाद मुलाणी, प्रभाग ८ ब वृषाली गांधी, प्रभाग ९ अ प्रतिभा शेंडगे, प्रभाग ९ ब प्रतिक्षा गोफणे, प्रभाग १० अ शुभ्रा गोरे, प्रभाग १० ब समीर मुलाणी.

**शिवसेना उबाठा गट :** नगराध्यक्षपद-जयश्री भिसे, प्रभाग १ अ पुष्पांजली सोनटक्के, प्रभाग १ ब विजय देवकते, प्रभाग २ अ लोंढे मोहन, प्रभाग २ ब शेख निलोफर, प्रभाग ३ अ सरस्वती क्षीरसागर, प्रभाग ३ ब अंजली गावडे, प्रभाग ४ अ अनिता साळवे, प्रभाग ४ ब अजिंक्य गव्हाणे, प्रभाग ५ अ अबोली चौधरी, प्रभाग ५ब इस्माइल सय्यद, प्रभाग ६ अ जयकुमार भिसे, प्रभाग ६ ब पूजा बागल, प्रभाग ७ अ विक्रम खवळे, प्रभाग ७ ब रेश्मा गोरे, प्रभाग ८ अ दमयंती सोनवर, प्रभाग ८ ब शारदा गवळी, प्रभाग ९ अ गौरी सुसलादे, प्रभाग ९ ब ऋषीपाल वाल्मिकी, प्रभाग १० अ सुमैय्या आतार, प्रभाग १० ब श्रीनाथ गोरे.

**शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट युती :** नगराध्यक्षपद-सम रीनिसा मुलाणी, प्रभाग १ अ नेहा आठवले, प्रभाग १ ब गणेश बोरकर, प्रभाग २ अ विनोद सोनवणे, प्रभाग २ ब अनिसा शेख, प्रभाग ३ अ आकाश मोरे, प्रभाग ३ ब आश्विनी कांबळे, प्रभाग ४ अ गणेश समदाडे, प्रभाग ४ ब आनंद टोणपे, प्रभाग ५ अ शाहीन म ुलाणी, प्रभाग ५ ब अरुण काकडे, प्रभाग ६ रजिया दाळवाले, प्रभाग ६ ब स्वाती पवार, प्रभाग ७ अ आकाश खिलारे, प्रभाग ७ ब सविता बागल, प्रभाग ८ अ प्रतीक शेंबडे, प्रभाग ८ ब शकील तांबोळी, प्रभाग ९ अ वनिता सातव, प्रभाग ९ ब श्रीकांत देशमुख, प्रभाग १० अ जाकीर शेख, प्रभाग १० ब शुभांगी श्रीरामे.

**कॉंग्रेस :** नगराध्यक्षपद-मनीषा गवळी, प्रभाग १ अ शुभांगी पोळ, प्रभाग १ ब जॉन्सन नवगिरे, प्रभाग २ अ सिद्धार्थ झिंगडे, प्रभाग २ ब सायराबानु मुलाणी, प्रभाग ३ अ उषा त्रिंबके, प्रभाग ३ ब शहानवाज शेख, प्रभाग ४ ब जयकुमार काळे, प्रभाग ५ ब निलेश गवळी, प्रभाग ७ अ अमर जगताप, प्रभाग ७ ब तस्लिम शेख, प्रभाग ९ ब जितेंद्र गायकवाड.

**भाजप :** नगराध्यक्षपद-माधवी गोरे, प्रभाग १ अ शुभांगी शिंदे, प्रभाग १ ब अतुल फरताडे, प्रभाग २ अ प्रेमनाथ आठवले, प्रभाग २ ब प्रिया फंड, प्रभाग ३ अ ललिता बनसोडे, प्रभाग ३ ब उमेश पाटील, प्रभाग ४ अ सुनीता गायकवाड, प्रभाग ४ ब विकी चांदणे, प्रभाग ५ ब अंबिका सोलनकर, ॲड.संदीप नगरे, प्रभाग ६ अ बबन बागल, प्रभाग ६ माया सुतार, प्रभाग ७ अ राहुल गायकवाड, प्रभाग ७ ब करिष्मा तरंगे, प्रभाग ८ अ युवराज कोळी, प्रभाग ८ ब अबोली सुराणा, प्रभाग ९ ब मेघना कोंडबळे, प्रभाग १० अ स्वाती गोरे, प्रभाग १० ब विकास इंगोले.

## पतीचा संतापजनक प्रताप; पत्नीवर कोयत्याने केला हल्ला

मंगळवेढा दि. १७ नोव्हेंबर-

ढवळस येथे ऊस तोड सुरु असताना पती गप्पा मारत बसले असता पत्नी नवऱ्याला ऊस तोडा असे म्हटल्यावर पतीने चिडून पत्नीवर ऊस तोडण्याच्या कोयत्याने हल्ला करुन जखमी केल्याप्रकरणी लक्ष्मण अंकुश देडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

जखमी फिर्यादी मेघा लक्ष्मण देडे (वय ३८, रा. ढवळस) हिचा पती तथा आरोपी लक्ष्मण देडे हा ऊसतोडणी मुकादम असून दि.१५ रोजी सकाळी ९ वाजता भाऊसाहेब हेंबाडे यांच्या शेतात ऊसतोडी सुरु होती. यातील आरोपी तथा फिर्यादीचे पती तेथेच काम करणारी महिला लक्ष्मी वायदंडे,लक्ष्मण कांबळे, प्रविण मस्के, पुष्पाबाई कांबळे असे बोलत बसले होते. तेव्हां फिर्यादी ही तिच्या पतीला म्हणाली,तुम्ही एवढा वेळ कशाला बोलत थांबला होता. तेव्हा ऊस तोडणी करणारी महिला लक्ष्मी वायदंडे म्हणाली मी तुझ्या नवऱ्याला बोलत होते, तुझ काय म्हणणं आहे? तेव्हां फिर्यादी लक्ष्मीला म्हणाली,मी इथ्या सासऱ्याला गवत घेवून घरी पाठवायचे आहे, तू आमच्या नवरा बायकोमध्ये बोलू नको, तेव्हां लक्ष्मी हिने तिचा भाऊ औदुंबर यास बोलावून घेतले व आम्ही निघून जातो तेव्हां फिर्यादी म्हणाली, आमचे ऊसतोडीचे घेतलेले पैसे मग निघून जावा असे म्हणाल्यावर फिर्यादीच्या पतीला तथा आरोपीला राग आला. त्याने पत्नीला शिवीगाळी करीत लाथाबुक्याने मारहाण करुन तेथेच पडलेला ऊसतोडीचा कोयता घेवून पत्नीच्या खांद्यावर मारुन जखमी केले.

तेथेच असणारे लक्ष्मण कांबळे, पुष्पाबाई कांबळे, प्रविण मस्के यांनी जखमी अवस्थेत मंगळवेढ्यातील हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## बार्शीत घरफोडीचे सत्र सुरुच; १ लाखाचा मुद्देमाल लंपास

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १६ नोव्हेंबर-

**चोरीस गेलेल्या वस्तू :** १८ हजारांचे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कर्णफूल, ९० हजारांचे तीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, दोन हजार किंमतीचा २० ग्रॅम वजनाचा चांदीचा करंडा, सातशे रुपयांच्या मुलीची चांदीची पैंजण, आठ हजार रुपये रोखरक्कम.

शहरातील घरफोड्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून पोलिसांच्या गस्त व गुप्त पोलीस वाहनांच्या वाढत्या उपस्थितीवरही चोरट्यांचे निर्भय वावर सुरुच आहे. शिवतीर्थनगर, कासारवाडी रोड परिसरात झालेल्या नव्या घरफोडीने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संजय जाधव (वय ३१, रा. शिवतीर्थनगर) यांनी या संदर्भात पोलिसांत फिर्याद दिली आहे.

फिर्यादी संजय जाधव यांचे श्रावणी कलेक्शन नावाचे कपड्यांचे दुकान असून कुटुंबासह ते शिवतीर्थनगर येथे राहतात. दि.१४ नोव्हेंबर रोजी ते कुटुंबातील कार्यक्रमानिमित्त लोणीकाळभोर (जि. पुणे) येथे गेले होते. घराला कुलूप लावून ते बाहेर पडले होते. दि. १६ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे १० वाजता ते घरी परतले असता घरासमोर लोकांची गर्दी दिसली. पुढे जाऊन पाहिले असता घराचे कुलूप आणि कडी-कोयंडा तोडून दरवाजा उघडलेला होता. घरात प्रवेश केला असता बेडरुममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

लाकडी कपाटाचे आतले कप्पे उचकून त्यातील सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा रु. १,१८,७०० किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे आढळले. दरम्यान, त्याच गल्लीतील श्रावण श्रीनिवास पाटील व किरण भागुजी चपटे यांच्या घरीही चोरीचा प्रयत्न झाल्याची माहिती स्थानिकांकडून समोर आली आहे, ज्यामुळे हा चोरीचा प्रकार एकट्या घरावर न होता परिसरातील घरांवर लक्ष केंद्रीत करुन झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. फिर्यादींच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या सलग घरफोड्यांमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण असून पोलिसांनी तातडीने गस्त वाढवून चोरट्यांना पकडावे, अशी मागणी होत आहे.



## मोडनिंब रोटरी क्लबतर्फे सोलंकरवाडी शाळेला संगणक भेट

तभा वृत्तसेवा,
मोडनिंब, दि. १७ नोव्हेंबर-

मोडनिंब (ता.माढा) येथील रोटरी क्लबच्या वतीने सोलंकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेस ई-लर्निंग किटसह संगणक संच भेट देण्यात आला. विद्यार्थी आधुनिकतेच्या दिशेने पुढे गेला पाहिजे. बदलत्या युगात अत्याधुनिक संसाधने वापरण्याची संधी त्यांना मिळायला हवी. या उद्देशाने ही भेट दिल्याचे रोटरीचे अध्यक्ष नीलेश गिड्डे यांनी सांगितले.

यापूर्वीही रोटरी क्लबकडून शाळेच्या बाल वाचनालयास पुस्तक संच व कपाट भेट देण्यात आले होते. केवळ दीडशे पटाची ही शाळा तालुका व जिल्हास्तरावर सर्वच क्षेत्रात नेहमी अग्रेसर असते. यावेळी रोटरीचे सचिव डॉ. संतोष दळवी, ज्योती कुलकर्णी, योगेश पाटील, नीलेश पाटील, राजाभाऊ भांगिरे, डॉ. अनिल गोळवलकर, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. शशिकांत वागज, औदुंबर पाटील उपस्थित होते. शिक्षक व शिक्षकेत कर्मचारी तसेच विद्यार्थीही उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक राम कृष्ण केदार यांनी रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## पाच पॅनलच्या लढतीत राष्ट्रवादी अजित पवार, शिवसेना उबाठा, शिवसेना शिंदे गट यांच्यात सामना

तभा वृत्तसेवा,
कुर्डुवाडी, दि. १७ नोव्हेंबर-



कुर्डुवाडी नगरपालिकेच्या निवडणुकीत यंदा पाच प्रमुख पॅनल रिंगणात उतरल्याने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट)-राष्ट्रवादी (शरद पवार गट) युती, कॉंग्रेस आणि भारतीय जनता पक्ष असे हे पाच पॅनल निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मागील निवडणुकांच्या तुलनेत या वेळचा राजकीय कल अधिक बहुरंगी आणि अनिश्चित दिसत असून, मुख्य चुरस राष्ट्रवादी (अ.प.) आणि शिवसेना (उबाठा) व शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्यात होण्याची शक्यता व्यक्त केली जाते.

**उमेदवारीत पेच आणि नाराजीची छाया :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही प्रमुख पक्षांना उमेदवारी जाहीर करण्यात मोठा पेच निर्माण झाला होता. अनेक इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये तिढा निर्माण झाल्याने तिकिटवाटप उशीर झाला, ज्याचा परिणाम अंतर्गत नाराजीत झाला आहे.

काही नाराज इच्छुकांनी विरोधी पॅनेल गाठल्याने स्थानिक राजकारणात नवे समीकरण निर्माण झाले आहे. त्यामुळे यंदाचा लढा फक्त पक्षनिहाय मर्यादित न राहता व्यक्तिनिष्ठ आणि गटाधारित बनला आहे.

**नवीन चेहरे, नव्या समीकरणांची निर्मिती :** मागील पंचवार्षिक काळात झालेल्या कामगिरीवरील टीका आणि जनतेची नाराजी लक्षात घेत प्रमुख पक्षांनी या वेळेस नवीन चेहरे पुढे आणले आहेत. अनुभवी कार्यकर्त्यांसोबत तरुण नेतृत्वालाही संधी देत नवेपर्व या संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे मतदारांमध्ये नव्या चेहऱ्यांविषयी उत्सुकता निर्माण झाली असून मतदानावर त्याचा परिणाम दिसू शकतो.

**बहुरंगी लढतीचा थरार :** पूर्वी तीन पक्षांपुरती मर्यादित असलेली नगरपालिका निवडणूक या वेळी पाच पॅनलपर्यंत विस्तारली आहे. नव्या युती आणि स्वतंत्र गटांच्या सहभागामुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंतिम निकालावर कोणत्या पक्षाचे राजकीय गणित मात करते, हे पाहणे खरोखरच उत्सुकतेचे ठरणार आहे.

मतदारांचा कल ठरवणार सम ीकरण कुर्डुवाडी शहरातील आगामी पाच वर्षांच्या विकासमार्गाचा निर्णय या निवडणुकीतूनच ठरणार आहे. बेरोजगारी,पाणीपुरवठा, रस्ते, वीज आणि आरोग्यसेवा या स्थानिक प्रश्नांवर जनतेचा कल कोणत्या दिशेने झुकेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मैंदर्गी : ३० नामनिर्देशन पत्र झाली प्राप्त

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. १७ नोव्हेंबर-



मैंदर्गी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्षपदासाठी एक तर सदस्यपदांसाठी ३० नामनिर्देशनपत्र प्राप्त झाली. सदस्यपदासाठी एकूण ८४ अर्ज दाखल झाले आहेत. सोमवारी भाजपार्फे नगराध्यक्षपदासाठी अंजली योगीनाथ बाजारमठ यांनी अर्ज सादर केला, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ओसवाल, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अर्जुन सुरवसे यांनी दिली.

सदस्य पदांसाठी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची नावे यांप्रमाणे; रामपुरे प्रवीण गुरुनाथ (१ अ), नागुर महानंदा सुरेश (२ अ), शावरी राणी महेश (२ अ), रायचूरे भौरम्मा शिवानंद (२ अ), गोब्बूर गुरनिंगप्पा शरणप्पा (२ ब), देगील विनायक सिद्धाराम (३ अ), मुत्रोळी विनायक सिद्धाराम (३ अ), अखतरबानू हनीफ देगाव (३ अ), निंबाळ राजश्री रामचंद्र (३ ब), सोनकांबळे सीमा राहुल (४ अ), भंगरगी भारती सिद्धेश्वर (५ अ), पाटील सावित्री गुरुकृपा (५ ब), गोवुर सुरेखा गुरुनिंगप्पा (५ ब), देगाव अख्तरबानू हनिफ (६ अ), शमीमबानू मेहबुब दफ्तदार (७ अ), करजगी मुत्तण्णा आडव्याप्पा (७ अ).

करजगी चंद्रकांत मुत्तण्णा (७ ब), दिवटे मनीषा चंद्रशेखर (८ अ), चव्हाण सुनंदा कृष्णात (८ अ), दिवटे चंद्रशेखर सिद्रामप्पा (८ ब) मोरे संजीव हनुमंत (८ ब), खंबत पार्वती शरणबसप्पा (९ अ), गौडगाव बनशंकरी शिवपुत्रप्पा (९ अ), म्हेत्रे म ल्लिनाथ लक्ष्मण (९ अ), जकापुरे देवेंद्र काशिनाथ (९ ब), निवर्गी समर्थ चिदानंद (९ ब), नागप्पा शिवपुत्र गौडगाव (९ ब), शावरी राणी महेश (१० अ), नागुर सिद्धाराम नागप्पा (१० ब), संतोषी सूर्यकांत आलूरे (३ ब),

मैंदर्गी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी स्थानिक गटाकडून माजी नगरसेविका शिवम्मा यल्लप्पा पोतेनवरू, भाजपाकडून अंजली योगिनाथ बाजारमठ निवडणूक लढवत आहेत. शिंदे शिवसेना व कॉंग्रेस यांनी स्थानिक गटाला पाठिंबा दिला आहे.



# माहेरचा सन्मान पुरस्काराने दत्ता भोसले सन्मानित

## सिंधुताई सपकाळ यांच्या जन्मदिनानिमित्त गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

शेकडो अनाथांची माय पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या जयंतीनिमित्त येथील सामाजिक कार्यकर्ते दत्ता भोसले यांना त्यांच्या समाजसेवेबद्दल माहेरचा सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

भोसले गेल्या अनेक वर्षांपासून आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या मृत व्यक्तींचे विनामूल्य अंत्यसंस्कार करून मानवी सेवेचे अद्वितीय उदाहरण सादर करत आहेत. आतापर्यंत त्यांनी दीड हजाराहून अधिक मृत व्यक्तींना सन्मानपूर्वक अंतिम निरोप दिला आहे. त्यांच्या या सेवेचा पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या जयंतीनिमित्त ममतेच्या अथांग झऱ्याचे प्रतीक असलेल्या पुरंदर येथील ममता बाल सदनमध्ये पुण्याचे आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ. वाघमोडे यांनी माईंच्या कार्याची स्तुती करत खऱ्या अर्थाने माई म्हणजे आई होत्या, असे नमूद केले.

भोसले यांनी देखील त्यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा वसा आपण विसरणार नसल्याचे सांगितले. या कार्यक्रमास ममता सपकाळ, दीपक गायकवाड, विनय सपकाळ, निखिल वर्तक, स्मिता सपकाळ, गोपाळ गायकवाड, सुरेखा भोसले, वैष्णवी भोसले, श्रेया भोसले, मुकेश चौधरी आणि नागरिक उपस्थित होते.

# अवघ्या १८ महिन्यांत होणार ‘आयटी पार्क’ची स्वप्नपूर्ती!

- ४० कोटींचा येणार खर्च; प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे वर्ग
- सिध्देश्वर कारखान्याच्या मळीचा वासही येणार शुन्यावर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

नियोजित आयटी पार्क ही होटगी येथील जलसंपदा जागेवरच होणार असून, त्यासाठी सुमारे ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात आला आहे, प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर दिल्यानंतर १८ महिन्यांत बांधकाम पूर्ण होऊन आयटी पार्क सुरु होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. १७) माध्यमांशी बोलताना दिली.

गेल्या काही वर्षांपासून सोलापुरात आयटी पार्क सुरु करण्याची वारंवार मागणी होत होती. मागील तीन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयटी पार्कसाठी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव पाठविण्याचा आदेश जिल्हा प्रशासनाला दिला होता. त्यानुसार हिरज, कुंभारी, जुनी मिल, होटगी येथील जागेची पाहणी करण्यात आली. यात होटगी येथील जागा निश्चित करण्यात आली आहे. होटगी येथे जलसंपदा विभागाच्या मालकीची ५० एकर जागा ही लॉजिस्टिक पार्कसाठी देण्यात आली असून, आता तीच जागा आयटी पार्कसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. जागेसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये जलसंपदा विभागाला एमआयडीसी विभागाकडून दिले जाणार आहे. अतंर्गत रस्ते, दिवाबत्ती, पाणी आदी मुलभूत सुविधांसाठी सुमारे ३७ ते ३८ कोटी रुपये लागणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**सिध्देश्वर कारखान्याच्या झेडएलडीमुळे शुन्य वास :** होटगी रोडवरील सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा सध्या २० केपीएलडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प असून, त्यांचा हा प्रकल्प येत्या वर्षभरात १०० केपीएलडी क्षमतेचा होणार आहे. यात झीरो लिक्वीड डिस्चार्ज तंत्राचा वापर केल्याने मळीचा वास हा शुन्यावर येणार आहे. याबाबत कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी याबाबतची माहिती भेटून सादर केली असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

**इमारत बांधकामाला नाही येणार अडथळा :** होटगी रोडवरील विमानतळावरुन उडणाऱ्या विमानसेवेच्या फनेलमध्ये प्रस्तावित आयटी पार्क इमारतीचा समावेश होत नाही. ५० मीटर उंचीपर्यंत बांधकाम करता येते. याबाबत होटगी रोडवरील विमानतळ प्रशासनाचा अभिप्राय घेण्यात आला आहे. तसेच होटगी येथील प्रस्तावित आयटी पार्क जागेच्या ५० एकरावर सुमारे ४० ते ४५ हजार जण बसून काम करतील इतकी क्षमता असल्याचेही आशीर्वाद यांनी सांगितले. तसेच पुण्याच्या हिंजवडीपेक्षा अर्ध्या किंमतीने स्वस्तात होटगी येथे जागा उपलब्ध होणार आहे.



# राजभाषा कार्यान्वयीन समितीकडून रेल्वे विभागाला राजभाषा शिल्ड प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर यांना २०२४-२५ या वर्षात राजभाषा हिंदीच्या सर्वोत्तम कामगिरी करिता केंद्र सरकारच्या कार्यालये/उपक्रमांच्या श्रेणीमध्ये राजभाषा कार्यान्वयन समिति, सोलापुरचे दुसरे क्रमांकाचे पारितोषिक म्हणून ‘‘राजभाषा शील्ड‘‘ आणि प्रमाणपत्र भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाचे हिंदी शिक्षण योजनेचे उपसंचालक राजेंद्र प्रसाद वर्मा यांच्या हस्ते दि. १४ नोव्हेंबर रोजी, नगर राजभाषा कार्यान्वयन समिती यांच्यावतीने आयोजित पुरस्कार वितरण समारंभात प्रदान करण्यात आले.

यावेळी अंशुमाली कुमार, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि अतिरिक्त मुख्य राजभाषा अधिकारी, एस.एल. खोत उपस्थित होते.

# अंतिम मतदार याद्या तयार करण्यास मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम सुरू असून प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यास भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३ डिसेंबर व अंतिम मतदार याद्या तयार करण्यास १२ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदान अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई- शुक्रवार २८ नोव्हेंबर, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी- बुधवार ३ डिसेंबर, दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी- ३ ते १८ डिसेंबर, दावे व हरकती निकाली काढणे, पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे- सोमवार ५ जानेवारी २०२६ व मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी- सोमवार १२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल.

### विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# कलाकार समिती जिल्हाध्यक्षपदी प्रा.जीवन शिंदे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**




महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनी भिम गीत आदरांजली कार्यक्रम २०२५ संदर्भात सोलापूर महानगरपालिका हिरवळीवर डॉ.वसंत गजघाटे यांच्या अध्यक्षतेखाली नूतन पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

या बैठकीस प्रा. शंकर खळसोडे, भीमराव घडेराव, पाटील ,बाळासाहेब गायकवाड, ब्रम्हानंद मस्के, शीतलकुमार माने, रमेश कांबळे,मारुती येरवडे,अरुण डुरके,आनंद बनसोडे, कपिल बनसोडे, विशाल बनसोडे, दिनेश बनसोडे, दत्ता सोनवणे, अनिल वाघमारे,बाबासाहेब कांबळे, प्रा.जीवन शिंदे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक माजी अध्यक्ष प्रा.शंकर खळसोडे यांनी केली व आभार बाळासाहेब गायकवाड यांनी मानले.

**नूतन पदाधिकारी असे :** अध्यक्ष प्रा. जीवन शिंदे, उपाध्यक्ष दिनेश बनसोडे, विशाल बनसोडे, कार्याध्यक्ष धनराज तुपसाखरे, सचिव दत्ता सोनवणे, सहसचिव अनिलकुमार इंगळे, खजिनदार अरुण डुरके, सहखजिनदार कपिल आनंद बनसोडे, अनिल वाघमारे, ऑडिटर भीमराव घडेराव आदी.

# अतिक्रमण विभागाकडून १० खोके निष्काशीत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**




महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक पथकाच्या वतीने विमानतळ मुख्य प्रवेशद्वार लगेच अतिक्रमित दहा खोके जेसीबीच्या साह्याने निष्काशित करण्यात आले.

शहरातील विमानतळ परिसरात विमानाच्या उडाणा दरम्यान पक्षी व इतर अडथळे येत आहेत. यामुळे येथील अतिक्रमण हटविण्याची मोहीम महापालिका प्रशासनाकडून हाती घेण्यात आली आहे. आज पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने विमानतळा समोरील मुख्य प्रवेशद्वार लगत असलेल्या दहा खोकी जागेवरच जमीनदोस्त करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# पत्रकारिता क्षेत्रात पदवीधारक लोक येणे आवश्यक

- दै. तरुण भारतचे संपादक प्रशांत माने
- स्वराज्य माहिती अधिकार संघटनेचे जिल्हा अधिवेशन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

हातात मोबाईल घेतलं म्हणजे योग्य पत्रकारिता होईल असे नाही, चुका टाळत पत्रकारिता करणे आवश्यक आहे, अनुभवावरून पत्रकारात प्रगल्भ येत असतें, पत्रकारिता क्षेत्रात पदवीधारक लोक येणे आवश्यक आहे, पत्रकाराचे योगदान नाकारता येत नाही, असे मनोगत दै. तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी मांडले.

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे सोलापूर जिल्हा अधिवेशन हॉटेल निसर्ग येथील सभागृहात मोठ्या दिमाखात, थाटात, उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. अधिवेशनास प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने नूतन पदाधिकार्यांचा व सदस्याचा उत्साह शिगेला पोहचला होता.रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता रामलाल चौकातील हॉटेल निसर्ग येथे संपन्न झालेल्या स्वराज्य जिल्हा अधिवेशन कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी स्वराज्य चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वराज्य संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, संस्थापक तथा राष्ट्रीय महासचिव कमलेश शेवाळे, दैनिक सोलापूर तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, सुप्रसिद्ध दिवाणी वकील ॲड विश्वनाथ आळंगे, पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम उपस्थित होते. यावेळी भारत मातेचे प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून दीप प्रज्वलीत करून जिल्हा अधिवेशनाचा शुभारंभ करण्यात आला. स्वागत कार्याध्यक्ष सुनील पंडित यांनी केले तर प्रास्ताविक स्वराज्यचे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी केले. भारतातील भ्रष्टाचार संपला तर मागे राहिलेला भारत जगजेत्ता होण्यास फार काळ लागणार नाही याकरिता माहिती अधिकार कायद्याचा योग्य वापर करा, आणि प्रत्येकाला माहिती मिळालीच पाहिजे असे उदगार जेष्ठ वकील ॲड. विश्वनाथ आळंगे यांनी काढले.

माहिती अधिकार कायद्यामुळे काही प्रमाणात काही अधिकाऱ्यांचे मानसिक संतुलन बिघडत आहे, तर प्रामाणिक अधिकारी या कायद्याला घाबरत नाही, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, प्रामाणिक कार्य करा, यश नक्की मिळतो असा सल्ला पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम यांनी नूतन कार्यकर्त्यांना दिला. सोलापूर जिल्ह्यात सर्वोच्च सदस्य संख्या वाढवून स्वराज्यच्या मागील पाच वर्षाच्या देशातील स्वराज्यच्या इतिहासात विक्रम केल्याबद्दल सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांना सर्वोत्तम संघटन पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अहिल्यानगरचे जिल्हा उपाध्यक्ष अलीम शेख यांना ही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्ह्यासह व लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, पुणे, ठाणे, मुंबई, बेळगांव सह अनेक जिल्ह्यातील २१० पेक्षा जास्त नूतन पदाधिकाऱ्यांना खऊ ओळख पत्र, नियुक्ती पत्र देऊन मोत्याचे माळ देऊन सन्मान करण्यात आला तसेच स्वराज्य सदस्य वाढीच्या स्पर्धेतील १२ विजेत्यांना पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वस्त उमेश काशीकर, संचालक प्रशांत निकम, संचालक श्रीकांत देशपांडे, पुणे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष संदीप जाधव, समन्वयक भारत नजन संचालक, प. म. उपाध्यक्ष कैलास कारंडे सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक सह कार्याध्यक्ष सुनील पंडित, उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, सचिव सुधाकर शहाणे, सहसचिव दत्तगुरु वेदपाठक, सरचिटणीस दिपक कुरुलकर खजानक किशोर बेजगम, संतोष दीक्षित भंडारकवठेकर, संतोष पोतदार, गौरीशंकर सोनवणे यांचेसह बहुसंख्य पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी विषेश परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुण्याचे विश्वास रिसबूड व किशोर बेजगम यांनी केले तर आभार सुधाकर शहाणे यांनी केले शेवटी सुरीची भोजनाचा उपस्थितानी आस्वाद घेतला.

# देशात सोलापूर कांद्याची टर्मिनल होऊ शकते

## कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांचे प्रतिपादन

- सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संपन्न झाली कांदा परिषद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ नोव्हेंबर-**

देशात तसेच राज्यात सोलापूर बाजारपेठ कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बाजारपेठ बनली आहे. कितीही मोठ्या प्रमाणात आवक आली तरीही, सोलापुरातील बाजारपेठेत कांद्याला चांगला दर मिळतो. सोलापुरातील कांदा राज्यासह राज्य बाहेर नव्हे तर देशाबाहेर विकला जातो. त्यामुळे सोलापूर बाजारपेठ कांद्यासाठी एक मोठी बाजारपेठ उद्यास येऊन त्याचे रूपांतर कांदा टर्मिनलमध्ये होऊ शकते. त्यासाठी राज्य केंद्र सरकारकडे प्रयत्नशील राहावे लागेल. असे प्रतिपादन राज्याचे कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केले. राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडीअडचणी कांद्याची बाजारपेठ साठवणूक दर या विषयांवर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ब्रह्मदेव माने बँकेत कांदा परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन स्थानिक बाजार समिती आणि शासनाने शेतकऱ्यांना चांगला दर देण्याचा प्रयत्न करावा. सध्या शेतकरी आसमानी संकटात सापडला असून, कांद्याचे दर शेतकऱ्यांना परवडणारे नाहीत. शेतकरी जगला तर राज्य जगणार आहे. कृषी क्षेत्रातील तज्ञ अभ्यासक आणि संशोधकांचे मार्गदर्शन घेऊन सोलापुरात कांद्याच्या साठवणुकीसाठी कोल्ड स्टोरेज तसेच इतर काही सुविधा पुरविण्यात येतील का? याबाबत देखील आढावा घेतला जात आहे. राज्य आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील प्रत्येक बाजार समितीमध्ये ही बैठक संपन्न होणार आहे. ज्यामध्ये शेतकरी, व्यापारी, आडते आणि स्थानिक बाजारपेठ यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न असणार आहे. या सर्वांचा एकत्रित रिपोर्ट राज्य आणि केंद्र सरकारला सादर करावयाचा आहे. असे देखील ते यावेळी म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर बाजार समितीचे सभापती दिलीप माने, संचालक वैभव बरबडे, नागाण्णा बनसोडे, मुस्ताक चौधरी, पुण्यातील एन.आर.सी.सीचे संशोधक डॉ राजीव काळे, पणन मंडळाचे सुहास काळे, पुण्याच्या कृषी विभागाचे श्री.पांढरे, पणन मंडळाचे श्री.जगताप माजी संचालक केदार उंबरजे, व्यापारी एन.एम.खलिफा, रेवणसिद्ध आवजे, श्रीशैल अंबारे, रियाज बागवान उपस्थित होते.

दरम्यान, या बैठकीत डॉ. राजीव काळे यांनी राज्य शासनाच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मार्ट योजनेची माहिती दिली. या योजनेअंतर्गत कांद्याच्या साठवणुकीसाठी कोल्ड स्टोरेज बांधण्यासाठी सबसिडी तसेच इतर सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले. कांद्याचे उत्पादन केल्यानंतर कांद्याच्या साठवणुकीसाठी शेतकऱ्यांकडे सुविधा नसते. अशावेळी कांद्याचे नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी कोल्ड स्टोरेज उभारण्याची गरज असल्याचे मत डॉ काळे यांनी व्यक्त करत, राज्य शासनाच्या योजनेची आणि संशोधनाची माहिती विशद केली. या कांदा परिषदेमध्ये सहभागी आडते आणि व्यापाऱ्यांनी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून या योजनेची तसेच कांद्याच्या साठवणुकी संबंधीची माहिती घेतली. तत्पूर्वी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सभापती दिलीप माने यांच्या हस्ते प्रमुख मान्यवर पाशा पटेल यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कांदा परिषदेस व्यापारी, अडते आदींसह कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### पाशाभाईंनी मारला सोलापुरी हुग्गीवर ताव

राज्याच्या कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची कांदा परिषद संपन्न झाल्यानंतर सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या भोजनालयामध्ये स्वादिष्ट असे भोजन तयार करण्यात आले होते. यावेळी पाशा पटेल यांनी सोलापुरी हुग्गी, कडक भाकरी, दही शेंगा चटणी, कामगार रुचकर अशा व्यंजनावर ताव मारला. यावेळी त्यांनी भोजनाचे कौतुक केले.

**कांद्याच्या टर्मिनलसाठी आपण पुढाकार घ्यावा :** सोलापूर बाजारपेठ कांद्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा विक्रीसाठी आलेला कांदा सर्वत्र विक्रीला जातो. त्यामुळे सोलापूर कांद्याच्या टर्मिनल मार्केटसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी जागेची उपलब्धता आणि इतर सुविधा प्राप्त करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे प्रयत्न करावे लागतील. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती यासाठी पूर्णपणे सहकार्य करेल. येथील अडते व्यापारी संपूर्ण बाजारपेठ सांभाळतात. त्यामुळे कांद्याचे टर्मिनल भविष्यात होऊ शकते. त्यासाठी आपण पुढाकार घ्यावा. असे आवाहन कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना केले आहे.

**- दिलीप माने, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

**देशात आणि राज्यात एकच नियम असावा :** देशात आणि राज्यात अडत शुल्कावर सर्व समान नियम असणे गरजेचे आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात अडत व्यापाऱ्यांकडे अडत भरण्याची जबाबदारी दिली आहे. तर इतर राज्यात शेतकऱ्यांवर अडत लादली जाते. महाराष्ट्रात तसेच इतर राज्यात कांदा नेण्यासाठी १२ टक्के अडत शुल्क द्यावा लागतो. देशात आणि राज्यात सर्वत्र एकच नियम असावा. एकदाच अडत शुल्क वसूल करावी. दोनदा अडत शुल्क देणे व्यापाऱ्यांना परवडत नाही. यावर तोडगा काढणे गरजेचे आहे.

**- केदार उंबरजे, कांदा अडत व्यापारी**

**निर्यात मर्यादा आणि शुल्क यावर ठोस निर्णय हवा :** देशाचे निर्यात शुल्क आणि निर्यात मर्यादा यावर ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकार अचानक निर्यात बंदी करते. तर कधी निर्यातीवर मर्यादा लावली जाते. याचा परिणाम सोलापूरच्या कांदा बाजारपेठेवर होतो. देशाबाहेर कांदा पाठवताना व्यापाऱ्यांना अनेक अडचणी येतात. बांगलादेशमध्ये सोलापूरच्या कांद्याची मोठी मागणी असते. परंतु जाचक नियम व अटीमुळे व्यापार होत नाही. यावर अध्यक्ष या नात्याने आपण तोडगा काढावा. असे आवाहन पाशा पटेल यांना केले आहे.

**- एन.एम. खलिफा, कांदा अडत व्यापारी**

**सोलापूरच्या कांदा बाजारपेठेचे कौतुक :** सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस कृषि मूल्य आयोगाचे निमंत्रित सदस्य तथा नाशिक जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी दीपक पगार, पुण्यातील संशोधक व तज्ञ अभ्यासक श्रीकांत कुवळेकर आणि पुण्याच्या कृषी बाजाराचे तज्ञ दीपक चव्हाण हे ऑनलाईन कॉन्फरन्सद्वारे बैठकीस हजर होते. त्यांनी देखील या बैठकीत सोलापूरच्या कांदा बाजारपेठेचे कौतुक करताना सोलापूर कांदा मार्केट टर्मिनल किंवा हब मॉडेल होण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याला चांगला दर मिळतो. कांद्याचे टर्मिनल किंवा हब मॉडेल झाल्यास शेतकऱ्यांना अधिक चांगला दर मिळेल. यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मनोगत व्यक्त केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## महत्वाचे...

### वारकरी युवा मंचच्या शहराध्यक्षपदी प्रमोद डोंगरे

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर वारकरी युवा मंचच्या शहराध्यक्षपदी प्रमोद डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय वारकरी युवा मंचचे प्रदेशाध्यक्षा अभिनंदन गायकवाड यांच्या हस्ते डोंगरे यांना शहराध्यक्षपदाच्या नियुक्तीचे पत्र देण्यात आले. डोंगरे हे गेल्या अनेक वर्षापासून जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्या माध्यमातून कार्यरत आहेत.



### बालिकेचा विनयभंग करणाऱ्या वॉचमनविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

जुळे सोलापूरातील एका सोसायटीच्या ग्राऊंडमध्ये खेळणाऱ्या बालिकेचा विनयभंग करणाऱ्या वॉचमनविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पिडीत बालिकेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन राजू शंकरराव रंगदळ (रा. रूबी नगर, श्रीराम चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील पिडीता ही १६ नोव्हेंबर रोजी एका सोसायटीच्या ग्राऊंटमध्ये खेळत होती. त्यावेळी पिडीत बालिकेने वॉचमन राजू रंगदळ याला लाईट लावण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजूने पिडीतेला जवळ बोलावून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून पिडीतेचा विनयभंग केला. पोलिस उपनिरीक्षक तरंगे पुढील तपास करीत आहे.



### सात महिन्यापूर्वी पळवून नेलेली अल्पवयीन बालिका ताब्यात

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

गेल्या सात महिन्यापूर्वी पळवून नेलेल्या अल्पवयीन बालिकेस अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पुणे येथून ताब्यात घेत सोलापूरात आणले. विजापूर नाका पोलिस ठाण्याच्या हद्दीतून सुरज रमेश शिवशरण याने कशाचे तरी आमिष दाखवून त्या अल्पवयीन बालिकेस पळवून नेले होते. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपास करूनदेखील संशयित आरोपी सुरज शिवशरण व पिडीत बालिका मिळून येत नव्हते. त्यामुळे हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्यावतीने तांत्रिक माहितीच्या आधारे माहिती मिळवून यातील आरोपी सुरज शिवशरण व अपहरत मुलगी यांना १५ नोव्हेंबर रोजी पुणे येथील पर्वती पायथ्याला असलेल्या जनता वसाहतीमधून ताब्यात घेऊन विजापूर नाका पोलिस ठाण्यात हजर केले.



### पैशाच्या कारणावरून महिलेस मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**

पैशाच्या कारणावरूना महिलेस मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अफसाना फरिद बेग (वय ४१, रा. गोदुताई परूळेकर नगर, विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) या महिलेच्या फियादीवरून निशा उर्फ कृष्णाबाई केरबा माने, राहिबाई केरबा माने, संचिता केरबा माने, भोलेनाथ केरबा माने (सर्व रा. राजू गांधी नगर, भवानी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अफसाना बेग या त्यांची मुलगी महेक व वहिणी शमिम बेग असे मिळून जोडभावी पेठ चौक येथील पूर्व मुखी मारूती मंदीरसमोरून जात होत्या. त्यावेळी त्यांच्या ओळखीच्या निशा माने, राहीबाई माने, संचिता माने, भोलेनाथ माने हे भेटले. निशा माने हिने मी बंद गिरणी कामगार घरकुलसाठी २७ हजार रुपये २०२३ मध्ये भरले आहेत. तुम्ही तेथे काम करता, मला अजून घरकुल मिळाले नाही, तु माझे पैसे डबल दिले पाहिजेत असे म्हणून माने यांनी बेग यांना शिवीगाळ करून दमदाटी केली. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत

---

**महापालिका निवडणुकीसाठी आयोगाच्या निर्देशावरून पुन्हा झालेल्या आरक्षण सोडतीत**

# तीन प्रभागांमध्ये माजी नगरसेवकांना फटका

- ओबीसी महिला व पुरुष जागांमध्ये झाले बदल
- शहरातील ६ प्रभागातील १२ जागांवर फेरबदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशावरून पुन्हा आरक्षण सोडत आज काढण्यात आली. दि. ११ नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या आरक्षण सोडतीमध्ये बदल झाल्यामुळे पुन्हा एकदा ओबीसी महिला व सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी सोमवारी महापालिका प्रशासनाने आरक्षण सोडत काही प्रभागासाठी काढली. यामध्ये महापालिकेच्या सहा प्रभागातील बारा जागांवर नव्या आरक्षण सोडतीमुळे फेरबदल झाले आहेत. याचा काहींना फटका बसणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नियंत्रणाखाली ही फेर आरक्षण सोडत हुतात्मा स्मृती मंदिरात सकाळी १०.३० घेण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, नगररचना उपसंचालक मनीष भीष्णुरकर, निवडणूक अधिकारी प्रदीप निकते, सहाय्यक अभियंता रामचंद्र पेंटर, मालमत्ता विभाग अधीक्षक युवराज गाडेकर, सहाय्यक अभियंता महेश क्षीरसागर, निवडणूक कार्यालय अधीक्षक ओमप्रकाश वाघमारे यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते. यासाठी लिपिक गणेश कोळी, रहमान मोगल, मतीन सय्यद यांचे सहकार्य लाभले. मनपा शाळा क्रमांक सहा मधील विद्यार्थी अरहान बागवान (इयत्ता पाचवी) आणि मन्सूर बागवान (इयत्ता पाचवी) यांनी आरक्षण सोडत चिठ्ठी काढली. त्यांच्या समवेत सहशिक्षक मिलिंद खंदारे उपस्थित होते.


दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी काढलेल्या आरक्षण सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. या सोडतीच्या निकालामध्ये आणि इतिवृत्त याच्या तपासणीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील (ओबीसी) महिलांचे आरक्षण निश्चित करताना नियम क्र. ६ (३) (ब) नुसार प्रभाग क्रमांक २४- क येथील ओबीसी जागा थेट ओबीसी महिलांसाठी आरक्षित करणे आवश्यक होते. मात्र आरक्षण सोडतीत तसे न होता त्यामध्ये चूक झाली होती. यामुळे आता ही जागा थेट ओबीसी महिलांसाठी आरक्षित करावी आणि प्रभाग-२४- ड ही जागा सर्वसाधारण महिलांऐवजी सर्वसाधारण करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते.

यावबरोबरच ओबीसी महिलांच्या आरक्षण सोडतीसाठी केवळ अ जागेवरील प्रभागांचा समावेश केला गेला होता. मात्र ब जागांवरील अनुज्ञेय प्रभागांचा समावेश केला नसल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या ठरल्या नियमाम ध्ये बदल झाला होता. यामुळे उर्वरित ५ जागांची सोडत अनुज्ञेय प्रभाग क्रमांक-३, ४, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १५, १७, १८, २०, २१ आणि २५ अशा १६ प्रभागांमधील जागांचा समावेश करून ओबीसी प्रवर्गातील महिलांच्या ५ जागांची सोडत काढण्याची कार्यवाही शासनाने दि. २० मे २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या नियम ातील तरतुदीनुसार करावी. तसेच सर्वसाधारण महिलांच्या जागा देखील नियम ६ (४) नुसार नेमून देण्यात याव्यात ही कार्यवाही दिलेल्या प्रपत्र मधील कार्यक्रमानुसार करावी आणि सोडतीनंतर त्याचा निकाल तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावा असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकांनी यांनी सोलापूर महापालिका प्रशासनासह अन्य ८ महापालिकांना पाठविले होते.

यानुसार सोमवारी महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ओबीसी महिला व सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी अपेक्षित आरक्षण सोडत काढली. नव्या फेर आरक्षण सोडतीमध्ये मात्र राज्य निवडणूक आयोगाने ओबीसी प्रवर्गाला एक जागा कमी दिल्यामध्ये कोणतीही बदल केली नाही. त्यामुळे ओबीसी प्रवर्गासाठीची ती एक जागा तशीच कमी राहिली आहे. तर दुसरीकडे राज्य निवडणूक आयोगाने थेट २५ जागा नेमून दिल्या होत्या आणि २ सोडतीने निश्चित झाल्या होत्या अशा २७ जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) निश्चित केल्या यामधून महिलांसाठीच्या १४ जागा थेट किंवा सोडतीने यथास्थिती परिस्थितीनुसार काढण्याचे निर्देश दिले होते. या सोडतीमध्ये ५ जागा ओबीसी महिलांसाठी निश्चित करण्यात आल्या.

सोमवारी घेण्यात आलेल्या फेर सोडतीमध्ये आयोगाच्या निर्देशानुसार त्या १६ प्रभागांमधून पाच जागा सोडतीने निश्चित करण्यात आल्या. या फेरबदल्यामुळे काही प्रभागांमधील विद्यमान माजी नगरसेवकांना फटका बसला आहे तर काही जवळपास इतर प्रभागांमध्ये अदलाबदल झाले आहेत. यामुळे अनेकांपुढे 'सर्वसाधारण' चा मार्ग शोधावा लागणार आहे.





### फेर आरक्षणात झालेले बदल असे...

- प्रभाग १० अ- मधील ओबीसी ऐवजी महिला ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षित
- १० क- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित
- १३ ब- मधील ओबीसी ऐवजी महिला ओबीसी प्रवर्गासाठी प्रवर्गासाठी आरक्षित
- १३ क- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित
- १५ ब- मधील ओबीसी ऐवजी ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित
- १५क- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित
- प्रभाग १८ अ- मधील ओबीसी ऐवजी ओबीसी महिलांसाठी आरक्षित
- १८ क- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित
- प्रभाग २० अ- मधील ओबीसी ऐवजी ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित
- प्रभाग २० क- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित
- प्रभाग २४ क- मधील ओबीसी ऐवजी ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित
- प्रभाग २४ ड- मधील सर्वसाधारण महिला ऐवजी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित.

---

## सोलापुरात थंडीची लाट सुरू; तापमानाचा पारा घसरला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

सध्या सोलापुरात थंडीचा कडाका वाढला असून, अजून पुढील आठवडाभर सोलापूरसह पुणे, मुंबई, कोकण, मराठवाडा, विदर्भासह मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट कायम राहणार आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली नोंदवलं गेलं आहे. तर सोलापुरातही कमाल ३० अंश सेल्सियस ते किमान १४.०९ सेल्सियसपर्यंत तापमान आले आहे. यामुळे सकाळी रात्री ७ वाजल्यापासून सकाळी ९ वाजेपर्यंत बोचरी थंडी अबालवृध्दांना त्रासदायक ठरत आहे.

महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला असून, पुढील आठवडाभर सोलापूरसह मुंबई, पुणे, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट कायम राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. उत्तरेकडील जिल्ह्यांपासून मराठवाड्यापर्यंत तापमानात लक्षणीय घट अपेक्षित आहे. या थंडीमुळे नागरिकांना उबदार कपड्यांची गरज भासत आहे, तर शेकोट्या पेटवण्याचे प्रमाणही वाढलं आहे. या थंडीचा आनंद घेण्यासाठी अनेक नागरिक सकाळीच घराबाहेर पडू लागले आहेत. थंडीच्या



दिवसात चालणे, व्यायाम करणे शरिरासाठी चांगले असल्याने अनेकजण सकाळच्या प्रहरी बाहेर चालू लागले असल्याचे दृष्य दिसत आहे. पुढील काही दिवसांमध्ये थंडीचा कडाका अजून वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तापमान खाली आल्याने सध्या प्रचंड गारठा निर्माण झाला आहे. हवेत गारवा असल्याने दिवसभर थंडी टिकून असल्याने शाळकरी विद्यार्थी, वृद्ध आणि नागरिक उबदार कपड्यांचा वापर करत आहेत. हे उबदार कपडे खरेदी करण्यासाठी बाजारपेठात आणि विशेषत: पालिकेजवळील नेपाळी लोकांजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे. सकाळी ग्रामीण भागातून शहरात येणारे दूध विक्रेते, भाजी विक्रेते यांना या थंडीचा फटका बसत आहे. दुसरीकडे गहू, हरभरा यांसारख्या रबी पिकांसाठी ही थंडी पोषक आहे. ज्वारी पिकाला मात्र या थंडीचा फटका बसण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित आहेत.

---

## महापालिका प्रभाग आरक्षण प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने

### भाजपाचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचा सोडतवेळीच आक्षेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका प्रशासनाकडून सोमवारी राबवण्यात आलेली महापालिका प्रभाग आरक्षण प्रक्रिया ही चुकीच्या पद्धतीने झाली, असा आक्षेप भाजपचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी घेतला.

सोमवारी हुतात्मा स्मृती मंदिरात सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी दुसऱ्यांदा सुधारित प्रभाग आरक्षण प्रक्रिया घेण्यात आली. ही प्रक्रिया सुरू असतानाच त्यास आक्षेप घेताना नरेंद्र काळे यांनी म्हटले की, महापालिका निवडणुकीसाठी सुधारित आरक्षण प्रक्रिया करण्यात आली. ही प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रम ाणे न झाल्याने कुठेतरी गडबड झाली आहे. प्रभाग क्रमांक २४ संदर्भात याचे उदाहरण देता येईल. वास्तविक ही प्रक्रिया राबवताना राज्य निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी या ठिकाणी असणे आवश्यक आहे. मात्र या ठिकाणी प्रतिनिधी नसताना ही प्रक्रिया केलीच कशी? असा सवाल नरेंद्र काळे यांनी केला. यापूर्वीच्या निवडणुकीत ओबीसीच्या २८ जागा होत्या, यंदा त्या २७ झाल्याने एक जागा कमी झाली आहे. ही बाब ओबीसी घटकावर अन्यायकारक आहे, असेही ते म्हणाले.

#### निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणेच प्रक्रिया : डॉ. ओंबासे

नरेंद्र काळे यांनी आरक्षण सोडत वेळी घेतलेल्या आक्षेपावर तिथेच खुलासा करताना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे म्हणाले की, आरक्षण सोडत प्रक्रिया ही राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच होत आहे. याबाबत कोणाची काही हरकत, सूचना असेल तर ती दि. १९ ते २६ नोव्हेंबर या मुदतीमध्ये अधिकृतपणे नोंदवावी. हा कार्यक्रम नियोजित आहे.



#### प्रभाग क्रमांक १५ मध्ये घोळ झाल्याची हरकत

आरक्षण सोडती दरम्यान प्रभाग क्रमांक १५ मध्ये घोळ झाल्याची हरकत किरण पवार यांनी घेतली. त्यांच्या म्हणण्यानुसार एका प्रभागात दोन महिलांना आरक्षण देता येत नाही. प्रत्येक प्रभागात नियमानुसार एक सर्वसाधारण महिला अपेक्षित आहे. या प्रभागात एस. सी. महिला आणि ओबीसी महिला असे दोन जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. या पद्धतीवर आक्षेप असल्याचे सांगितले आणि अन्य एकाने याच प्रभागातील ओबीसी पुरुषावर या पद्धतीने अन्याय झाल्याची हरकत घेतली मात्र ठरल्या कार्यक्रमानुसार लेखी स्वरूपात हरकती घ्याव्यात असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केल्याचे दिसून आले.

---

# प्रथमेश कोठे, चेतन नरोटे, काळे, आडम यांची अडचण

### महापालिका निवडणुकीसाठी फेर आरक्षण सोडतीनंतर पुन्हा एकदा बदलली राजकीय गणिते; घ्यावा लागणार सर्वसाधारणचा आधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी घेण्यात आलेल्या फेर आरक्षण सोडतीनंतर ६ प्रभागांमधील बदलाने पुन्हा एकदा राजकीय गणिते बदललेली आहेत. यामुळे प्रथमेश कोठे, कामिनी आडम, चेतन नरोटे, वैष्णवी करगुळे आणि रियाज हुंडेकरी यांना सर्वसाधारण प्रवर्गाचा आधार घ्यावा लागणार आहे. तर प्रभाग क्र. २४ मधील भाजपाच्या माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे आणि माजी उपमहापौर राजेश काळे यांना सर्वसाधारण प्रवर्गातील एका जागेवर रस्सीखेच करावी लागणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूरहिला ओबीसी प्रवर्गासाठी फेर आरक्षण सोडत काढले. १६ प्रभागाच्या चिठ्ठ्या टाकून त्यामधील पाच प्रभागातील ओबीसी महिला आरक्षण सोडत आणि एका प्रभागात थेट ओबीसी महिला आरक्षण टाकण्याच्या प्रक्रियेमध्ये ६ प्रभागातील १२ जागांवर बदल झाला आहे. या बदलामुळे या प्रभागातील मातब्बरांना सर्वसाधारण प्रवर्ग जागेचा पर्याय घ्यावा लागणार आहे. तर काही प्रभागांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गाऐवजी सर्वसाधारण आरक्षण पडल्याने याचा फायदा देखील काहींना होणार असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक १० मधील बदलामुळे आता माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांना सर्वसाधारण जागेवर निवडणूक लढवावी लागणार आहे. गतवेळी ते ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवून विजयी झाले होते. प्रभाग क्रमांक १३ मध्ये माजी नगरसेविका कामिनी आडम यांनी गतवेळी सर्वसाधारण महिला या



प्रवर्गामधून निवडणूक लढविल्या होत्या आता त्यांना महिला प्रवर्गातील जागा न सुटल्याने त्यांना सर्वसाधारणचाच सहारा घ्यावा लागणार आहे. प्रभाग १५ मध्ये चेतन नरोटे हे ओबीसी प्रवर्गातून तर वैष्णवी करगुळे यांनी सर्वसाधारण महिला प्रवर्गातून निवडणूक लढविल्या होत्या. आता त्यांना त्या प्रवर्गामध्ये जागा नसल्याने सर्वसाधारण प्रवर्गाचाच पर्याय राहणार आहे.

प्रभाग क्रमांक १८ मधून गत वेळी ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेले प्रभागातील एकमेव काँग्रेस उमेदवार रियाज हुंडेकरी यांना प्रभागात ओबीसी महिला आरक्षण पडल्याने सर्वसाधारण जागेवरच निवडणूक लढवावी लागणार आहे. प्रभाग २० मधून प्रवीण निकाळजे यांनी एस. सी. प्रवर्गातून निवडणूक लढवून ती जिंकली होती मात्र आता प्रभागातील ही जागा ओबीसी महिलांसाठी राखीव झाली. यामुळे आता त्यांना सर्वसाधारण प्रवर्गातून निवडणूक लढवावी लागणार आहे. अशावेळी मात्र प्रभाग रचनेमध्ये मोठा भाग कट होऊन नवा भाग जोडला गेल्याने व या प्रभागात प्रभाग क्रमांक २१ मधील भाग जोडला गेल्याने या प्रभागाचे चित्र पालटले आहे. यामुळे या प्रभागातील सर्वसाधारण प्रवर्गाच्या दोन जागांवर निकाळजे, बाबा मिस्त्री यांच्याबरोबरच तौफिक शेख, अजहर हुंडेकरी व इतर यांचीही भाऊ गर्दी होण्याची शक्यता असून हा झांगडगुत्ता निवडणुकीच्या शेवटपर्यंत कायम राहणार आहे. याचबरोबर प्रभाग २४ मधून मागील वेळी अनुसूचित जमाती प्रवर्गातून निवडून आलेल्या माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या जागेवर अनुसूचित जमाती महिलासाठी आरक्षण जाहीर झाले. तर याच प्रभागात दुसऱ्या जागेवर अनुसूचित जाती महिला, ओबीसी आणि सर्वसाधारण महिला असे आरक्षण पडल्याने काळे यांच्यासमोर निवडणुकीत उभारण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती मात्र सोमवारी झालेल्या फेर आरक्षण सोडतीमध्ये ओबीसीच्या ठिकाणी महिला ओबीसी तर सर्वसाधारण महिलेच्या ऐवजी सर्वसाधारण आरक्षण पडल्याने त्यांना निवडणुकीसाठी पुन्हा संधी प्राप्त झाली. मात्र या संधीनंतरही आता त्यांना सर्वसाधारण प्रवर्गाच्या जागेवर निवडणूक लढविताना भाजपाचे नरेंद्र काळे यांचे मोठे आव्हान असणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# समाज सुधारण्याच्या कामात पत्रकारांनी योगदान द्यावे

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे पंढरपुरात पत्रकारांच्या कार्यशाळेत आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ नोव्हेंबर-**
समाज सुधारण्याचे कार्य शालेय जीवनापासूनच सुरू झाले पाहिजे आणि या प्रक्रियेत पत्रकारांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी केले. पंढरपूर येथे व्हॉइस ऑफ मीडिया व व्ही ओ एम नॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार कार्यशाळेत ते मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमास व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रमुख संदीप काळे, उद्योजक राणा सूर्यवंशी, वरिष्ठ पत्रकार संजय आवटे,इस्कॉन पंढरपूर अध्यक्ष प्रल्हाद प्रभू, श्रीकृष्ण चैतन्य स्वामी महाराज, इस्कॉन सिकंदराबादचे अध्यक्ष सहदेव प्रभू यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पत्रकार उपस्थित होते.

राज्यपाल बागडे यांनी भारतीय संस्कृतीच्या नैतिक मूल्यांचा गौरव करताना सांगितले की, प्राचीन व मध्ययुगीन इतिहासकार, अभ्यासक आणि परकीय प्रवासी यांच्या लेखनातून भारतीय संस्कृती समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी युक्त होती. इंग्रजांनी १८३५ मध्ये गुलामगिरी निर्माण करणारी शैक्षणिक पद्धती आणून या मूल्यांवर घाला घातला. मात्र, २०२० पासून केंद्र शासनाने शैक्षणिक धोरणात अमूलाग्र बदल करून नवसंस्कारित दिशा दिली आहे.

राज्यपालांनी प्रसारमाध्यम क्षेत्रातील विविध उदाहरणांचा दाखला देत पत्रकार समाज सुधारण्याच्या कार्यात कशी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात याचे विवेचन केले. त्यांनी नालंदा विद्यापीठाच्या आयुर्वेद शाखेचे उदाहरण देत प्राचीन भारतातील संशोधन वृत्ती आणि शिक्षणपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. इंग्रजांच्या काळात गव्हर्नर मेकॉले यांच्या शैक्षणिक धोरणामुळे भारतीय मूल्यांवर परिणाम झाला, असेही त्यांनी नमूद केले. पत्रकार समाजाचा आरसा असून, जनतेचे मत आणि गरजा राजकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य ते करतात, असे सांगून त्यांनी व्हॉईस ऑफ मीडिया संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमात राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान राज्यपालांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अनिल मस्के यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात व समारोपही राष्ट्रगीताने करण्यात आला.

**पहिले पत्रकार नारदमुनी**

पत्रकारांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना त्यांनी नारद मुनी यांचा उल्लेख 'पहिले पत्रकार' म्हणून केला आणि सांगितले की, राष्ट्र, राज्य, शहर आणि गावाच्या विकासात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विकासात्मक दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी काम केल्यास समाजात सकारात्मक बदल घडतो.




# महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेनेच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेनेच्यावतीने राज्यातील गुणवंत शिक्षकांचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक शिक्षकेतर उपक्रमशील शैक्षणिक संस्था अंगणवाडी सेविकांचा व उपक्रमशील मुख्याध्यापकांचा शिवस्मारक सभागृह येथे पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



यामध्ये राज्यभरातून २२ पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये उपक्रमशील शैक्षणिक संस्था मॉडर्न एज्युकेशन सोसायटी पंढरपूर, नवभारत ज्ञानवर्धीनी पुणे यांचा सन्मान केला. उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून सारंग पाटील, प्रभाकर ठाकरे, इरफान शेख, कृष्णपरमेश्वर सुतार, विद्या कांबळे यांना गौरविण्यात आले. तर गुणवंत शिक्षक म्हणून चंद्रकांत चामे, अंकुश सोहनी, किशोर देवरे, माधव माने, साहेराबानु मकानदार, शशिकांत नाब्दे, प्रशांत म्हेत्रे, बंडु मोरे, आफ्रिन शेख, मनोज केदार, नुतन गोलांडे, गीतांजली कोले यांना पुरस्कार देण्यात आले. शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार बळवंत कटप यांना प्रदान केला गुणवंत अंगणवाडी सेविका म्हणून अनिता कांबळे व कविता शिवशरण यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे राज्य अध्यक्ष मनोज चव्हाण यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, लोकसभाध्यक्ष प्रशांत इंगळे, जयवंत हक्के, सुधाकर तांबोळी यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक संतोषकुमार घोडके तर सूत्रसंचालन गीतांजली कोले व आभार वीरसंगप्पा भोज यांनी मानले. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेनेचे विश्वास गजभार, प्रकाश कोळी, मनोज सांळुंखे, सचिन पाटील, मंगल मुळीक, प्रभाकर कारंडे, म्हानुर उपस्थित होते.

# यूटीएस प्रणालीद्वारे मध्य रेल्वेने मिळविले २० लाख


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
मध्य रेल्वेने एटीव्हीएम, यूटीएस प्रणाली मोबाईल युटीएस इत्यादींच्या माध्यमातून प्रवाशांना सुलभ तिकिटांची सुविधा देण्याची नेहमी आग्रही भूमिका बजावली आहे. ३१ ऑक्टोबर रोजी सुरुवात झाल्यापासून १२ नोव्हेंबरपर्यंत मोबाईल यूटीएस सहाय्यकांद्वारे १२.७३३ तिकिटांच्या विक्रीतून २०.३३ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.

मध्य रेल्वेने ही सुविधा ३१ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुरू केली असून तिकीट खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांसाठी तीन सहाय्यक नियुक्त केले आहेत. एमयुटीएस सहाय्यक म्हणून ओळखले जाणारे हे कर्मचारी त्यांच्यासोबत एक मोबाईल फोन आणि एक लहान तिकीट प्रिंटिंग मशीन अशा दोन्ही सुविधा घेऊन फिरतात हे एमयुटीएस सहाय्यक कॉनकोर्स होल्डिंग एरिया किंवा रेल्वे परिसरात रांगेत उभा असलेल्या प्रवाशांकडे जाऊन प्रवास भाडे स्वीकारून तिकीट तात्काळ जारी करतात. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व्यतिरिक्त भारतीय रेल्वेने नवी दिल्ली, कोलकत्ता बंगरूळू आणि चेन्नई या स्थानकावरही मोबाईल युटीएस सहायकांची सुरुवात केली आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी १२७०

**जितुकें कांहीं आपणासी ठावें ।**
**तितुकें हळुहळु सिकवावे ।**
**शाहाणे करुनि सोडावे । बहुत जन ।।**

माझ्यावर सामाजिक ऋण नाही, असे कोणालाही म्हणता येणार नाही. कारण प्रत्येकावर काही प्रमाणात का होईना सामाजिक ऋण असतेच. या ऋणांची शंभर टक्के परतफेड करता येणे तसे कठीण असते. याचा अर्थ असा नव्हे की, आमच्याने ही परतफेड होतच नसेल तर मग या ऋणांचा परतफेडीचा प्रयत्न तरी कशाला करायचा ? असे नव्हे. प्रत्येकाने जमेल तशी परतफेड चालूच ठेवली पाहिजे. ही परतफेड ठप्प झाली तर सामाजिक संतुलन बिघडते. आपणही समाजाचा एक अविभाज्य भाग असल्याने बिघडत्या सामाजिक संतुलनाचा विपरीत परिणाम आपणालाही भोगावा लागतो. हा विपरीत परिणाम भोगावा लागू नये तसेच काही अंशी का होईना या ऋणातून मुक्त होता यावे म्हणून जे काही चांगले देता येईल ते देत राहावे.



देण्यासारखे काहीच नाही, असा व्यक्ती असूच शकत नाही. अर्थात, कोणी ज्ञान, कोणी दान, कोणी सेवा, कोणी सहकार्य, कोणी प्रेम किंवा कोणी अन्य काही देऊ शकतो. यातील बऱ्याच गोष्टी दिल्याने वाढत जाणाऱ्या आहेत.

ज्ञान दिल्याने वाढतच जाते, हे सत्य असले तरी अनेक ज्ञानी लोक त्यांच्याकडील ज्ञान सहजासहजी कोणाला देत नाहीत. खरे म्हणजे, अशांना ज्ञानी म्हणण्यापेक्षा केवळ बुध्दीवान किंवा हुषार म्हणणे योग्य असेल. कारण ज्ञानी तेच असतात, जे इतरांना देतात. बुध्दी, अनुभव असूनही जर इतरांना देत नसतील तर त्यांना ज्ञानी का म्हणायचे. विशेष म्हणजे ज्ञानी होणे ही काही कोणाची मक्तेदारी नाही. तुम्हा-आम्हाला, कोणालाही ज्ञानीच्या पंक्तीला बसता येते. चांगले कोणी द्यावे याला बंधन नाही. अर्थात, ज्याच्याकडे अनुभव, ज्ञान आहे तो लहान आहे की मोठा याचा विचार न करता गरजूने त्याच्याकडून स्वीकारायचे असते व ज्ञानींनी गरजूंना द्यायचे असते. देण्यात अहंकार नसावा व घेण्यात कमीपणा नसावा. कारण अहंकाराने दिले व कमीपणाने घेतले तर ते व्यवस्थीत पचनी पडत नाही. पैसा खर्च न करता सामाजिक ऋणांची परतफेड करण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. समर्थ रामदास म्हणतात, जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावे । शाहाणे करुनि सोडावे । बहुत जन बरेच लोक कृतकार्य होऊन निष्काम अवस्थेला पाहोचलेले असतात. अशा श्रेष्ठांना देखील, लोकांची सदाचरणाबद्दल आस्था वाढावी म्हणून ज्ञानोत्तर काळीही ज्ञानदानाचे कर्म करावे लागते. या अनुषंगाने श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं . ज्ञान हे एखाद्या व्यासपीठावरुनच देता येते असे नव्हे, तर चालता-बोलता, बसता-उठता किंवा सहज संपर्कात येणाऱ्यांनाही देता येते. कोणाला केव्हा कोणत्या मार्गदर्शनाची, सहकार्याची गरज पडेल हे सांगता येत नाही. म्हणून ज्याच्याकडे देण्यासारखे आहे त्यांनी नि:स्वार्थ भावाने देण्यास तयार असावे. आम्ही तर असे म्हणू की, एखाद्याला सामाजिक ऋणांची परतफेड करायचीच नाही, तर त्याने आवश्य ही परतफेड करु नये. मात्र त्याने असेही कोणते वर्तन करु नये की ज्यामुळे समाजातील अडीअडचणीत, समस्येत भर पडेल.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. १८ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - कार्तिक
कृ. त्रयोदशी (०७.११)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- स्वाती (अहोरात्र)
योग - आयुष्यमान (०८.०८)
करण - विष्टी (२०.२६)
....राहू काल...
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष - शिवरात्री.
१९९२: ललित मोहन शर्मा यांनी भारताचे २४ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९३: दक्षिण अफ्रिकेत २१ राजकीय पक्षांनी नवीन संविधानाला मान्यता दिली.
२०१५: टेनिसपटू रॉजर फेडरर ने नोव्हाक जोकोविच ला पराभूत करून एटीपी वर्ल्ड टूर लंडन च्या उपांत्यफेरीत प्रवेश केला.



# सुयश विद्यालयात रंगली चिमुकल्यांची बालसभा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ नोव्हेंबर-**
सुयश विद्यालय बार्शी येथे १४ नोव्हेंबर बाल दिनाच्यानिमित्ताने उत्साह पूर्ण वातावरणात इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी बालसभा सादर केली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी जिया शिंदे, उपाध्यक्ष म्हणून चकोर आयुष तसेच प्रमुख पाहुणे म्हणून इयत्ता पहिलीचा विद्यार्थी स्वयम मंडलिक व अनया वाघ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. नंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचा सत्कार समारंभ झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी पंडित नेहरु यांच्याविषयी आपली मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनी वेदिका मोरे, काव्या मुंढे व संजीवनी जमाले यांनी केले. आभार पायघन यांनी मानले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे संस्थापक नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका नलवडे तसेच मुख्याध्यापिका जगताप, उपमुख्याध्यापक येवले, सुपरवायझर देशमुख उपस्थित होते.

# संत तुकाराम चौकातून ४० हजारांची दुचाकी चोरीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**
शहरातील संत तुकाराम चौकातून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत रोहित सोमशंकर आष्टगी (वय २६, रा. मुमताज नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास रोहित आष्टगी याने त्याची एमएच १३ बीजी ८१३६ क्रमांकाची दुचाकी ही संत तुकाराम चौकात हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेजली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.



# हत्तुरे वस्ती येथे नियोजित श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे भूमिपूजन

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
हत्तुरे वस्ती येथील मल्लिकार्जुन नगरात नियोजित श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे कार्तिक महिन्याचे औचित्य साधून उत्पत्ती एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार हत्तुरे व सुविद्य पत्नी विद्या हत्तुरे या दांम्पत्याच्या हस्ते भूमिपूजनाची पूजा करण्यात आली.

अध्यक्षस्थान वारकरी संप्रदायाचे हभप निवृत्ती ताकमोगे महाराज यांनी भूषवले. याप्रसंगी नागेश इनामदार, वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष शहराध्यक्ष हभप संजय पवार महाराज, आप्पा माने महाराज, अच्युत मोफरे महाराज, जाधव महाराज, राऊत महाराज, बाळू कवडे, दीपक हरवाळकर, संत सेना महाराज संप्रदायाचे हभप रामलू कोंडूर, पांडुरंग चौधरी, सदगुरु परिवाराचे राजू कोल्हे, माजी नगरसेवक दत्ता ताकमोगे, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते प्रा.काकासाहेब कुलकर्णी, राधाकृष्ण पाटील, प्रा. संजय बनसोडे, रायगोंडा बिराजदार, पत्रकार अजित उंब्रजकर, मंदिराचे मूर्तिकार सगर उपस्थित होते. यावेळी कुंभारी गाव तंटामुक्तचे उपाध्यक्ष संजय चाबुकस्वार, चंद्रकांत कळकेळी, मजरेवाडीचे स्वामी, राजशेखर हत्तुरे, नागेश हत्तुरे, रवी बडवणे, पंचप्पा शिंदगी, प्रसाद चोरगी, लोणी, गणेश धोकटे, ओंकार हत्तुरे, इराप्पा पटणे, सिद्धार्थ हत्तुरे, संदेश हत्तुरे, रवी बनसोडे, बबलेश्वर, भूषण, नकाते, फुंडीपल्ले, सोलापुरे, बिराजदार, भैरू कांबळे, माळी, सिद्धाराम सालीमठ, रमेश जेऊरे, बजरंग तल्ले, शुभम हरकारे, योगीनाथ कापसे, राम मोरे, किरण राठोड, चंदू ख्याड उपस्थित होते.

# जनावरे शेतात सोडल्याच्या कारणावरून वृध्दास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर -**
जनावरे शेतात सोडल्याच्या कारणावरून हुन्नूर (ता. मंगळवेढा) येथे वृध्दास मारहाण करण्यात आली. लक्ष्मण लिंगप्पा कुंभार (वय ६७, रा. महमदाबाद, हुन्नूर, ता. मंगळवेढा) असे जखमीचे नाव आहे. १६ नोव्हेंबर रोजी रात्री राहत्या घराजवळ जनावरे शेतात सोडल्याच्या कारणावरून महादेव बिराप्पा कुंभार, बिरप्पा दरेप्पा कुंभार व इतर तीनजणांनी मिळून काठी व सत्तुराने लक्ष्मण यांस मारहाण केली.

जखमी अवस्थेत लक्ष्मण यास उपचारासाठी पुतण्या सुरेश कुंभार यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# ९ हजार विद्यार्थ्यांना चित्रकला परीक्षेची पुन्हा संधी

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
अतिवृष्टी-महापुरामुळे सोलापूर जिल्ह्यात सीना नदीकाठावरील केंद्रात परीक्षा झालेली नव्हती. त्यांच्यासाठी १८ ते २१ नोव्हेंबर दरम्यान एलिमेंटरी, इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचे होणार आहे.

कला संचालनालय तर्फे २४ ते २७ सप्टेंबर दरम्यान राज्यभरात एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा घेण्यात आल्या. सोलापूर शहर व जिल्ह्यातून ५२ केंद्रातून एलिमेंटरी ग्रेड परीक्षेस १३ हजार ६१९ इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस १० हजार ४८० असे एकूण २४ हजार ९९ विद्यार्थी परीक्षांची नोंद आहे. पण त्यावेळी जिल्ह्यांतील काही तालुक्यांमध्ये अतिवृष्टी, महापुरामध्ये जनजीवन विस्कळीत झाले होते. त्यामुळे करमाळा, माढा, कुर्डुवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी, निमगाव, वाखरी, बार्शी, वैराग, जवळगाव, गौडगाव, गौडगाव, उपळे, नरखेड, भंडारकवठे, मोहोळ, कामती, माळकवठे, बरुर या २१ केंद्रातील ९०९६ विद्यार्थ्यांची परीक्षा झालेली नाही. ती परीक्षा आता होणार असल्याचे राज्य शैक्षणिक कला शिक्षक संघाचे सहसचिव शांतप्पा काळे यांनी कळविले आहे.

**त्याचे वेळापत्रक असे**

मंगळवार, १८ नोव्हेंबर : एलिमेंटरी ग्रेड : सकाळी १०:३० ते १. स्मरणचित्र : दुपारी २ ते ४.

बुधवार १९ नोव्हेंबर : सकाळी १०:३० ते १ संकल्पचित्र, नक्षीकाम. दुपारी २ ते ४ कर्तव्यभूमिती, अक्षरलेखन .

गुरुवार २० नोव्हेंबर : इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड - सकाळी १०:३० ते १:३०: स्थिर चित्र : दुपारी २:३० ते ८:३०.

शुक्रवार २१ नोव्हेंबर : स्मरणचित्र सकाळी १०:३० ते १:३० संकल्पचित्र-नक्षीकाम. दुपारी २:३० ते ५:३०: कर्तव्य भूमिता, घन-भूमिती व अक्षरलेखन.

# माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांचा अचानक भेटीचा निर्णय स्वागतार्ह

## प्राथमिक विभागानेही असा निर्णय घेण्याची गरज

सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी विद्यार्थी व पालकांसाठी दिलासादायक निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील कमी निकाल लागलेल्या व पालकांच्या तक्रारी असणाऱ्या शाळांना अचानक भेटी देऊन तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण अधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे शाळा सुधारणा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना ज्ञानदान न करता जिल्हा परिषद व इतर ठिकाणी विनाकारण फिरणाऱ्या शिक्षकांवर वचक राहणार आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी जगताप यांनी घेतलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

माध्यमिक शिक्षण विभाग म्हणजे कायम शिक्षकांच्या तक्रारी आणि शाळेच्या समस्याबाबत काम करणारा विभाग. मात्र, सोलापूरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप यांनी तक्रारी आणि समस्या सोडविण्याबरोबर शाळांचे निकाल आणि गुणवत्ता सुधारणेला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे भावी पिढीचे भविष्यही उज्वल होणार आहे. तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्थापन केलेल्या संस्थाचालकांवर अंकुश राहणार आहे. ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी वारंवार शाळेसंदर्भात तक्रारी करताना दिसून येतात. त्यामुळे माध्यमिक शिक्षण विभागासंबंधी पालकांमध्ये नकारात्मक भावना दिसून येते. मात्र, शिक्षणाधिकारी जगताप यांच्यासारखे संवेदनशील अधिकारी सकारात्मक निर्णय घेत आहेत. हे त्यांच्या शाळा तपासणीच्या निर्णयावरून दिसून येते.

शाळा तपासणी केल्यानंतर शाळेतील अनेक त्रुटी उघडकीस येणार आहेत. अनेक शाळांमधील प्रवेश फी, आरटीई विद्यार्थ्यांचे प्रवेश, मुलींसाठी शौचालय, तक्रार निवारण पेटी, प्राथमिक औषधोपचार किट, मुलांसाठी खेळाचे मैदान, विज्ञान खोली, शैक्षणिक साहित्य, अत्याधुनिक अध्यापन पध्दत, संगणक खोली, मुलांसाठी बैठक व्यवस्था, बेंच व्यवस्था, शिक्षकांमधील गुणवत्ता यासह इतर भौतिक सुविधांची तपासणी होणार आहे. तसेच दहावी व बारावी परीक्षेत निकाल कमी लागला असल्यास त्यामागील कारणांची चौकशी होऊ शकते. अनेक परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट असल्याने हुशार व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर परिणाम होतो. त्यामुळे त्या मुलांना संरक्षण देण्याबरोबरच शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी मार्गदर्शन आणि सल्लाही मिळू शकतो. त्यामुळे शिक्षणाधिकारी जगताप यांनी शाळा तपासणीचा घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा पालकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

एकीकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप यांनी कमी निकाल लागलेल्या दहावी व बारावी शाळा तपासणीचा निर्णय घेतला आहे. तर दुसरीकडे प्राथमिक विभाग मात्र विद्यार्थी हिताचे निर्णय न घेता नियमित कामकाज करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शिक्षकांना शिस्त लावण्यासाठी शाळांना अचानक



**जिल्हा परिषदेतून**
**अमोगसिध्द मुंजे**
**मो. 9423535294**

भेटी देण्याचा निर्णय घेणे गरजेचे आहे. जिल्हा परिषदेचे अनेक शिक्षक संघटनांच्या माध्यमातुन काम करण्यासाठी शाळा सोडून जिल्हा परिषद व अन्यत्र वावरताना दिसून येतात. त्यामुळे शाळेतील अभ्यासक्रमात मुले मागे असल्याचे दिसून येतात. वास्तविक पाहता शाळेतील अभ्यासक्रम संपवून शिक्षकांनी संघटना व इतर कामे करणे बंधनकारक आहे. मात्र, शिक्षकांकडून मुलांच्या शिकविण्याला दुय्यम स्थान देत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाधिकारी शेख यांनी शसळांच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी व शिक्षकांना शिस्त लावण्यासाठी आठवड्यातून एक दिवस शाळांना भेट देण्याची आवश्यकता आहे. मात्र दैनंदिन कामामुळे व शिक्षकांच्या समस्यांमुळे ते कार्यालयाच्या बाहेर दौरा करीत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप व प्राथमिक शिक्षणाधिकारी शेख यांनी संयुक्तपणे अचानक शाळा तपासणी केल्यास दोन्ही स्तरातील शाळांची गुणवत्ता सुधारणार आहे. तसेच शिक्षकांमध्ये प्रशासनाविषयी गांभीर्य निर्माण होण्याची शक्यता आहे. अचानक शाळा तपासणीमुळे प्रशासनाचे कामही दिसून येणार आहे. शिवाय कामचुकार व फुकट पगार घेणाऱ्या शिक्षकांचे धाबे दणाणार आहेत. यामुळे दहावी व बारावी परीक्षेत गैरमार्गांचा होणारा वापर बंद होणार आहे. अनेक शाळांमधील गैरकृत्यही उघडकीस येणार आहेत. त्यामुळे प्रशासनासह संस्थाचालकांमध्ये प्रशासनाविषयी कारवाईची भीती निर्माण होणार आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी जगताप यांनी कमी निकाल लागलेल्या शाळा तपासणीच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. दोन महिन्यांनंतर दहावी व बारावी परीक्षा सुरू होणार आहेत. त्यामुळे बोर्डाच्या परीक्षेतील गैरमार्ग टाळण्यासाठी व कॉपी प्रकार बंद करण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांच्या या निर्णयाला विशेष महत्व प्राप्त होत आहे.

# खासगी दूध संघांकडून दराबाबत मोठी गफलत

## दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि,१७ नोव्हेंबर-**
पिलीवसह माळशिरस तालुक्यातील अनेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाकडे वळले आहेत. या भागात शिवामृत वगळता एकही शासकीय दूध संघ नसल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना खासगी दूध संघाकडे दूध घालण्याशिवाय पर्याय नाही. ही बाब खासगी दूध संस्थांच्या पथ्यावर पडत असून दूध दराबाबत मोठी गफलत दिसून येत आहे. याद्वारे दूध उत्पादक शेतकऱ्यांची जणू आर्थिक पिळवणूक करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते.

माळशिरस तालुक्यात गेली अनेक वर्षे फक्त शिवामृत हा एकच दूध संघ होता. पण सध्या खासगी दूध संघाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर खासगी दूध संघ आहेत. पण या दूध संघांकडून म्हणावा तसा दर मिळत नाही. ३.५/८.५ ला खासगी दूध संघाकडून देण्यात येणारा दर याप्रमाणे; हेरिटेज ३८ रुपये लिटर, सोनाई ३६ रुपये, शिवामृत ३६ रुपये, डोडला ३७ रुपये, हटसन व नेचर डिलाईट ३६ रुपये

सध्या पेंडीचा पन्नास किलोचा दर १६०० रुपये, साठ किलोचा दर १७०० रुपये, बार्ली १२ रुपये किलो तर वैरणीचा दर १५०० रुपये गुंठा इतके आहे. याशिवाय जनावरांच्या औषधोपचाराचा खर्चाचा विचार केला असता प्रति लिटर ३६ रुपये दर दूध उत्पादकांना परवडणारी नाही. जर्शी गाईच्या दुधाला किमान ४० रुपये तरी दर मिळावे, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांतून होत आहे.

**हातात काही तरी पडेल**
खासगी दूध संघांकडून दुधाला कमीत कमी प्रति लिटर ४० रुपये मिळणे अपेक्षित आहे. यामुळे किमान होत असलेला खर्च भागुन शेतकऱ्यांच्या हातात काही तरी पडेल.
**- सागर भैस,**
दूध उत्पादक शेतकरी, पिलीव.



## महत्वाचे...



### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सत्यवान वाघमारे सन्मानित

**पिलीव, दि. १७ नोव्हेंबर-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे शिक्षक सत्यवान वाघमारे यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षक शिक्षकेतर संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने पुणे येथे प्रदेश अध्यक्ष संतोष गायकवाड, जनरल डायरेक्टर मुतुम, राज्यसचिव दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस संघटना वैभवजी गिते यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श गुणवान शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, वरिष्ठ लेखनिक तुकाराम भोरकडे, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य संग्रामसिंह जहागिरदार, गणेश पाटील, संग्राम पाटील, माजी सदस्य संभाजी भोसले, शाळा व्यवस्थापन समितीचे संजय पाटील, तानाजी लोखंडे, पत्रकार दामोदर लोखंडे आदींनी वाघमारे यांचे अभिनंदन केले.



### हत्तुरच्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
दोन महिन्यापूर्वी सीना नदीला आलेल्या महापूरामुळे हत्तुर येथील विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे प्रशासक कुंदन भोळे व सर्व अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार हत्तुर येथील श्री सोमेश्वर प्रशाला येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहीत्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी सिनीयर बँक इन्सपेक्टर पांडुरंग भोसले,सचिव नागेश आवताडे ,बँक इन्सपेक्टर मोहन राठोड,किरण घट्टे, मुख्याध्यापक शिवयोगी निंगप्पा यांच्या हस्ते शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रशालेचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### 'सोजर' मध्ये सोजर मास्टरशेफ स्पर्धेचे आयोजन

**बार्शी दि. १७ नोव्हेंबर-**
सोजर इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी प्रशालेत 'सोजर मास्टरशेफ' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ५ ते ७ व ८ ते १० या दोन गटात स्पर्धा घेण्यात आली. 'फूड विदाऊट फायर' संकल्पना हे या स्पर्धेचे वैशिष्ट्ये होते. या स्पर्धेचे मुल्यमापन हॉटेल सरनोबत येथील शेफ सागर कोकाटे आणि मनोहर पाटील यांनी केले. ५ ते ७ या गटातून अलिना मोमीन, समन मुजावर व अलिना तांबोळी व ८ ते १० या गटातून शिवा मौर्य, श्रुती पडवळ व अब्दुल्ला सय्यद यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शिक्षिका अर्चना शिंदे यांनी केले.

### दानम्मादेवी, वीरभद्रेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे गुरुवारी दीपोत्सव

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
विजापूर रस्त्यावरील रेवणसिद्धेश्वर मंदिर समोरील श्री दानम्मादेवी व श्री वीरभद्रेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सालाबादप्रमाणे गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता दीपोत्सव होणार आहे, अशी माहिती माजी आ. शिवशरण पाटील यांनी दिली. कार्तिक अमावास्यानिमित्त श्री क्षेत्र गुड्डापूर येथे दानम्मा देवीची जत्रा होत असते. या अनुषंगाने दरवर्षी सोलापुरात हा दीपोत्सव केला जातो. ट्रस्टच्यावतीने दानम्मादेवी मंदिरात पहाटे चार वाजता दानम्मादेवी मूर्तीस रुद्राभिषेक करण्यात येईल. त्यानंतर पंचपल्लव अभिषेक व सहस्र बिलवार्चन अलंकार पूजा होईल. सकाळी ८.३० वाजता मंदिरात भक्तांच्या हस्ते महामंगल आरती करण्यात येणार आहे. यावेळी सर्व वैदिक पूजा वेदमूर्ती सिद्धय्या हिरेमठ, विरेश हिरेमठ, मल्लय्या हिरेमठ, सचिन मठपती यांच्या अमृतवाणीने होणार आहेत. याच दिवशी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत भक्तांच्या हस्ते चंडीहोम, कुंकुमार्चन ललित सहस्रनाम पठण, पूर्णाहुती होणार आहे. संध्याकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत बी. हेमंत कुमार यांचा कन्नड, मराठी व हिंदी भक्तीसंगीत गीतांचा संगीत रजनी कार्यक्रम आयोजित केला आहे. संध्याकाळी ७ वाजता हजारो भक्तांच्या उपस्थितीत श्री दानम्मा देवीची महाआरती झाल्यानंतर परमपूज्य १०८ ष.ब्र.शिवशंकर शिवाचार्य महास्वामीजी तोळनूर व परमपूज्य १०८ ष.ब्र. गुरुपादेश्वर शिवाचार्य महास्वामीजी हत्तरसंग कुडल यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करुन दीपोत्सवाचा शुभारंभ होईल. यानिमित दिवसभर सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत महाप्रसाद वाटप ही करण्यात येणार आहे.संध्याकाळी महास्वामीजींचे आशीर्वचन होईल. कार्यक्रमांना माजी आमदार शिवशरण अण्णा बिराजदार पाटील, मंदिर ट्रस्ट अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव सिद्धय्या हिरेमठ, पदाधिकारी शिवराया बुक्कानुरे, शाम धुरी, सिद्धाराम लकाबशेट्टी, रामलिंग चिंचोळकर, धरेप्पा मसळी, मल्लिकार्जुन जम्मा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस सचिव सिद्धय्या हिरेमठ, शिवराया बुक्कानुरे, विश्वनाथ आमणे, मल्लू आऊसंग उपस्थित होते.



## सोयाबीनचा मुद्देमाल हस्तगत; संशयित आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ नोव्हेंबर-**
वैराग भागात गेल्या दोन महिन्यात सोयाबीन चोरीच्या दोन घटना घडल्या होत्या. चोरट्याने ४ ऑक्टोबरला बोरगाव झाडी येथील शेतकरी गोरोबा कृष्णा चव्हाण यांच्या घराजवळ मोकळ्या मैदानात पत्राशेडमध्ये ठेवलेले २७ सोयाबीनचे पोते (किंमत अंदाजे ६८ हजार रुपये) चोरट्याने चोरुन नेले होते.

त्यानंतर दि. २८ ऑक्टोबरला सारोळे (ता. बार्शी) गावातील शेतकरी सचिदानंद साहेबराव पाटील यांनी त्यांच्या शेतातील निघालेले सोयाबीन राहत्या घराच्या खाली ठेवण्यात आले होते तेथील ३६ सोयाबीनचे कट्टे (किंमत ७४,००० हजार रुपये) चोरीला गेले होते. याप्रकरणी वैराग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या आदेशान्वये तपास पथकातील अंमलदारांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माहिती घेतली.

गुन्ह्यातील करण भारत निपते (रा. खॉजा नगर, धाराशिव) तर दुसरा सूरज रशीद शेख (२७,रा. शम्सपुरा धाराशिव) यांची नावे निष्पन्न झाली आहेत. त्यांचा शोध घेत त्यांना पकडले. गुन्ह्यातील चोरी गेलेला मुद्देमाल मोहोळ पोलिस ठाणे तपास पथकातील अंमलदार व वैरागचे पोलिस कॉन्स्टेबल संदेश पवार, सुखदेव सलगर, सागर उमाटे, मुकुंद माळी यांनी जप्त केले. ६३ सोयाबीनचे पोते (किंमत दीड लाख), असा मुद्देमाल जप्त करत दोन आरोपींना अटक करत त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत २१ नोव्हेंबरला चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र कोणत्या इयत्तेपासून आणि कशाप्रकारे लागू करावयाचे याबाबतचे धोरण निश्चित करण्याकरिता समिती राज्यातील विविध विभाग व जिल्हास्तरावर भेटी देत असून, सोलापूर जिल्हा भेटीसाठी दि. २१ नोव्हेंबर रोजी येणार आहे.

या भेटी दरम्यान समिती सामान्य नागरिक, भाषातज्ञ, विचारवंत, मराठी भाषेशी संबंधित किंवा संलग्न शासकीय किंवा अशासकीय, खाजगी संस्था यांचे अध्यक्ष, सदस्य, राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटना यांचे अध्यक्ष सदस्य, पालक शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, आंदोलनकर्ते यांच्या बरोबर संवाद साधणार असून त्रिभाषा धोरणा संदर्भात त्यांची मते व विचार जाणून घेणार आहेत. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक १० वाजता जिल्हा नियोजन भवन सभागृह (पहिला मजला) येथे चर्चासत्राचे आयोजन केले असून त्याकरिता प्रश्नावली व मतावली देखील तयार करण्यात आलेली आहे. या चर्चासत्राच्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी तसेच महानगरपालिका व नगरपालिका शिक्षण मंडळांचे प्रशासनाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकाधिक तज्ञ व्यक्तींना जिल्हास्तरीय चर्चासत्रासाठी निमंत्रित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधितांना उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांनी केले आहे.

## २७५० रु. प्रमाणे मागील वर्षाची सर्व बिले अदा : चेअरमन माने-देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ नोव्हेंबर-**
मागील वर्षी २०२४-२५ मधील एफआरपी ही २४५८ रुपयांप्रमाणे असतानाही आचेगाव येथील जयहिंद शुगरने जाहीर केलेल्या २७५० रुपये प्रमाणे सर्वच शेतकऱ्यांचे ऊसबिले शनिवारी अदा केले आहेत. मागील वर्षी अडचणी निर्माण झाल्या होत्या, परंतु त्या सर्व अडचणी पार करत प्रलंबित बिले अदा केली आहेत व यंदाचा हंगाम यशस्वीपणे सुरू करण्यात आल्याची माहिती चेअरमन गणेश माने-देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पुढे बोलताना ते म्हणाले की,मागील गळीत हंगाम हा आम च्यासाठी खडतरीचा ठरला.तरीही त्यावर मात करत सर्व बिले अदा केली आहेत. अनेक अडचणी असल्यामुळे शेतकऱ्यांचे ऊस बिल देण्यात विलंब झाला.याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. म ध्यंतरी जयहिंद शुगरच्या बाबतीत वेगवेगळ्या अफवा पसरवल्या असून त्या पूर्णपणे असत्य आहेत. तरीही आम्ही कोणतीच प्रतिक्रिया न देता कारखाना शांतपणे आणि नियमितपणे हंगाम सुरू केला आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी जयहिंद परिवार कटिबद्ध आहे. चालू गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू झाला असून या हंगामात उच्चांकी गाळपाचे उद्दिष्ट असून त्यादृष्टीने हंगाम यशस्वीपणे सुरू झाला आहे.

ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूकदारांचा जयहिंद परिवारावरील उत्साह व प्रतिसाद पाहून आम्ही भारावलो आहोत. कारखान्याची ऊस तोडणी यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरली असून चालू हंगाम पूर्ण क्षमतेने गळीत चालू आहे.चालू हंगामातील शेतकऱ्यांचे बिल वेळेत देण्यात येईल,त्या पद्धतीने योग्य नियोजन लावण्यात आले आहे.चालू गळीत हंगामाम ध्ये सर्व शेतकऱ्यांनी ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन माने-देशमुख यांनी केले आहे.



## कौठाळी येथे ६५ महिलांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा आणि लोकमंगल जीवनवेदा आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने समृद्ध गाव योजना आणि राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत मौजे कौठाळी (ता. उत्तर सोलापूर) येथे महिला आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन सरपंच श्वेता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रआरोग्य तपासणी अंतर्गत गावातील ६५ महिलांना विविध आजाराबाबत मार्गदर्शन करून औषध गोळ्यांची उपलब्धता देखील करून देण्यात आली. शिबिराच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या संघटनेसाठी डॉ. अमजद बिजापुरे, किरण वाघमोडे, सुवर्णा भोसले, यश जमदाडे आणि रमेश पवार यांचे सहकार्य लाभले. उद्घाटन प्रसंगी उपसरपंच रणजीत माने, गावातील प्रतिष्ठित नागरिक धनंजय पाटील, समाधान पाटेकर, अशोक जाधव यांची उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वी आयोजना प्रा.अजित कुरे यांनी परिश्रम घेतले.

## राजवी ॲग्रो पॉवर आलेगाव येथे कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ नोव्हेंबर-**
पोलीस ठाणे व आर टी ओ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने राजवी ॲग्रो पॉवर प्रा. ली साखर कारखाना आलेगाव येथे ट्रॅक्टर, ट्रक चालक मालक व बैलगाडा चालक यांची रस्ता अपघात सुरक्षिततेच्या अनुषंगाने कार्यशाळा घेण्यात आली.



ट्रॅक्टर, ट्रक चालक मालक व बैलगाडा चालक यांना मद्यपान सेवन करून वाहन चालवू नये. वाहनाचा टेपचा आवाज मोठा राहणार नाही. वाहन चालवताना मोबाईल वापरणार नाही. स्वतः चे ड्रायव्हिंग लायसन, वाहनाचा इन्शुरन्स ठेवण्याबाबत व वाहनाला रिफ्लेक्टर बसवण्याबाबत सूचना दिल्या.

कार्यक्रमावेळी ट्रॅक्टर, ट्रक व बैलगाडीला रिफ्लेक्टर बसवण्यात आले.सदर कार्यशाळेत करता ५० ते ६० ट्रॅक्टर, ट्रक चालक-मालक व बैलगाडा चालक हजर होते.

सदर कार्यशाळे करता आरटीओ झाडबुके अकलूज व टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार व स्टाफ व कारखान्याचे शेतकी विभागाचे अधिकारी शिरसागर, अधिकारी व त्यांचा स्टाफ हजर होता.

## आजपासून मधमाशी पालन प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
युगंधर फाऊंडेशन सोलापूर आणि खादी ग्रामोद्योग आयोग यांच्या केंद्रीय मधमाशी पालन आणि संशोधन केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. सोलापूर येथील भूषण नगर महिला बचत गटाच्या मार्फत हे प्रशिक्षण १८ ते २२ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येत आहे

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलाना आर्थिक सक्षम आणि त्यांच्या मधून नव उद्योजन निर्माण व्हावेत यासाठी हे प्रशिक्षण आयोजन करण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये मधमाशीचे जीवन चक्र मधु उत्पादने तसेच खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजना यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे अशी माहिती फाउंडेशनच्या अध्यक्ष प्राध्यापक रेश्मा माने यांनी दिली. मधमाशी संवर्धन आणि मधमाशी पालन करण्यासाठी केंद्रीय स्तरावर हनी मशीन राबवून मधुक्रांती घडवून आणावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९साली हनी मि शन सुरू केले या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून ग्रामीण आणि शहरी भागात जास्तीत जास्त मधमाशी पालन होऊन त्यांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे.



## श्री स्वामी समर्थ रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**६२ रुग्णांनी घेतला लाभ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ नोव्हेंबर-**
येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष महेश मालक इंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.स्वप्ना हिप्परगी, डॉ.स्वप्नील हिप्परगी, डॉ. रोहित कुंभार, डॉ. नम्रता मोरे, डॉ. राजेश मलंग यांच्या सेवेतून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबीर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचालित मैंदर्गी रोड वरील श्री स्वामी समर्थ रुग्णालयात संपन्न झाले अशी माहिती युवा नेतृत्व प्रथमेश महेश इंगळे यांनी दिली. या प्रसंगी बोलताना प्रथमेश इंगळे यांनी शिबिरात मोफत रक्त तपासणी, मोफत औषधे यासह ६२ रुग्ण सहभागी होवून लाभ घेतला आहे. त्यापैकी २१ रुग्णांना सांगली येथील जीवनदीप नेत्र रुग्णालय येथे मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविले आहे. मंदीर समितीचे व श्री स्वामी समर्थ रुग्णालयाचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व संबंधीत वैद्यकीय स्टाफच्या उपस्थितीत शिबीराच्या प्रारंभी प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून या शिबीराचे शुभारंभ करण्यात आले. शिबीर यशस्वी होण्याकरीता बसवराज बामणीडो, सागर गोंडाळ, अभिषेक माडीकर, मनोज काटगाव, नितीन साळुंके, श्रीपाद कोरे, प्रकाश तुप्पद, सविता कोष्टी, चित्तरंजन अगरखेडे, विजय मोरे, मनोज काटगांव, रवि मलवे आदींनी परिश्रम घेतले.



## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**
शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे शिवसेना सोलापूर शहर व जिल्हाच्या वतीने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करण्यात आले.

देशाचे माजी गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे प्रतिमेचे पूजन करण्यात आले व पुष्पांजली वाहून हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर कॉंग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. अमर रहे अमर रहे बाळासाहेब ठाकरे अमर रहे... परत या परत या बाळासाहेब परत या.. अशा घोषणा देत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना सर्व शिवसैनिकांनी अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, प्रताप चव्हाण शहरप्रमुख नाना मोरे महिला आघाडीच्या अमीता जगदाळे, शशिकांत बिराजदार, संताजी भोळे, अमीत भोसले, अंबादास चव्हाण, जगदीश कलकेरी, कामगार सेनेचे प्रमुख अजय खांडेकर, रवि म्हेत्रे, संदीप बेळमकर, पंकज गजाकोश, दिनेश चव्हाण, सुशिल उपलप उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## स्वामी समर्थ महाराज पालखी पादुकांचे सांगोल्यात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ नोव्हेंबर-**

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पालखी पादुकांचे सांगोला शहरात वाडेगाव नाका येथे मोठ्या उत्साहात भाविक भक्तांकडून स्वागत करण्यात आले. फॅबटेक फार्मसी कॉलेजचे प्राचार्य संजय भैस, सांगोला येथील संयोजक विठ्ठल देशपांडे यांच्या हस्ते व प्रा.राऊत, प्रा.कांबळे यांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. पालखी समोर वारकरी महिला, भजनी मंडळ होते. जागोजागी महिलांनी औक्षण केले. तसेच अनेक ठिकाणी सडा-रांगोळ्या काढल्या होत्या. पालखी महादेव गल्ली, देशपांडे गल्ली, कोष्टी गल्ली, मनेरी चौक, हनुमान मंदिर, जुना कोर्ट रोड, छत्रपती शिवाजी चौक मार्गे नेहरू चौकातून स्टेशन रोड, महात्मा फुले चौकातून श्री समर्थ कॉम्प्लेक्स येथे मुक्कामास थांबली आहे. मंगळवार दि.१८ नोव्हेंबर रोजी पहाटे सहा वाजता पालखीचे प्रयाण पुढील परिक्रमेसाठी होणार आहे.



## महत्त्वाचे



### बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त युवा सेनेच्या वतीने ब्लँकेट वाटप

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ठाकरे गटाच्या युवासेनेतर्फे सोलापूरातील श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात गरीब व गरजू नागरिकांना सोमवारी ब्लँकेट वाटप करण्यात आले. शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या थंडीचा विचार करून हा उपक्रम राबवण्यात आला. युवासेनेचे शहर प्रमुख विठ्ठल वानकर यांच्या नेतृत्वाखाली हा सामाजिक उपक्रम पार पडला. जवळपास १०० गरजूंना ब्लँकेटचं वाटप करण्यात आले. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसैनिकांना दिलेली शिकवण ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण आम्ही आजही जपतो. त्याच धर्तीवर हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आलेचे युवासेनेचे शहर प्रमुख विठ्ठल वानकर यांनी सांगितले. यावेळी युवासेनेचे जिल्हा समन्वयक सुमित साळुंखे, शहर समन्वयक गुरुनाथ शिंदे, विभागप्रमुख अण्णा जाधव, अमर गुंड, अर्जुन गायकवाड, सागर जाधव, राहुल आवताडे, विष्णू जगताप, राजू बुरबुरे, संतोष कोरे, संदीप काशीद, अरविंद गवळी, साई जाधव, अनिल शिंदे उपस्थित होते.



### अन्वी गर्जे हिचा जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक

**करमाळा, दि. १७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करंजे येथील विद्यार्थिनी अन्वी संजय गर्जे हिने नुकत्याच माढा येथे पार पडलेल्या टॅलेंट हंट जिल्हास्तरीय वक्तृत्व लहान गट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविले आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक अमोल राऊत, वर्गशिक्षक गणेश गरड, सहशिक्षक नामदेव घोगरे, शिवलाल शिंदे, माधुरी कांबळे, वैशाली रासकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौदागर सरडे, सर्व सदस्य, सरपंच गणेश सरडे, केंद्रप्रमुख संजय मुंढे, गटशिक्षणाधिकारी नितीन कदम यांनी अन्वीचे अभिनंदन केले.

### किशोर चंडक यांना उत्कृष्ट तिकीट संग्राहक- भारताचे वरिष्ठ सुपरस्टार पारितोषिक प्रदान

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

मुंबईमधील अंधेरी येथे रविवार १६ नोव्हेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात, खयाल ५० वरिल ५० - उत्कृष्ट तिकीट संग्राहक- भारताचे वरिष्ठ सुपरस्टार या पारीतोषीकाने सोलापूरचे ख्यातनाम उद्योगपती व संग्राहक किशोर चंडक यांना विभूषीत करण्यात आले. पारितोषिकाचे स्वरूप सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व रोख रूपये १ लाख असे होते. पुरस्कार बेंगरूलूचे प्रसिध्द नाणे संग्राहक राजेंद्र मारू सांच्या हस्ते देण्यात आले. सभारंभात सुदेश भोसले, रोहीणी हत्तंगडी, अतुल खत्री, तौफीक कुरेशी, निखील राणे, मेघना इरांडे, कृष्णा बोंगने इत्यादी नामांकीत कलाकार तसेच भारतातील वेगवेगळ्या विषयात पारंगत असलेले पारीतोषीक विजेते हजर होते. या सर्व कलाकारांनी आपल्या कलेने लोकांना मंत्रमुग्ध केले. एकूण ५० निरनिराळ्या श्रेणी मधील प्रत्येकी पाच मान्यवर भारतभरातून अंतिम फेरी साठी निवडण्यात आले होते. त्यामधून प्रत्येकी एक पारीतोषीक विजेत्याला मान्यवरांकडून सन्मानीत करण्यात आले.




# पंढरपूरच्या नगराध्यक्षपदासाठी तिरंगी लढत

## भाजपाकडून शामल शिरसट-पापरकर, विठ्ठल परिवर्तन आघाडीकडून सारिका साबळे, तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून डॉ. प्रणिता भालके रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत रंग चढला असून नगराध्यक्षपदासाठी तिरंगी लढत होणार असल्याचे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले. या पदासाठी भाजपाकडून शामल शिरसट-पापरकर, आ.अभिजीत पाटील यांच्या विठ्ठल परिवर्तन आघाडीकडून सारिका साबळे, विठ्ठल परिवाराच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून डॉ.प्रणिता भालके हे रिंगणात उतरले आहेत.

सोमवार, १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटचा दिवस होता. त्यामुळे विविध पक्षाचे उमेदवार व त्यांच्या समर्थकांची नगरपालिका कार्यालयात सकाळी १० वाजल्यापासूनच मोठी गर्दी झालेली होती. दरम्यान, भाजपा आणि


डॉ.प्रणिता भालके


शामल शिरसट


सारिका साबळे

पंढरपूर-मंगळवेढा विकास आघाडीच्या माध्यमातून परिचारक गट यंदाच्या नगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे.

नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असताना देखील परिचारक गटाने ऐनवेळी ओबीसी कार्ड खेळत शामल शिरसट-पापरकर यांना भाजपाच्या कमळ चिन्हावर रिंगणात उतरविले आहे. आमदार तथा विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या विठ्ठल परिवर्तन आघाडीकडून सारिका साबळे यांना उमेदवारी देवू केली आहे. सारिका साबळे यांनी यापूर्वी नगरसेविका म्हणून पालिकेत काम केलेले आहे.

तर इकडे माजी आमदार (कै.) भारत भालके यांच्या स्नुषा तथा विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्या पत्नी डॉ.प्रणिता भालके यांनी विठ्ठल परिवाराच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून नगराध्यक्षपदासाठी पदर खोचून रिंगणात उतरल्या आहेत. दरम्यान, माजी नगराध्यक्षा साधना भोसले याही पुन्हा एकदा नगराध्यक्षपदावर काम करण्याकामी इच्छुक होत्या. मात्र, काही राजकीय घडामोडींमुळे त्यांचे नाव मागे पडले. माजी नगराध्यक्षा साधना भोसले यांचे पती तथा माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांनी परिचारक यांच्या विरोधात विठ्ठल परिवाराला एकत्र करण्यात मोलाची भूमिका निभावली होती. साधना भोसले यांच्याऐवजी डॉ.प्रणिता भालके यांचे नाव पुढे आल्याने नागेश भोसले हे विठ्ठल परिवारातून बाहेर पडत भाजपाकडून उमेदवारी मिळते का? याविषयी प्रयत्न केले होते. यात त्यांना अपयश आले.

नगराध्यक्षपदाच्या शर्यतीतून आपल्या पत्नी साधना भोसले यांचे नाव मागे घेत नागेश भोसले हे स्वत: नगरसेवकपदासाठी विठ्ठल परिवाराच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीमार्फत निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी दर्शवित अखेरच्या क्षणी आपला उमेदवारी दाखल केला आहे. दरम्यान, परिचारकांकडून नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या वैशाली वाळुजकर यांचे नाव ऐनवेळी मागे पडले.

परिचारकांनी अखेरचा डाव टाकीत शेवटच्या टप्प्यात ओबीसी कार्ड बाहेर काढून नगराध्यक्षपदासाठी आपले विश्वसनीय शिलेदार तथा माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट यांच्या पत्नी शामल लक्ष्मण शिरसट-पापरकर यांना उमेदवारी जाहीर केली. शामल शिरसट यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यानिमित्ताने पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी असलेला सस्पेन्स अखेर संपुष्टात आला.

## शेकापचे नगराध्यक्षपदाचे उमेदवारच भाजपामध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ नोव्हेंबर-**

सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी ठरवलेले नगराध्यक्षपदाचे उमेदवार माजी नगराध्यक्ष मारुती बनकर यांनी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीच भारतीय जनता पक्षामध्ये ग्राम विकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-



सावंत, उद्योजक बाळासाहेब एरंडे, श्रीकांत देशमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाची कामे सुरू आहेत. त्याप्रमाणे सांगोला नगरीच्या विकासासाठी सहकार्य करून सांगोला शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी मोठ्या ताकतीने प्रयत्न करू तसेच निवडणुकीच्या संदर्भातील पुढील निर्णय तालुक्यातील नेतेमंडळी लवकरच जाहीर करतील. स्व. गणपतरावजी देशमुख यांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेले व सामाजिक वारसा असणारे तसेच सर्व समाजाशी सलोख्याचे संबंध असणारे माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर यांचे मी भारतीय जनता पक्षामध्ये स्वागत करीत आहे असे शेवटी म्हणाले.

सांगोला शहराच्या विकासासाठी आपण भाजपमध्ये प्रवेश केला आहे. लवकरच पुढील आघाडीची घोषणा होईल अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर यांनी भारतीय जनता पक्षातर्फे नगराध्यक्ष पदासाठी अर्ज भरल्यानंतर दिली.

## बार्शीत शिवसेना (ठाकरे) गटाची महिला उमेदवार मैदानात

**बार्शी, दि. १७ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी बारबोले-सोपल गटाने महाविकास आघाडीच्या माध्यमातून मोठा निर्णय घेतला आहे. निर्मला विश्वास बारबोले यांनी आज शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाच्या तिकिटावर आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

विशेष म्हणजे त्यांच्या पती विश्वास बारबोले हे मुळचे राष्ट्रवादीचे नेते असून यावेळी संपूर्ण बारबोले परिवार व गटाने एकत्रितपणे महाविकास आघाडीबरोबर उभे राहत हा निर्णय घेतला आहे. अर्ज दाखल करताना माजी उपनगराध्यक्ष अरुणा परांजपे, भारती बगले, राणी शेळके, गोदावरी शिंदे, वैशाली सावळे आणि विक्रमसिंह पवार उपस्थित होते. महिलांची भक्कम उपस्थिती या सोहळ्यातून स्पष्ट दिसून आली. या उमेदवारी मुळे बार्शीच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली असून आगामी निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## महेश इंगळे यांनी समर्थकांसह मिरवणुकीने दाखल केला अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ नोव्हेबर**

येथील श्री स्वामी समर्थ वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्यासह आपल्या असंख्य समर्थकांसह मिरवणुकीने येत भारतीय जनता पार्टीकडून प्रभाग क्र.११ साठी उमेदवारी अर्ज दाखल केला. श्री वटवृक्ष मंदिर येथून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला होता.

मिरवणुकीच्या मार्गावर नागरिकांनी पुष्पहार घालून व औक्षण करुन महेश इंगळे यांचे स्वागत करीत होते. यावेळी समर्थ जाधव, शिवपुत्र हळगोदे, प्रसाद पाटील, प्रविण देशमुख, संतोष जमगे,, संतोष पराणे मित्र मंडळ, शिवशरण अचलेर, अमर पाटील, रवि मलवे, श्रीशैल गवंडी,



गिरीश पवार, ऋषिकेश लोणारी, जयप्रकाश तोळणुरे, स्वामीनाथ लोणारी, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, महेश काटकर, चंद्रकांत सोनटक्के, रवि कदम, संजय पाठक, प्रशांत भगरे, सत्तार शेख, नंदकुमार जगदाळे, सैदप्पा इंगळे, संजय इंगळे, बबनराव इंगळे, आबा इंगळे, डॉ.पाटील, अरविंद पाटील, चित्तरंजन अगरथडे, लोकेश हरवाळकर, प्रसाद सोनार, खाजप्पा झंपले मित्र परिवार, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, मेजर अमोल माने, मुन्ना राठौर उपस्थित होते.

### प्रभाग १० ब मधून शंकर पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अक्कलकोट :** अक्कलकोट नगर परिषदेसाठी प्रभाग १० ब मधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून शंकर महादेव पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. निवडणूक निर्णय अधिकारी सुमित शिंदे यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी सागर दळवी, समर्थ यादव, सचिन जाधव आदी उपस्थित होते.

### दुधनी नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून राजेंद्र इंगळे

**अक्कलकोट :** दुधनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातर्फे नगराध्यक्षपदासाठी राजेंद्र कोंडिबा इंगळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर यांच्याकडे उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी तालुकाध्यक्ष बंदेनवाज कोरबू, उपाध्यक्ष बसवराज देशमुख, उपाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील आदी उपस्थित होते.



## दुधनी नगरपालिका; नगराध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यासाठी ५६ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ नोव्हेंबर-**

दुधनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकसाठी १७ नोव्हेंबर आजच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अध्यक्षपदासाठी पाच अर्ज व तर सदस्यपदासाठी ५६ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मीकांत कहार यांनी दिली.

> दुधनी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी शिंदे शिवसेना गटाकडून प्रथमेश म्हेत्रे यांचे नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे तर भाजपा कडून अतुल मेलकुंदे नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवत आहेत. तर काँग्रेस पक्षाकडून महेश स्वामी हे निवडणूक लढवत आहेत.या ठिकाणी शिंदे शिवसेना गटाकडून प्रथमेश म्हेत्रे व भाजपाकडून अतुल मेलकुंदे यांच्यात थेट लढत होत असून काँग्रेसच्या महेश स्वामी रंगत वाढली आहे.

दुधनी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी शिंदे शिवसेना गटाकडून प्रथमेश म्हेत्रे यांचे नाम निर्देशन अर्ज दाखल केले आहे तर भाजपाकडून अतुल मेलकुंदे नंगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवत आहेत.

तर काँग्रेस पक्षाकडून महेश स्वामी हे निवडणूक लढवत आहेत. या ठिकाणी शिंदे शिवसेना गटाकडून प्रथमेश म्हेत्रे व भाजपाकडून अतुल मेलकुंदे यांच्यात थेट लढत होत असून काँग्रेसच्या महेश स्वामी यांच्या उमेदवारीमुळे रंगत वाढली आहे.

# अक्कलकोट नगराध्यक्षपद निवडणूक : भाजपा, काँग्रेस, शिंदे सेना, ठाकरे सेना यांच्यात टस्सल

- मैंदर्गीत काँग्रेसचा स्थानिक गटाला पाठिंबा
- दुधनीमध्ये भाजप, काँग्रेस, शिंदे सेना, राष्ट्रवादी शरद पवार गटात होणार लढत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ नोव्हेबर**

अक्कलकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी भाजपा विरुध्द काँग्रेस, शिंदे सेना विरुध्द ठाकरे सेना यांच्यात टस्सल होणार असल्याचे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाले. दरम्यान, मैंदर्गीत काँग्रेसने स्थानिक गटाला पाठिंबा दर्शविला तर दुधनीमध्ये भाजपा, काँग्रेस, शिंदे सेना, राष्ट्रवादी शरद पवार गटात लढत होणार असल्याचे दिसून येते. अक्कलकोट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्षपदासाठी ५ तर सदस्यांसाठी ७३ जणांनी अर्ज दाखल केले.

नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून मिलन कल्याणशेट्टी, काँग्रेस पक्षाकडून अश्पाक बळोरगी, शिंदे शिवसेनेकडून रईस टिनवाला यांच्यासह बाबासाहेब जाधव, गौरी कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे आदींनी अर्ज दाखल केले, अशी माहिती



निवडणूक निर्णय अधिकारी सुमित शिंदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रमाकांत डाके यांनी दिली. सदस्य पदासाठी अर्ज दाखल केलेले उमेदवार याप्रमाणे (कंसात प्रभाग क्रमांक) किरात किरण उत्तम (११ ब), बोलडे राजश्री परमेश्वर (१ अ), कुंभार भागुबाई नागराज (१२ ब), शपवाले रखमाबाई अर्जुन (४ ब), कोरबू सायराबानू सैफन (१२ क), खिस्तके शकील चांद (९ ब), बागवान जन्नतबी हारून (७ ब), सिध्दे ऐश्वर्या किशोर (६ अ), रफिक मुख्तारअहमद बेपारी (३ अ), कापसे सिध्देश्वर रमेश (५ ब), कमळाबाई रेवू राठोड (१२ ब), कटारे पल्लवी सुहास (६ अ), कटारे पल्लवी सुहास (५ अ), धनशेट्टी सोनाली लक्ष्मीकांत (२ अ), कांबनूरकर मंजना लक्ष्मण (४ ब), शेरीकर सद्दामहुसेन नुरअहमद (९ ब).

शेरीकर सद्दामहुसेन नुरअहमद (३ अ), मडिखांबे दत्ता दुर्गाप्पा (४ अ), बागवान नसरीन सलीम (५ अ), नागेश सात्तप्पा हरवाळकर (४ अ), माळी विद्या शंकर (४ ब), इसापुरे गंगाबाई काशिनाथ (६ अ), मडिखांबे अविनाश रेवप्पा (४ अ), अलविकर विजयकुमार लक्ष्मण (२ ब), मोकाशी मोहसीन हुसेनबाशा (५ ब), इंगळे महेश कल्याणराव (११ ब), वेदेश प्रमोद गुरव (११ ब), पारखे आरती जोतिबा (९ अ), स्वामी सुनंदा श्रीशैल (८ अ), राठोड अशितोष भालचंद्र (१२ अ), भीमाशंकर बसवराज कुंभार (१२ अ).

अलवीकर कविता विजय (२ अ), भांडेकर शीतल भारत (२ अ), धोंगडे अनिरुध्द यशवंत (६ ब), कोरबू सैफन मकतूम (११ ब), गायकवाड सुवर्णा उत्तम (११ अ), चौगुले कस्तुरा मारुती (२ अ) चौगुले कस्तुरा मारुती (२ ब), बागवान मुजाईद नूरद्दीन (७ अ), अरब एजाज अजीज-(ब), टिनवाला फरियाशाजनीन इकबाल (७ ब), हवाळकर युगंधरा सिद्धांत (७ ब), धोंगडे अनिरुद्ध यशवंत (६ ब), धोंगडे यशवंत अंबादास (६ ब).

हिंडोळे महेश चनबसप्पा (८ ब), हिंडोळे महेश चनबसप्पा (१० ब), स्वामी शैला सचिन (८ अ), थंब राजेंद्र गुरुलिंगप्पा (८ ब), बागवान मुमताज नुरुद्दीन (७ ब), बागवान मुजाईद नुरुद्दीन (७ अ), राठोड रविना विकास (१२ ब), राठोड रविना विकास (१२ क), धनशेट्टी वैष्णवी (२ अ), कौसर मकतूम नदाफ (१ अ), राठोड पूजा ऋतुराज (१२ अ, १२ ब), खवळे स्नेहा संतोष (९ अ), करीम हसन शेख (५ ब).

मडिखांबे प्रियांका सचिन (११ अ), हिना इनामदार इसा (१२ क), कुंभार भागुबाई नागराज (५ अ), नाजीन शामराव होटकर (९ अ), अळगी सुनीता सिद्धाराम (६ ब), मडिखांबे प्रमिला नागनाथ (११ अ), मोरे सोनाली स्वामीराव (१० अ), कमनुरकर प्रिया मनोज (१ अ), घोडके सखुबाई शरणाप्पा (४ ब), चाऊस सिकंदर राजअहमद (१ ब), क्षीरसागर पुतळाबाई नामदेव (३ ब), डोके रवींद्र रामचंद्र (८ ब), नदाफ कैसर मकतूम (५ अ), मोरे स्वामीराव भाऊराव (१० ब), कवडगी केदार पंडित (१० ब).

> अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाकडून मिलन कल्याणशेट्टी हे निवडणूक लढवत असून काँग्रेस पक्षाकडून अश्पाक बळोरगी हे निवडणूक रिंगणात आहेत. तर शिंदे शिवसेना गटाकडून रईस टिनवाला हे निवडणूक लढवत आहेत.

> अक्कलकोट, दुधनी व मैंदर्गी नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी काँग्रेससोबत युती करणार आहे. अक्कलकोट नगरपरिषद तीन जागा व दुधनी येथे एक जागा लढवणार आहे. मैंदर्गी येथे स्थानिक आघाडी सोबत असणार आहे, असे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे यांनी सांगितले.

> अक्कलकोट, दुधनी व मैंदर्गी नगरपरिषद या तीनही नगरपालिकेत वंचित बहुजन आघाडी व रासप सोबत मिळून निवडणूक लढवणार आहे. अक्कलकोट नगराध्यक्षपदाची निवडणूक अशपाक बळोरगी लढवणार आहेत. मैंदर्गी येथे स्थानिक आघाडी सोबत असणार आहे. दुधनी येथे काँग्रेस सर्व जागा लढवणार आहे, असे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जून पाटील यांनी सांगितले.

> काँग्रेसचे माजी नगरसेवक महेश इंगळे, सद्दाम शेरीकर, खवळे आदींनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करुन भाजपाकडून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.